सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २७ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २३९ । पाने १२ । किंमत रु. ८/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# मीराबाईने जिंकले पहिले सुवर्ण

## राष्ट्रकुल क्रीडा 'स्पर्धा विक्रमा'सह सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक

**ग्लासगो, २६ जुलै**

रविवारी येथे २३ व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताची भारोत्तोलक मीराबाई चानूने महिलांच्या ४९ किलो वजनी गटात सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकले. २०१८ आणि २०२२ च्या स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या मीराबाईने 'स्नॅच' प्रकारात ८५ किलो वजन उचलून स्पर्धेचा विक्रमही प्रस्थापित केला.

३१ वर्षीय मीराबाईची सुरुवात फारशी सहज झाली नाही, कारण पहिल्या प्रयत्नात तिला ८२ किलो वजन उचलण्यात अपयश आले. मात्र, दुसऱ्या प्रयत्नात तिने हे वजन यशस्वीरीत्या उचलले आणि त्यानंतर ८५ किलो वजन उचलून विक्रम मोडीत काढला. त्यानंतर, 'क्लीन अँड जर्क' प्रकारात दुसऱ्या प्रयत्नात १०५ किलो वजन यशस्वीरीत्या उचलून तिने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. नायजेरियाच्या रुथ असुकुओ न्यॉन्गने रौप्यपदक पटकावले, तर मलेशियाच्या आयरीन जेन हेन्रीने कांस्यपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

## रानमसले येथे कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**सोलापूर, दि. २६ जुलै -**

रानमसले (ता. उत्तर सोलापूर ) येथील शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतातील झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना रविवारी पावणे बारा वाजता उघडकीस आली.

बाळासाहेब गरड (वय ६५) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांची गावामध्ये कोरडवाहू शेती आहे. अधिक उत्पन्नासाठी त्यांनी बाजूचे बागायत शेत बटईने घेतले होते. मात्र आज त्यांनी दामोदर गजघाटे यांच्या शेतातील झाडाला गळफास लावून घेतला. ही घटना शेजारील शेतातील व्यक्तीने पाहिल्यावर गावच्या पोलिस पाटलाला कळवले. त्यानंतर नातेवाईकांनी बाळासाहेब यांना गळफासातून सोडवले. भाचा ज्योतीराम साठे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. गरड यांनी कुठल्याही बँकेकडून अथवा सावकाराकडून कर्ज घेतले नव्हते तर काही नातेवाईकाकडून हात उसनी रक्कम घेतली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.





| Choice Code | Course Name | Intake |
|---|---|---|
| 626519110 | Civil Engineering | 60 |
| 626561510 | Mechanical and Automation Engineering | 60 |
| 626524210 | Computer Science and Engineering | 180 |
| 626524610 | Information Technology | 120 |
| 626592110 | Artificial Intelligence and Machine Learning | 60 |
| 626584410 | Electronics and Computer Engineering | 60 |
| 626537210 | Electronics and Telecommunication Engineering | 120 |


# नीलकेणींच्या नेतृत्वात परीक्षा सुधारणा कार्यगट

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा

**नवी दिल्ली, २६ जुलै**

भारतातील परीक्षा पद्धतीत सुधारणांची शिफारस करण्यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी 'इन्फोसिस'चे सहसंस्थापक नंदन नीलकेणी यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय कार्यगटाची (टास्क फोर्स) स्थापना करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केली.



केंद्र सरकार विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी अनेक पावले उचलत आहे, असे नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरून प्रसारित केलेल्या व्हिडीओ संदेशात म्हटले आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणारे आता तुरुंगात आहेत, असेही त्यांनी नमूद केले. सरकारने यापूर्वीच जलदगती न्यायालयाची व्यवस्था केली आहे आणि परीक्षांशी संबंधित अनियमिततेचा सामना करण्यासाठी संसदेत कठोर तरतुदी असलेला नवीन कायदा आणण्याच्या दिशेनेही पावले उचलली जात असल्याचे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

सरकार तंत्रज्ञानाचा अधिक वापर सुनिश्चित करून परीक्षा प्रणाली अधिक विश्वसनीय आणि पारदर्शक बनवण्यावर लक्ष केंद्रित करीत आहे, असे नरेंद्र मोदी यांनी दीर्घकालीन सुधारणांच्या आवश्यकतेवर भर देताना सांगितले. हा कार्यगट परीक्षांमधील सुधारणांवर लक्ष केंद्रित करेल आणि लवकरात लवकर आपल्या शिफारशी सादर करेल. आगामी परीक्षांची विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी या समितीच्या अहवालाच्या आधारे सरकार कार्यवाही करेल, असे त्यांनी सांगितले.

पेपरफुटीच्या मुद्यावर कॉक्रोच पार्टीच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी आणि तरुणांनी जंतरमंतर येथून सुरू केलेले आणि नंतर देशभर पसरलेले आंदोलन सुमारे सात आठवडे चालले. त्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय शिक्षण मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी सरकारने या कार्यगटाची स्थापना केली.

### नवीन कायद्यासाठी आज विधेयक

परीक्षांशी संबंधित गैरप्रकारांविरुद्ध कायदेशीर चौकट मजबूत करण्यासाठी केंद्र सरकार सोमवारी लोकसभेत सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकार प्रतिबंध) सुधारणा विधेयक-२०२६ सादर करणार आहे. या सुधारणांचा उद्देश २०२४ च्या कायद्याला अधिक बळकट करणे हा आहे. यासाठी कठोर शिक्षेची तरतूद करणे, तपास आणि खटले वेळेत पूर्ण करणे तसेच जलद न्याय मिळवून देण्यासाठी विशेष जलदगती न्यायालये स्थापन करणे यासारखी पावले उचलली जाणार आहेत. या विधेयकाद्वारे कठोर शिक्षा, जलद तपास आणि वेळेत खटले चालवण्याच्या तरतुदी करून गैरकारभारांविरुद्धची कायदेशीर चौकट मजबूत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. (वृत्तसंस्था)

### कार्यगटातील सदस्य

या कार्यगटाच्या सदस्यांमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ नंदन नीलकेणी, इस्त्रोचे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ, इंटेलिजन्स ब्युरोचे माजी संचालक तपन डेका, आयआयटी मद्रासचे संचालक व्ही. कामकोटी, माजी शिक्षण सचिव अनिता करवाल आणि लॉजिस्टिक तज्ज्ञ अमृतलाल मीणा यांचा समावेश आहे.






# कौटुंबिक कलहातून मायलेकीची आत्महत्या

## सोलापूर शहरातील घटना; किरकोळ भांडणातून टोकाचे पाऊल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै -**

कौटुंबिक कलहातून मायलेकीने धावत्या रेल्वेखाली आत्महत्या केली. ही घटना सोलापूर- टिकेकरवाडी दरम्यान सोलापूर आयकर भवनच्यामागे आज रविवारी पहाटे साडेपाच वाजता उघडकीस आली.





वर्षा पांडुरंग आधटराव (वय ३३ ) आणि स्वरा पांडुरंग आधटराव (वय १४, दोघी रा. सुशील नगर, विजापूर रोड, सोलापूर) अशी मयत आई व मुलीचे नावे आहेत. पतीबरोबर झालेल्या किरकोळ भांडणातून महिलेने टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे.

वर्षा हिचे पतिबरोबर भांडण झाल्याने तिला शनिवारी दुपारी मुलीसोबत पतीने माहेरी पाठविले होते.

त्यानंतर दोघी घरी जातो म्हणून रात्री उशिरा घरातून गेल्या होत्या. पतीने दोघांच्या शोध घेतला, मात्र मिळून न आल्याने त्याने विजापूर नाका पोलिसांना याची माहिती दिली होती.

दरम्यान रविवारी पहाटे पाचच्या सुमारास किनारा हॉटेलसमोरील आयकर भवनाच्या पाठीमागील रेल्वे रुळाजवळ वर्षा आणि तिची मुलगी स्वरा या दोघींचा मृतदेह आढळून आला. ही खबर विजापूर नाका पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार मनुरे यांनी घटनास्थळी पोहोचून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

मयत वर्षा हिच्या पश्चात पती आणि एक मुलगी असा परिवार असून तिचे पती वॉचमन म्हणून काम करीत असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रकरणाचा तपास हवालदार बहिर्जे करीत आहेत.

## महत्वाचे...




## राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत केमची रेवती तळेकर देशात तिसरी

**जेऊर, दि.२६ जुलै-**

राष्ट्रीय पातळीवरील ऑनलाईन अबॅकस स्पर्धेत स्मार्टअस अबॅकस क्लास केम सेंटरची विद्यार्थिनी रेवती अभिजित तळेकर हिने दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत रेवतीने संपूर्ण देशात तिसरा क्रमांक पटकावून केम शहराचे व आपल्या क्लासचे नाव उज्ज्वल केले आहे. स्पर्धेत रेवतीने आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत अवघ्या ८ मिनिटांत १५० पैकी १३५ गणिते अत्यंत अचूकपणे सोडवण्याचा अद्भूत पराक्रम केला. या राष्ट्रीय स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा सातारा येथे पार पडला. या सोहळ्यात स्मार्टस एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड'चे संस्थापक डॉ. नरेंद्र शेलार आणि स्मिता शेलार यांच्या हस्ते रेवती अभिजित तळेकर हिला राष्ट्रीय स्तरावरील ट्रॉफी व मानपत्र देऊन गौरवण्यात आले. रेवती तळेकर हिच्या या यशामध्ये स्मार्टअस अबॅकस क्लास (केम सेंटर)च्या संस्थापिका सोनल गौरव कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रियंका निलेश ओहोळ यांचे सहकार्य ठरले.



## श्रीराम कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून चरणसेवा

**वेळापूर, दि. २६ जुलै-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नित श्रीराम कृषी व संलग्न महाविद्यालय, पानीव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आषाढी वारीनिमित्त माळशिरस तालुक्यात वारकऱ्यांसाठी चरणसेवा व कृषी जनजागृतीचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांना तेल लावून मालिश केली. याचबरोबर विद्यार्थ्यांनी झाडे लावा, पाणी अडवा, पाणी जिरवा, माती परीक्षण करा, सेंद्रिय खतांचा वापर करा अशा कृषी व पर्यावरणपूरक संदेशांचे फलक हातात घेऊन वारकऱ्यांमध्ये जनजागृती केली. उपक्रमास उपप्राचार्य डॉ. सुरजकुमार राऊत, उपप्राचार्य डॉ. शुभम भोसले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. महेश पाटोळे, प्रा. धीरज दोरकर, प्रा. अजय लोखंडे, प्रा. जयवंत वाघमोडे, प्रा. अमोल देवकते, प्रा. जीवन सावळकर, प्रा. रूपाली घोगरे, प्रा. प्रतिमा ओतारी व प्रा. अंजनी माने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मार्गदर्शक श्रीलेखा पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष करण पाटील, सचिव ॲड. अभिषेक पाटील, सहसचिव, संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद झगडे प्राचार्य डॉ. हरी हाके यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना मार्फत करण्यात आले होते.



## सेवा यज्ञ महारक्तदान संकल्पाने मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस साजरा

**मंगळवेढा, दि. २६ जुलै-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'सेवा यज्ञ महारक्तदान संकल्प' अभियानाअंतर्गत आंधळगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी भेट देऊन रक्तदात्यांचे कौतुक केले. जिल्हा परिषद सदस्या करुणा शिवशरण यांच्या संकल्पनेतून तसेच पंचायत समिती सभापती दिपाली ताड व पंचायत समिती सदस्य विनायक यादव यांच्या पुढाकाराने हे शिबीर झाले. शिबिरात मोठ्या संख्येने युवक व नागरिकांनी रक्तदान केले. यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे अभिनंदन करून त्यांचे आभार मानले. आमदार आवताडे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, आंधळगाव येथे विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य शिवाजी नागणे, संचालक सुरेश भाकरे, पांडुरंग भाकरे, पंचायत समिती सदस्य संजय पवार, उद्योजक जनार्धनदादा शिवशरण, चंद्रकांत जाधव, परमेश्वर मासाळ, आशा पाटील, ॲड. शिवानंद पाटील, निलेश आवताडे, सरपंच शिवाजी सरगर, सरपंच लव्हाजी लेंडवे, सरपंच दीपक सुडके उपस्थित होते.

# वारकरी सेवेतील उत्कृष्ट नियोजनाची राज्यस्तरावर दखल

### अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै**

आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांसाठी उभारलेल्या मूलभूत सुविधांचे नियोजन, समन्वय आणि प्रभावी अंमलबजावणी याची राज्य शासनाने दखल घेतली आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान केला. सलग दुसऱ्या वर्षी पालखी मार्गावरील सुविधा यशस्वीपणे उभारल्याबद्दल त्यांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.



आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेने कंबर कसली होती. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेतून पालखी मार्गावरील मुक्कामस्थळी जर्मन हँगर, वॉटरप्रूफ मंडप, सुलभ शौचालये, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच स्वागत कमानी उभारल्या. कडक उन्हासह पावसाळी वातावरणातही वारकऱ्यांना या सुविधांचा मोठा लाभ झाला. संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी सलग दुसऱ्या वर्षी सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी सांभाळली.

विशेष म्हणजे, यापूर्वी वादग्रस्त ठरणारी शौचालय उभारणीची निविदा प्रक्रिया यंदा प्रथमच सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत कोणत्याही वादाविना पूर्ण करण्यात आली. पालखी मार्गावरील स्वच्छतागृहे, जर्मन हँगर, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, रस्ते आणि अन्य सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी कोहिनकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या कार्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही विशेष कौतुक करत कोहिनकर यांच्या प्रभावी नेतृत्वाचे कौतुक केले.

सन्मान स्वीकारल्यानंतर संदीप कोहिनकर यांनी या यशाचे श्रेय जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध शासकीय यंत्रणांना दिले. सर्व विभागांच्या समन्वयातून आणि संघभावनेतूनच आषाढी वारीचे नियोजन यशस्वी झाले, असे नमूद केले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### गतवर्षीच्या यशामुळे यंदा तीन जिल्ह्यांचे सोलापूरकडे समन्वय

गतवर्षी सोलापूर जिल्हा परिषदेच्या यशस्वी कामगिरीमुळे यंदा पुणे, सातारा आणि सोलापूर या तीनही जिल्ह्यांतील सुविधा व्यवस्थापनाची जबाबदारी सोलापूर जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली होती. कोहिनकर यांनी विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधत ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.



## हजारो वारकऱ्यांना साबण किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

आळंदी-पंढरपूर पायी वारी करणाऱ्या हजारो वारकरी बांधवांना आस्था रोटी बँकेच्या वतीने स्वच्छता साहित्याच्या साबण किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये झेंडू बाम, खोबरेल तेल, शाम्पू, अंगाला लावण्याचा साबण, कपडे धुण्याचा साबण, टूथपेस्ट आदी आवश्यक वस्तूंचा समावेश होता. या उपक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हभप सुधाकर इंगळे महाराज, मिहीर गांधी, नवजीवन दोशी, मयूर गांधी, वीरेंद्र दाभाडा, किरण जाधव, मोहन जाधव, प्रथमेश जाधव, निलेश गांधी, नितेश फडे आणि पल्लवी डोके उपस्थित होते. या सेवाकार्यात विनोद भोसले, पुष्कर पोकळे, विजय छंचुरे, सत्यम सोलापूरकर, स्नेहा मेहता, ज्योत्स्ना सोलापूरकर, संगीता छंचुरे आणि समृद्धी छंचुरे यांनी परिश्रम घेतले.




## सिध्देश्वर तलाव प्रदूषण रोखण्यासाठी वाईल्डलाईफ संस्थेचा पुढाकार

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

गणपती घाट परिसरात दररोज अनेक दशक्रिया विधी पार पडतात. मात्र, विधीनंतर कपडे, हार, नारळ, निर्माल्य तसेच अन्य पूजासाहित्य बाजूलाच असलेल्या श्री सिद्धेश्वर तलावात टाकले जात असल्याने तलावाच्या प्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रदूषणामुळे तलावातील जैवविविधतेलाही मोठा धोका निर्माण झाला असून, मागील आठवड्यातच कासवासारख्या वन्यजीवांच्या मृत्यूच्या घटनाही घडत असल्याची बाब समोर आली आहे. या गंभीर पर्यावरणीय समस्येची दखल घेत वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन या पर्यावरणवादी संस्थेने जनजागृतीचा पुढाकार घेतला आहे. संस्थेच्या वतीने गणपती घाट परिसरात नागरिकांना प्रबोधन करणारे फलक लावण्यात आले आहेत. या फलकांद्वारे दशक्रिया विधीनंतर पूजासाहित्य, कपडे, हार, नारळ व निर्माल्य तलावात न टाकण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी संस्थेचे अध्यक्ष अजित चौहान, सचिव संतोष धाकपाडे तसेच पर्यावरणप्रेमी सोमशेखर पाटील यांनी परिश्रम घेतले.

# बुधवारी वटवृक्ष मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव

### देवस्थानच्या वतीने जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ जुलै-**

बुधवार, दिनांक २९ जुलै रोजी श्री गुरुपौर्णिमा असुन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात गुरुपौर्णिमेस अनन्य साधारण महत्व आहे.

गुरुंचे गुरु, सदगुरुंचे गुरु म्हणजे येथील ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज होय. गुरुंचा महिमा म्हणजे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान. गुरुपौर्णिमेरोजी श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात नित्य नियमाने होणारी काकडआरती पहाटे ४ वाजता होईल. सालाबादाप्रमाणे भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता व भाविकांचे दर्शन सुलभतेने




होणेकरीता गुरुपौर्णिमेरोजी मंदीर रात्री २ वाजता उघडण्यात येईल. या दिवशी स्वामी भक्तांचे नित्यनियमाने होणारे अभिषेक होणार नाहीत. अभिषेकाची पावती केल्यास अंगारा प्रसाद मिळेल.

सकाळी ११ वाजता नैवेद्य आरती होईल. त्यानंतर सर्व स्वामी भक्तांसाठी दुपारी १२ ते ३ या वेळेत देवस्थानच्या मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील भक्त निवास येथे भोजन महाप्रसादाची सोय देवस्थानच्या वतीने करण्यात आली आहे. रात्री ७:५० ते रात्री ८:३० या वेळेत श्रींची शेजारती संपन्न होईल. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता महिला व पुरुष भक्तांची स्वतंत्र दर्शन रांग, पोलीस बंदोबस्त, वाहतुक पोलीस बंदोबस्त, बॅरेकेटींग दर्शन रांग, दर्शन रांगेत पिण्याच्या पाण्याची सोय, प्रथमोपचार केंद्र, वैद्यकीय सेवा, व्हीलचेअर इत्यादी सुविधांच्या माध्यमातून श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आल्याची माहिती मंदीर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली. गुरुपौर्णिमे निमीत्त आयोजीत सुविधांच्या माध्यमातून सर्व भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा, सेवेचा, व भोजनप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांनी केले आहे.




## वळसंग येथील शिबिरात ५७ जणांचे रक्तदान

**वळसंग, दि. २६ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त वळसंग जिल्हापरिषद गटाच्या वतीने वळसंग येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक श्रीशैल नरोळे तर दक्षिण सोलापूर गटनेते बलवान गोतसुर्वे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक अल्ताफ पटेल यांनी केले. यावेळी पंचायत समिती सदस्य पंचप्पा धनशेट्टी, श्रीशैल दुधगी, नटराज नरोळे, रमेश क्षीरसागर, सतीश इसापुरे, मलकप्पा कोडले, अल्ताफ पटेल, पिरसाब अमलीचुंगे, दाऊद अमलीचुंगे, सिद्धू तीपरादी, श्रीशैल माळी, इरफान शेख, अनिल बर्वे, महिबुब पटेल, मल्लिनाथ ढब्बे, धनंजय चौगुले, पंडित कोरे, पत्रकार कल्लय्या स्वामी, अशरफ पटेल, सोहेल अमलीचुंगे, मुश्ताक अमलीचुंगे, दगडू मुगळे उपस्थित होते.

## वडाळा येथे स्व.अजितदादा पवार यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

वडाळा येथील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्व शिक्षण संकुलाच्या वतीने उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मार्गदर्शक बळीरामकाका साठे होते. संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र साठे, संस्थेचे संचालक जयदीपराजे जितेंद्र साठे, प्राचार्य डॉ. शिरीष भोसले, मुख्याध्यापक संजय वाघमारे, सलमा मुलाणी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी काकासाहेब साठे यांनी स्व. अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेचे संचालक जयदीपराजे साठे, प्राचार्य डॉ. शिरीष भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार पत्रकार दत्ता मोकाशी यांनी केले.

# कृष्णा-नीरा पाणी वळविण्याच्या योजनेस मान्यता

### माजी खा. नाईक-निंबाळकर यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २६ जुलै-**

दुष्काळग्रस्त भागाच्या कायमस्वरूपी जलप्रश्नावर राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णा खोरे पाणी तंटा लवाद-१ अंतर्गत महाराष्ट्राला अनुज्ञेय असलेल्या पाण्याचा प्रभावी वापर करण्यासाठी कृष्णा नदीतील पाणी नीरा नदीमार्गे दुष्काळी भागात वळविण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेला मोठी चालना मिळाली आहे. या योजनेच्या सर्वेक्षण, अन्वेषण, संकल्पन आराखडा, अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी २४ कोटी ५ लाख ६७ हजार १२५ इतक्या खर्चास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जलसंपदा विभागाने२२ जुलै रोजी जारी केला आहे.

या प्रकल्पाअंतर्गत कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा नदीतील महाराष्ट्राच्या वाट्याचे उपलब्ध पाणी नीरा नदीमार्गे उजनी धरणापर्यंत आणून सातारा, सोलापूर, पुणे जिल्ह्यांतील दुष्काळी भागात वापरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी सापटेवाडी बंधारा (कृष्णा नदी) ते नीरा नदीवरील उद्धट बंधारा आणि उद्धट बंधारा ते उजनी धरण अशा दोन टप्प्यांत सर्वेक्षण, अन्वेषण आणि सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यात येणार आहे. या प्रकल्पामागे माजी खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा सातत्यपूर्ण आणि प्रभावी पाठपुरावा निर्णायक ठरला आहे.



> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त दुष्काळी भागातील जनतेला मोलाची भेट दिली आहे. हा ऐतिहासिक निर्णय भविष्यात सातारा, सोलापूर, पुणे जिल्ह्यांसह संपूर्ण दुष्काळी पट्ट्यासाठी वरदान ठरणार आहे. त्यामुळे दुष्काळी भागाच्या विकासासाठी नवे पर्व सुरू झाले असून लाखो शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे. दुष्काळी जनतेसाठी मुख्यमंत्र्यांच्या रूपाने जणू विठ्ठलच पावला आहे.
>
> **-चेतनसिंह केदार-सावंत,** जिल्हाध्यक्ष, भाजपा



## श्री शंकरलिंग प्रशालेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २६ जुलै-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील होतकरू व अभ्यासू अशा १५० विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष महाराष्ट्र राज्य यांच्याकडून स्कूल बॅग, वह्या व कंपास बॉक्स इत्यादी शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे, संचालक शिवशरण प्याटी, रमेश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके हे उपस्थित होते.याकरिता वरील कक्षाचे सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष अक्षय खांडेकर, सहाय्यक कैलास चौधरी, समन्वयक प्रवीण कोंडा यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, सिदधाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव, प्रा. शरणय्या मसुती, अजय माणकोजी, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रा. प्रतिभा ताडुरे वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, ग्रंथपाल निलकंठ चनशैट्टी, सेवक कट्टेप्पा कोळी, सुनिता कुर्ले आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग उपप्रमुख श्रीमंत भोसले यांनी मानले.

## स्व. पंचप्पा कल्याणशेट्टी हे शैक्षणिक प्रगतीचे शिल्पकार होते : इंगळे

**अक्कलकोट, दि. २६ जुलै-**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे वडील तथा लोकनेते शिक्षण महर्षी स्व.पंचप्पा कल्याणशेट्टी हे केवळ एक नेते नव्हते, तर अक्कलकोटच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीचे शिल्पकार होते असे मनोगत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांचे सुपूत्र व युवा नेते प्रथमेश इंगळे यांनी व्यक्त केले. स्व.पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या अकराव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त येथील भाजप कार्यालयात आयोजीत अभिवादन कार्यक्रमात इंगळे परिवारच्या वतीने युवा नेते प्रथमेश इंगळे यांनी स्व.पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन करून आदरांजली वाहिली. यावेळी स्व.पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रती असलेल्या इंगळे कुटूंबियांच्या भावना व्यक्त करताना युवा नेते प्रथमेश इंगळे बोलत होते. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी, तन्मय इचगे, तुषार मोरे, समर्थ भोसले, रमेश शिंदे सर, महेश मालक इंगळे उपस्थित होते.

## विचारपुष्प



सामान्यातला सामान्य माणूसही त्याच्यामधील गुणांचा विकास होत राहिल्यास असामान्य कर्तृत्वाचा धनी होऊ शकतो. आपला इतिहास दाखवतो की, अनेक महापुरुष साधारण परिवारातूनच आले आहेत.

**- भारतरत्न**
**स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# सीएसआर निधी वाटपात असमतोल

■ ८६३० कोटींपैकी ५१ टक्के निधी मुंबईत खर्च ■ मागास जिल्ह्यांसाठी तटपुंजी रक्कम खर्च



**नवी दिल्ली, २६ जुलै**

महाराष्ट्रात खर्च झालेल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतील सर्वाधिक वाटा आधीच विकसित असलेल्या जिल्ह्यांना अधिक मिळाला असून, खऱ्या अर्थाने गरज असलेल्या मागास जिल्ह्यांच्या वाट्याला मात्र अत्यल्प निधी आला आहे. पर्यायाने जिथे आधीच विकास आहे तिथेच अधिक विकास आणि जिथे विकासाची खरी गरज आहे, तिथे निधीचा दुष्काळ असा स्पष्ट विरोधाभास या खर्चातून समोर आला आहे.

सीएसआर निधीचा मुख्य उद्देश वंचित आणि मागास भागांचा विकास साधून समाजहिताचे प्रकल्प राबवणे हा असला, तरी राज्यात आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये निधी वाटपात असमतोल झाल्याचे केंद्र सरकारकडून जारी करण्यात आलेल्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यात एकूण ८६३०.८० कोटी रुपयांचा सीएसआर निधी खर्च करण्यात आला असून, या निधीच्या वितरणात मोठी तफावत दिसून आली. राज्यातील एकूण निधीपैकी ५१ टक्के म्हणजेच सर्वाधिक ४४३६.५६ कोटी रुपये एकट्या मुंबई जिल्ह्यात खर्च झाले. यानंतर पुणे (१८७१.१८ कोटी), ठाणे (३९३.४९ कोटी), नागपूर (२५५.३२ कोटी), रायगड (२४५.६० कोटी) आणि नाशिक (२२६.६४ कोटी) या आधीच विकसित असलेल्या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. याउलट, ज्या जिल्ह्यांना सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी या निधीची सर्वाधिक गरज आहे, त्यांच्या वाट्याला मात्र अतिशय तुटपुंजी रक्कम आली.

(वृत्तसंस्था)

### नागपूर वगळता विदर्भातील इतर जिल्ह्यांत अपुरा निधी

राज्यातील इतर भागांप्रमाणेच विदर्भातही सीएसआर निधीच्या वाटपात मोठी तफावत आहे. एकीकडे नागपूर जिल्ह्यात २५५.३२ कोटी रुपयांचा समाधानकारक सीएसआर निधी खर्च झाला असला, तरी गोंदिया (८.२७ कोटी), भंडारा (९.८९ कोटी), अकोला (१४.४६ कोटी), वाशीम (६.४२ कोटी) आणि हिंगोली (४.८५ कोटी) यांसारख्या जिल्ह्यांच्या वाट्याला अतिशय अल्प निधी आला. दुसरीकडे, खनिजसंपत्तीने समृद्ध असलेल्या चंद्रपूर (७३.१५ कोटी) आणि गडचिरोली (६२.५५ कोटी) या जिल्ह्यांना तुलनेने काहीसा अधिक निधी मिळाला असला, तरी तेथील गंभीर सामाजिक गरजा आणि भौगोलिक आव्हाने लक्षात घेता हा निधीही अत्यंत अपुरा आहे.

### भौगोलिक वितरण अत्यंत विषम

राज्यात सीएसआर निधीच्या खर्चात वाढ होत असली, तरी त्याचे भौगोलिक वितरण अत्यंत विषम असल्याचे चित्र आहे. बहुतांश कंपन्या आपला सीएसआर निधी प्रामुख्याने महानगरांमध्ये किंवा त्यांच्या उद्योग क्षेत्राच्या आसपासच खर्च करत असल्याने, आधीच विकसित असलेल्या भागांचा अधिक विकास होतो आणि दुर्गम तसेच आदिवासी जिल्हे विकासापासून वंचित राहतात. ही दरी भरून काढण्यासाठी आणि राज्याचा समतोल विकास साधण्यासाठी स्वतंत्र 'सीएसआर प्रोत्साहन धोरण' आवश्यक असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

### मराठवाड्यात संभाजीनगरला सर्वाधिक निधी

मराठवाड्याचा विचार केल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८६.९० कोटी रुपयांचा लक्षणीय सीएसआर निधी खर्च झाला, दुसरीकडे बीड (३१.४१ कोटी), धाराशिव (३८.४० कोटी), परभणी (२०.९५ कोटी), नांदेड (११.६९ कोटी) आणि जालना (१३.४९ कोटी) या जिल्ह्यांच्या वाट्याला तुलनेने अतिशय कमी निधी आला आहे. हे जिल्हे सततचा दुष्काळ, बेरोजगारी आणि शैक्षणिक मागासलेपणासारख्या गंभीर समस्यांशी झुंज देत असतानाही, त्यांच्या विकासासाठी सीएसआर निधीचा ओघ अत्यंत मर्यादित आहे.



मृत गाईजवळ उभा असलेला बैल

## वणव्यामुळे अडीच लाख नागरिक बेघर

**पॅरिस :** नैर्ऋत्य फ्रान्समध्ये भडकलेल्या भीषण वणव्यामुळे रविवारी रात्री ५५ हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले. वाईन उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या बोर्डो शहराच्या दिशेने आगीच्या ज्वाळा सरकत असताना, केवळ एकाच प्रदेशातून आपली घरे सोडून जाण्यास भाग पडलेल्या लोकांची एकूण संख्या आता तब्बल २,२०,००० वर पोहोचली आहे. दरम्यान, शेजारील स्पेनमध्येही देशाच्या पूर्व किनारपट्टीवर आगीमुळे लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.

## बब्बर खालसा गटाचा पर्दाफाश

**चंदीगड :** विदेशातून नियंत्रित केल्या जाणारा आणि पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय पुरस्कृत बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) या प्रतिबंधित दहशतवादी संघटनेचा पर्दाफाश करण्यात आला असून, जालंधरमधून संघटनेच्या सूत्रधाराला अटक केली. या कारवाईदरम्यान १.३ किलो उच्च श्रेणीची स्फोटके, तसेच छर्रे आणि बॉल बेअरिंग्ज भरलेला एक आयईडीही जप्त करण्यात आला. सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अत्यंत घातक हल्ला घडवून आणण्याची तयारी यातून दिसून येते, असे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले. योग्य वेळेवर केलेल्या कारवाईमुळे दहशतवादाचा एक मोठा धोका टळला.

# २४ तास उलटले, तरी तो तिलाच उठवत राहिला!

### मृत्यूनंतरही न तुटलेली यारी...

**डॉ. संदीप लोंढे**

**आजनसरा, २६ जुलै**

आषाढी एकादशीच्या दिवशी विठ्ठलनामाच्या गजरात भक्तीचा महासागर उसळला होता. पण, हिंगणघाटच्या नांदगाव चौक उड्डाणपुलाजवळ एका मुक्या जीवाची अशी वेदना उभी राहिली की ती पाहून प्रत्येकाचे डोळे नकळत पाणावले. अज्ञात वाहनाच्या धडकेत एका गायीचा मृत्यू झाला. मात्र, तिचा सोबती असलेला बैल २४ तासांपासून तिच्या मृतदेहाजवळून हलायला तयार नव्हता. तो पुन्हा पुन्हा तिच्या अंगावर डोके टेकवतो, हंबरतो, जणू म्हणतोय... उठ ना... अजून आपल्याला खूप दूर जायचं आहे! मुक्या जीवाची ही माया पाहून दगड मनाच्या मानसालाही पाझर फुटावा, असे चित्र अनेकांनी कॅमेराबद्ध केले.

सर्वत्र विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल... या नामघोषाने वातावरण भारावले होते. अशा भक्तिमय दिवशी नांदगाव चौक उड्डाणपुलाजवळ घडलेल्या एका अपघाताने संवेदनशील मनांना खोल जखम दिली. अज्ञात वाहनाच्या धडकेत एका गौमातेचा जागीच मृत्यू झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला तिचा निर्जीव देह आणि त्याच्या शेजारी उभा असलेला तिचा जिवलग सोबती बैल...

चोवीस तासांहून अधिक काळ तो बैल त्या मृतदेहापासून एक पाऊलही दूर गेला नाही. अधूनमधून तो तिच्या अंगावर डोके टेकवतो, अलगद हुंगतो आणि काळीज चिरून टाकणाऱ्या आवाजात हंबरतो. त्या प्रत्येक हंबरड्यात एकच आर्त हाक दडलेली असल्याचा भास होतो... उठ ना... मी आलोय... आपल्याला एकत्र जायचं आहे... काही वेळाने स्वतःच्या पायाने जमीनही उखरतो. त्या गो मातेच्या अंगावर बसलेल्या माशाही उडवतो.

बैल आणि ती गोमाता नेहमी एकत्रच दिसायचे. रस्त्यावर हिंडणे, अन्न शोधणे, विश्रांती घेणे... त्यांची प्रत्येक वाट एकच होती. पण, नियतीने एका क्षणात त्यांची साथ हिरावून घेतली. मृत्यूने गाईचा श्वास थांबवला असला तरी या बैलाची मैत्री थांबवू शकली नाही. हे दृश्य पाहण्यासाठी अनेक नागरिक थांबत आहेत. रस्त्यावरून जाणारे वाहनचालक आणि नागरिक हे दृश्य बघून सुन्न होत आहेत. काहींचे डोळे पाणावले, काहींनी गाईला फुलं वाहून श्रद्धांजली वाहिली. माणूस स्वार्थासाठी नाती तोडतो, पण या मुक्या प्राण्याने २४ तास उपाशी-तापाशी मृत सोबत्याला दिलेला हा प्रामाणिकपणाचा दाखला आहे. नागरिकांनी गोसेवा संस्थेला आणि प्रशासनाला याबाबत कळवले. पण, तो बैल अजूनही तिचा देह राखतोय. जणू शेवटपर्यंत सोबत निभावण्याची शपथ घेतली असावी.

# मोदी सरकारच्या कार्यकाळात वैद्यकीय शिक्षणाच्या संधीत वाढ : हंसराज अहिर

### जागांच्या संख्येत १५३.२२ टक्क्यांची वाढ

२०१४- १५ मध्ये शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालये मिळून ५४०७९ जागा होत्या, २०२६- २७ मध्ये ही संख्या १३६९३९ झाली. म्हणजे वैद्यकीय प्रवेशाच्या जागांत ८२८६० ची वाढ झाली. २०१६ ते २०२६ या दहा वर्षांच्या कार्यकाळात देशातील शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या संख्येत १०३.७१ टक्क्यांची तर जागांच्या संख्येत १५३.२२ टक्क्यांची वाढ झाली, असे अहिर म्हणाले.

**नवी दिल्ली, २६ जुलै**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या विशेषतः वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी संधी उपलब्ध झाली असल्याचे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांनी केले.



२०१४ १५ मध्ये देशात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची शिक्षा १८९ होती, २०२६ २७ मध्ये वाढून ती ४४१ झाली, याकडे लक्ष वेधत अहिर म्हणाले की, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाची संख्या २१५ वरून ३८२ झाली.

२०१४ १५ मध्ये शासकीय आणि खाजगी मिळून देशात ४०४ वैद्यकीय महाविद्यालये होती, २०२६ २७ मध्ये ती ८२३ झाली, म्हणजे गेल्या दहा वर्षात शासकीय आणि खाजगी महाविद्यालयांच्या संख्येत ४१९ ने वाढ झाली, असे अहिर म्हणाले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात २०१४ १५ मध्ये २५६२४ जागा होत्या, २०२६ २७ मध्ये जागांच्या संख्येत दुपटीपेक्षा जास्त वाढ होऊन त्या ६३२९६ झाल्या, असे स्पष्ट करत अहिर म्हणाले की, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील जागाही २८४५५ वरुन ७३६४३ वर पोहोचल्या.

२०१३ मध्ये खाजगी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेसाठी ७१७१२७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, मोदी सरकारच्या कार्यकाळात २०१६ मध्ये नीट परीक्षेसाठी ८०२५९२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. २०२५ ही संख्या २२७६०६९ वर पोहोचली, तर २०२६ मध्ये ती २२७९७४३ झाली आहे.

(तभा वृत्तसेवा)

## समुद्रात नौका बुडाली; ११ पर्यटकांचा मृत्यू

**पालू :** इंडोनेशियातील सुलावेसी बेटाजवळ एक परदेशी पर्यटक प्रवास करत असलेली एक नौका समुद्रात बुडाली, यात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर दोघांना वाचवण्यात यश आले. नौकेत एकूण १३ जण होते आणि ते तांजुंग उनाउना रीजन्सीमधून गोरोंतालो प्रांतातील मारिसा बंदराकडे निघाले होते. नौका बेपत्ता झाल्यानंतर शोधमोहीम राबवण्यात आली. या नौकेत ११ युरोपियन पर्यटक आणि दोन स्थानिक कर्मचारी होते. पोहोता येत असल्याने दोन स्थानिक कर्मचारी बचावले.



तिन्ही सेनादलांचे प्रमुख जनरल एन,एस. राजा, उपलष्करप्रमुख ले. जनरल संदीप जैन, नौदलप्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन आणि हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांनी कारगिल विजय दिवसानिमित्त नवी दिल्ली येथील राष्ट्रीय युद्ध स्मारकाला सलामी देत हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

# यापुढे निवडणूक लढणार नाही

### माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांची घोषणा

**बंगळुरू, २६ जुलै**

आजचे राजकारण पूर्णपणे भ्रष्ट झाले आहे. त्यामुळे मी २०२८ ची विधानसभा निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, मी राजकारणात सक्रिय राहीन आणि जनतेच्या सुख-दुःखाचा आवाज बनून त्यांच्यासाठी काम करेल अशी घोषणा कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते सिद्धरामय्या यांनी केली. सिद्धरामय्या यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, वरुणा मतदारसंघातील जनता मला पुन्हा एकदा निवडणूक लढण्याची विनंती करत आहे, परंतु मी भविष्यात कोणतीही निवडणूक न लढण्याचा ठाम निर्णय घेतला आहे.

पूर्वी जेव्हा मी निवडणूक लढवायचो, तेव्हा मतदारसंघातील जनताच आमच्यासाठी निधी गोळा करायची आणि आम्हाला विजयी करायची. पण आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.



पाच दशकांत मी जय आणि पराजय दोन्ही पाहिले आहेत. पण मी कधीही माझ्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. आज परिस्थिती अशी झाली आहे की निवडणूक लढण्यासाठी नेत्यांना जनतेला पैसे द्यावे लागतात. (वृत्तसंस्था)

### राजकारण भ्रष्ट

राजकारण पूर्णपणे भ्रष्ट झाले असून प्रामाणिक राजकारणासाठी आता जागा उरलेली नाही. याच परिस्थितीचा विचार करून मी भविष्यात निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला आहे. माझे उर्वरित आयुष्यही जनतेच्या सेवेसाठी आणि त्यांच्या हितासाठीच समर्पित राहील.

# पाकिस्तानात पुराचे थैमान, २८ जण ठार

**इस्लामाबाद, २६ जुलै**

पाकिस्तानच्या विविध भागात सध्या पुराने थैमान घातले असून, पंजाब प्रांताला सर्वाधिक फटका बसला आहे. पूर, भूस्खलन आणि घरांच्या पडझडीत गेल्या २४ तासांत २८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ३५ पेक्षा अधिक बेपत्ता आहे. पूरसदृश्य परिस्थितीमुळे आतापर्यंत दोन लाखांपेक्षा अधिक लोक स्थलांतरित झाले. विविध महामार्गांवरील वाहतूक ठप्प असून, दुर्गम भागाचा संपर्क तुटला आहे.

पंजाब प्रातांत मुसळधार पावसामुळे पुराचे पाणी निवासी भागात शिरल्याने अनेक घरे कोसळली असून, पशुधनही दगावले आहे. प्रांतीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मदतकार्य तीव्र केले असले, तरी संततधार पावसामुळे व्यत्यय येत असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्याने दिली. विविध घटनांमध्ये दोन मुलांसह २८ जणांचा मृत्यू झाला असून, २० जण जखमी आहेत. याशिवाय ३५ हून अधिक अजूनही बेपत्ता असून, त्यांचा शोध सुरू आहे. अनेक घरांची छते कोसळून लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले, तर काहींचा बुडून आणि विजेचा धक्का लागून मृत्यू झाला आहे. संततधार पावसामुळे अनेक भागांतील जनजीवन विस्कळीत झाले असून, प्रशासन मदत आणि बचावकार्यात गुंतले आहे. अनेक भागांतील मातीच्या आणि जुन्या घरांना मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. बाधित भागांमध्ये मदत आणि बचावकार्य सुरू असून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. (वृत्तसंस्था)



**मुसळधार पावसामुळे रस्त्याला तलावाचे स्वरूप आले असून, मोठ्या प्रमाणात नागरिक स्थलांतरित झाले आहे**

# उबाठा-मनसेचा जल्लोष मोर्चा

### राज-उद्धव ठाकरेंची सरकारवर टीका

**मुंबई, २६ जुलै**

आज कोणतीही निवडणूक नाही, पण अंधभक्तांच्या विरोधात देशभक्त जिंकले आहेत. हा संघर्ष भाजपा विरुद्ध भारत असा आहे, यात आपण सर्वजण जात-पात धर्म विसरून मी देशभक्त आहे या एकच भावनेने एकत्र आला. जंतमंतरवरील आंदोलनाने केंद्र सरकार झोपेतून जागे झाले. झुरळांनी सरकारला नमवले, अशी टीका उबाठाचे नेते उद्धव ठाकरे यांनी केंद्रावर टीका केली.

उबाठा आणि मनसेने रविवारी शिवाजी पार्कवर संयुक्त जल्लोष मोर्चा काढला. यावेळी मनसेप्रमुख राज ठाकरे आणि विरोधी पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना उद्धव ठाकरे म्हणाले, केंद्र सरकारमधील मंत्री पक्ष फोडण्यात व्यस्त असुन, त्यांना विभागात काय चालले, याचे भानच राहिले नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारमन घसरत्या रुपायबद्दल बोलत नाहीत, पण पेपरफुटीचे फायदे सांगत आहेत. राजनाथसिंह प्रधान यांच्या संरक्षणसाठी पुढे आले.

### 'बेगाने शादी में अब्दुल्ला दिवाना' : शिंदे

बांगलादेश, श्रीलंका आणि इतर देशांप्रमाणे भारतातही अराजकतेचे वातावरण निर्माण करण्याचा विरोधकांचा डाव होता. मात्र देशातील जनतेने तो पूर्णपणे उधळून लावला. आंदोलनात अराजकता पसरवण्याचे काम राज्यातील काही नेत्यांनी केले. पण महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना आधीच नाकारले आहे. विद्यार्थ्यांनीही त्यांचे राजकारण फेटाळून लावले. आंदोलन संपताच त्यांचा संपूर्ण राजकीय अजेंडा कोसळला. आंदोलन संपल्याने राजकीय दुकान मांडणाऱ्यांचा हिरमोड झाला. 'बेगाने शादी में अब्दुल्ला दिवाना' अशी त्यांची अवस्था झाली, असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे बंधुंना लगावला.

**इतिहासात होणार आंदोलनाची नोंद**

राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्राच्या पोलिसांचे मी आभार मानतो. त्यांनी दिल्लीतील पोलिस आणि महाराष्ट्राचे पोलिस कसे आहेत हे दाखवून दिले. त्यांनी खरोखर चांगले काम केले आणि सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाची इतिहासात नोंद झाल्याशिवाय राहणार नाही. या देशातील जेन झी सरकारच्या झिंज्या उपटतात, हे आपल्याला या आंदोलनातून कळले आहे.

(वृत्तसंस्था)

# वादग्रस्त नाणे चलनात आणणार



### नेपाळचे भारतविरोधी पाऊल; तणाव वाढणार

**काठमांडू, २६ जुलै**

नेपाळची मध्यवर्ती बँक, नेपाळ राष्ट्र बँकेने (एनआरबी) नवीन १ रुपयाचे नाणे जारी करणार असल्याची घोषणा केली. या नाण्यावर नेपाळचा वादग्रस्त नकाशा असेल, ज्यामध्ये लिम्पियाधुरा, लिपुलेख आणि कालापानी हे भाग दर्शवले आहेत. पंतप्रधान बालेन शाह यांच्या आदेशावरून बँकेने ही घोषणा केल्याने द्विपक्षीय संबंधात तणाव येण्याची शक्यता आहे. भारताने या वादग्रस्त नकाशावर यापूर्वीच आक्षेप घेतला आहे. यापूर्वी, नेपाळने लिपुलेख खिंडीमार्गे कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्यावरून भारत आणि चीनकडे आक्षेप नोंदवला होता. तथापि, भारताचा दावा आहे की हे तीनही भाग त्याच्या उत्तराखंड राज्याचा भाग आहेत आणि हा प्रश्न परस्पर संवादाने सोडवला पाहिजे. मे २०20 मध्ये, तत्कालीन केपी शर्मा ओली सरकारने नेपाळच्या अधिकृत नकाशात या भागांचा समावेश केला होता. आता बालेन सरकारनेदेखील ओली सरकारचे धोरण राबवण्याचा अट्टाहास करत आहे. अशातच नेपाळ राष्ट्र बँकेचे प्रवक्ते गुरु प्रसाद पौडेल यांनी सांगितले की, एनआरबीला अद्याप नवीन नाण्याचे डिझाइन अधिकृतपणे मिळालेले नाही, परंतु आम्हाला खात्री आहे की त्यावर नकाशा असेल. आम्ही एक नवीन १ रुपयाचे नाणे जारी करणार आहोत. त्याचा आकार आणि धातू बदलला जाईल, ज्यामुळे ते पूर्वीच्या नाण्यापेक्षा लहान आणि हलके होईल.

## निवडणूक लढण्याचे वय २१ वर्षे करण्याचा प्रस्ताव

**हैदराबाद, २६ जुलै**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लढवण्यासाठी किमान वय २५ वर्षांवरून २१ वर्षांपर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून, तो केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. यासंदर्भातील विधेयक पारित करण्यासाठी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात येणार असल्याची माहिती तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी रविवारी दिली.

माध्यमांशी बोलताना रेड्डी म्हणाले, देशाच्या लोकसंख्येत तरुणांचा वाटा ३० टक्के आहे, परंतु लोकसभेत त्यांचे प्रतिनिधित्व एक टक्क्याहूनही कमी आहे. २१ वर्षांवरील तरुण मंत्री बनले, तर देशाचे भविष्य बदलेल. यासाठी संविधानात दुरुस्ती करण्याची गरज आहे. मुख्यमंत्र्यांनी उदाहरण देत सांगितले की, जर्मनी आणि ब्रिटनमध्ये १८ वर्षांचा तरुण पंतप्रधान आणि राष्ट्रपती बनू शकतो. सिंगापूरमध्ये २१ वर्षांचा व्यक्ती पंतप्रधान बनू शकतो.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# आंदोलनाच्या सांगतेनिमित्त...

लोकतांत्रिक देशात सरकारे बदलत असतात. निवडणुकीच्या प्रक्रियेतून एक पक्ष सत्तेतून बाहेर जातो, दुसरा येतो. पण, व्यवस्था मात्र तीच राहते. या व्यवस्थेत काम करणारे लोक कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील असावेत, अशी अपेक्षा असते. काही प्रामाणिक आणि जनतेची कामे करणारी असतातच; पण दुर्दैवाने ही व्यवस्था चालविणारी बहुतांश माणसे गेंड्याच्या कातडीची, बेईमान आणि भ्रष्ट असल्याचे वारंवार दिसून येते. अशा बेईमानांमुळे व्यवस्थेत निर्माण झालेल्या भेगांमधूनच जंतरमंतरवर काँग्रेस जनता पार्टीचे आंदोलन उभे राहिले. युवाशक्तीच्या भावना समजून घेत सरकारने ते आंदोलन अत्यंत कुशलतेने हाताळले. प्रतिष्ठेचा मुद्दा न करता लवचीकता दाखवत आंदोलनकर्त्यांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला गेला आणि २६ दिवस चाललेल्या आंदोलनाची सकारात्मक सांगता झाली. हे आंदोलन आणखी दीर्घ काळ चालावे, ते चिघळावे, हिंसाचार व्हावा, राजधानी दिल्लीत आणि देशाच्या कानाकोपऱ्यात गोंधळ निर्माण व्हावा, यासाठी देशविरोधी तत्त्वांनी प्रयत्न केले. त्यांना विरोधी पक्षांनी साथ दिली. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार संवेदनशील व सकारात्मक असल्याने त्यांचे सारे प्रयत्न फोल ठरले.

अलिकडच्या काळात श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ या आपल्या शेजारी देशांमध्ये युवकांनी केलेल्या आंदोलनांमुळे सरकारे बदलली. पण, या देशांमधील सत्ताबदल हा हिंसक स्वरूपाचा होता. आंदोलकांनी सार्वजनिक आणि खाजगी संपत्तीची हानी करीत लूटमार केल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यातील काही आंदोलनांना धर्माची किनारही होती. शेजारी देशांत जे काही घडले, त्याची तुलना भारतातील जेन-झीच्या आंदोलनाशी होऊ शकत नाही. कारण, जंतरमंतरवरील आंदोलनात किरकोळ घटना वगळता फारशी अप्रिय घटना घडली नाही. गर्दीला मेंदू नसतोच. तरीही युवा पिढीची ही गर्दी बरीच संयमित राहिली. तब्बल २६ दिवस युवकांनी शांततेत आंदोलन केले. व्यवस्थेतील उणिवा दूर करण्यासाठी प्रसंगी युवक मोठे आंदोलन उभे करू शकतात, विद्यार्थ्यांची चळवळ उभी राहू शकते, हे या आंदोलनाने सिद्ध केले. अशा आंदोलनाच्या उभारणीत आणि युवाजनांना एकमेकांशी जोडण्यात नवमाध्यमे महत्त्वाची भूमिका बठवू शकतात, हे सुद्धा या आंदोलनातून दिसून आले. विद्यार्थ्यांचे जीवनात परीक्षा हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असतो. स्पर्धात्मक परीक्षांचे महत्त्व त्यातही मोठे असते. त्यामुळे परीक्षा घेणाऱ्या संस्थेची आणि त्यामध्ये काम करणाऱ्यांची विश्वासार्हता संशयातीत असणे आवश्यक असते. तथापि, काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे एनटीएच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. सरकारने या भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध अत्यंत कठोर निर्णय घेत त्यांना घरचा रस्ता दाखविला. एकाचवेळी या स्तरावरील ७७ अधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखविण्याची ही देशातील पहिलीच मोठी कारवाई असावी. ही कारवाई सनदी नोकरशाही व्यवस्थेने ठाण मांडून बसलेल्या झारीतल्या शुक्राचार्यांसाठी मोठा धडा ठरली आहे. पैशासाठी युवकांच्या जीवनाशी खेळणाऱ्या या अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईमुळे भविष्यात अधिकारी भ्रष्ट वर्तन करण्यापूर्वी हजारवेळा विचार करतील, एवढी ही कारवाई धडक होती. त्यासाठी सरकारचे कौतुक केले पाहिजे. युवकांच्या भावनांची दखल घेत शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. तसा नीटच्या पेपरफूट प्रकरणाशी धर्मेंद्र प्रधान यांचा प्रत्यक्ष काहीही संबंध नव्हता. तरीही लोकशाहीत जबाबदारी निश्चित करण्याची पद्धत आहे. या विभागाचे मंत्री म्हणून जबाबदारीच्या भूमिकेतून धर्मेंद्र प्रधानांनी पद सोडले. उत्तरदायित्व स्वीकारण्याच्या संदर्भात धर्मेंद्र प्रधान यांनी जे उदाहरण स्थापित केले आहे, ते राजकीय असो की सनदी, सर्व व्यवस्थांसाठी आदर्श ठेवावा असेच आहे. आता तरी, आपण जनतेचे जावई नव्हे तर नोकर आहोत, सेवक आहोत हे सनदी व्यवस्थेतील मस्तवाल धेंडांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. यापुढे प्रत्येक मंत्र्यालाही दक्ष राहावे लागणार आहे. आपल्या खात्यात कार्यरत अधिकाऱ्यांची सतत झाडाझडती घेत राहावे लागणार आहे, असाही या घटनाक्रमाचा सांगावा आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून आणखी एक गोष्ट पुढे आली आणि ती म्हणजे आंदोलन चिघळविण्याचे विरोधकांचे मनसुबे होते. काही विघातक शक्तीही त्यांच्या सोबत होत्या. साऱ्यांचे मनसुबे पुरते उधळले गेले. सरकार आणि आंदोलक या दोन्ही बाजूंकडून या गदारोळात राजकीय पोळी शेकू पाहणाऱ्यांना जागा दाखविली गेली. प्रथम सोनम वांगचुक आणि त्यानंतर अभिजित दीपके यांनी शांततेने आंदोलन सुरू ठेवले होते. त्यात शरद पवार, राहुल गांधी, प्रियांका वढेरा, अखिलेश यादव, उद्धव ठाकरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन युवकांची माथी भडकविण्याचा प्रयत्न केला. आंदोलनाच्या शेवटच्या दोन दिवसांत राहुल गांधी आणि काँग्रेसच्या नेत्यांनी थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ ठिय्या आंदोलन करीत प्रसिद्धी मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. सरकारने तेथील आंदोलनही कुशलतेने हाताळले आणि विद्यार्थ्यांच्या चळवळीचे राजकीयीकरण करण्याचा विरोधकांचा कुटिल डाव हाणून पाडला. देशाच्या अन्य भागांतही आंदोलने झाली. काही अप्रिय घटना घडल्या. मुंबईतही आझाद मैदानावर आंदोलन झाले. पण, हे आंदोलन शांततेत चालले. महाराष्ट्रात ज्यांचे राजकीय अस्तित्व पणाला लागले आहे, त्या ठाकरे बंधूंनी जंतरमंतरवरील आंदोलनाचा फायदा घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर, या मार्गावर त्यांनी मोर्चाचे आयोजन केले होते. यानिमित्ताने राजकीय वातावरण तापविण्याचे त्यांचे प्रयत्न होते. काँग्रेस पक्षही या मोर्चात सहभागी होणार होता. निवडणुकांमध्ये महाराष्ट्राच्या जनतेने दोन्ही ठाकरे बंधूंना भुईसपाट केले आहे. जंतरमंतरवरील आंदोलनाचा फायदा घेऊन आपल्या कार्यकर्त्यांना उत्साहाचे उधारीचे इंजेक्शन देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. परंतु, सरकार व आंदोलक यांच्यात चर्चा होऊन आंदोलन संपुष्टात आल्याने ठाकरे बंधूंचे मनसुबे पुरते उधळले गेले. युवकांचे आंदोलन हायजॅक करून सरकारला अडचणीत आणण्याचा कट हाणून पाडला गेला आणि विरोधकांना भाव देण्याची गरज पडणार नाही अशी स्थिती सरकारने निर्माण केली. विरोधक शेवटपर्यंत धडपडत आणि चाचपडत राहिले. सरकारने विरोधकांशी चर्चा केली नाही. विरोधकांना आपल्याला भाव मिळावा असा प्रयत्न जरूर केला. पण, ज्या युवकांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन चालविले, त्यांच्याशीच थेट बोलणी करीत सरकारने काँग्रेससह साऱ्याच विरोधकांची हवाच काढली. सारांश, युवाशक्तीचे आंदोलन आजही उभे होऊ शकते, हे या आंदोलनामुळे दिसले. सरकारला अशी आव्हाने पेलता येतात हेही यावेळी सिद्ध झाले. त्याहून महत्त्वाचे म्हणजे सत्तेच्या दूर राहून विरोधक कासावीस झालेले असून, त्यांना सरकारच्या पोळ्या शेकण्यासाठी कोणताही मुद्दा पुरू शकतो, हेही या आंदोलनादरम्यान दिसले. तात्पर्य असे की, सरकार आणि आंदोलक या दोन्ही बाजूंच्या भूमिका योग्यरीत्या वठविल्या गेल्या. पण, विरोधकांना त्यात विधायक योगदान देता आले नाही. विरोधकांना या आंदोलनात मध्यस्थी करण्याची संधी होती. ती त्यांनी घेतली नाही. कारण त्यांना अन्य कोणत्याही मुद्द्यापेक्षा राजकारण महत्त्वाचे वाटले. विद्यार्थ्यांच्या नाराजीवर स्वतःचे राजकारण पुढे नेण्याचा विचार महत्त्वाचा वाटला. विधायकतेच्या संदर्भात विरोधकांची विश्वासार्हता शून्य असल्यामुळे त्यांची कोणतीही मदत घेण्यास किंवा त्यांच्या हाती बाहुले बनण्यास युवाशक्तीने नकार दिला हे चांगलेच झाले. विरोधक या आंदोलनाचे म्होरके म्हणून वावरले असते तर त्याला राजकारणाचेच स्वरूप आले असते. कदाचित विद्यार्थ्यांचे प्रश्न मागे पडले असते. तसे न होता आंदोलनाची सांगता झाली, याचे समाधान कोणत्याही देशभक्ताला वाटेल. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# गयालालची 'साठी'!

गयालाल! हरयाणाच्या राजकारणात देवीलाल, भजनलाल, बंसीलाल हे तीन 'लाल' प्रसिद्ध की कुप्रसिद्ध मानले गेले. मात्र, देशाच्या राजकारणावर अमिट छाप सोडली ती गयालाल यांनी? कोण हे गयालाल?

५९ वर्षांपूर्वी १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत हरयाणातील तेव्हाच्या हसनपूर, आता होडल या मतदारसंघातून निवडून आलेले गयालाल हे एक अपक्ष आमदार! हरयाणात कोणत्याही पक्षास बहुमत मिळाले नव्हते. सत्ता टिकविण्यासाठी काँग्रेस पक्षाला केवळ एका आमदाराची गरज होती. काँग्रेसची नजर गरीब चेहरा असलेल्या गयालालांवर गेली. गयालाल यांनी काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. सकाळी ११ वा. पत्रपरिषद घेत त्यांनी आपला निर्णय घोषित केला. चार तासांनी म्हणजे दुपारी ३ वाजता गयालाल यांनी पुन्हा पत्रपरिषद बोलविली. त्यांनी विरोधी पक्षांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. पाच तासांनी म्हणजे रात्री ८ वा. गयालाल यांनी दिवसातील तिसरी पत्रपरिषद बोलविली आणि पुन्हा काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांच्या बाजूला बसलेले काँग्रेस नेते राव बीरेंद्रसिंग उद्‍गारले, 'गया राम, अब आया राम है'! आणि तेव्हापासून देशाच्या राजकारणात 'आया राम गया राम'- हा शब्दप्रयोग रूढ झाला. नंतर अनेक खासदार-आमदारांनी पक्षांतर केले. पण, ९ तासांत तीन वेळा पक्ष बदलण्याचा गयालाल यांचा 'विक्रम' आजवर कुणालाही मोडता आलेला नाही.

**बदललेले दृश्य :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. आणि यातील नजरेतून न सुटणारी बाब म्हणजे दोन्ही सभागृहांचे बदललेले दृश्य. राज्यसभेत आम आदमी पक्षाचा १० खासदारांचा गट आता तीनवर येऊन ठेपला आहे. ७ खासदार सत्तारूढ पक्षात गेले आहेत तर लोकसभेत ठाकरे गटाची शिवसेना, ममता बॅनर्जींची तृणमूल काँग्रेस विभाजित होत- त्यातील एक भाग सत्तारूढ गोटात दाखल झाला आहे. पक्षफुटीची ही सारी प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहेत.

**१८ वर्षांनंतर :** भारतीय राजकारणाला पक्षबदलाची कीड १९६७ च्या गयालाल प्रकरणाने लागली, पण त्यावर उपाययोजना करण्यासाठी १९८५ साल उजाडावे लागले, जेव्हा राजीव गांधी सरकारने ५२वी घटनादुरुस्ती करीत घटनेच्या १०व्या परिशिष्टात दुरुस्ती करून पक्षांतराला आळा घालण्याचा प्रयत्न केला.

**सर्वांत मोठी त्रूट :** राजीव गांधी सरकारने पारित करविलेल्या पक्षांतरविरोधी कायद्यातील सर्वांत मोठी त्रूट म्हणजे- पक्षांतर करणाऱ्या सदस्यांच्या विरोधात 'अपात्र'तेची कारवाई करण्याचे अधिकार तर सभापती वा अध्यक्षांना देण्यात आले होते, पण, स्वतः लोकसभा सभापती वा विधानपरिषद अध्यक्ष यांनी पक्षबदल केल्यास त्यांना तसे करण्याची परवानगी देण्यात आली होती. म्हणजे एकप्रकारे-पक्षांतर विरोधी कायद्याचे नैतिक अधिष्ठानच पोकळ-कमजोर करण्यात आले होते.

**फुटीला राजमान्यता? :** राजीव गांधी सरकारने आणलेला पक्षांतरविरोधी कायद्याचा फायदा न होता उलट तोटाच झाला. त्यापूर्वी पक्षांतर 'चिल्लर' स्वरूपात म्हणजे व्यक्तिगत होत होते. या कायद्यानंतर त्याला 'सामूहिकता' आली. याने पक्षफुटीची नवी पद्धत भारतीय राजकारणात सुरू झाली. त्यात एकतृतीयांश - खासदार-आमदार यांनी फुटीर गट स्थापन केल्यास- त्या सदस्यांचे सदस्यत्व कायम राखण्यास मदत झाली. म्हणजे पक्षांतर केल्यास खासदारकी वा आमदारकी जाण्याची भीती वा टांगती तलवार या कायद्याने दूर केली.

**पुन्हा १८ वर्षांनंतर :** १८ वर्षांनंतर पुन्हा या कायद्यात बदल करून कारवाईच्या तलवारीला धारदार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तेव्हा केंद्रात अटलबिहारी वाजपेयींचे सरकार होते. ९१वी घटनादुरुस्ती करीत या कायद्यात काही महत्त्वाचे बदल करण्यात आले व सभागृहाचे सभापती वा अध्यक्ष यांनाही कायद्याच्या चौकटीत आणण्यात आले. हा एक मोठा व आवश्यक बदल होता.

**फूट आणि विलय :** १९८५ सालचा राजीव सरकारने तयार केलेला कायदा व २००३ मध्ये वाजपेयी सरकारने केलेला कायदा यातील सर्वांत महत्त्वाचा व मोठा फरक म्हणजे पहिल्या कायद्यात 'फूट' (स्प्लिट) हा शब्द वापरण्यात आला होता तर दुसऱ्या सुधारित कायद्यात 'विलय' (मर्जर) हा शब्द वापरण्यात आला आहे. ही सारी प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद पूर्ण होण्यासाठी पडून आहेत.

**भाजप नाही :** पक्षफुटींच्या या प्रकरणांमागे भाजपचा हात नसल्याचे सांगितले जाते. ममता बॅनर्जी, अभिषेक बॅनर्जी यांच्या नेतृत्वविरोधात असलेला असंतोष, महाराष्ट्र व पंजाबमधील स्थानिक मुद्दे या कारणांनी ही फूट घडली. पण, जनतेत याची फार चांगली प्रतिक्रिया नाही. मग, यावर उपाय म्हणून तिसरा कायदा आणावा काय- अशी चर्चा घटनातज्ज्ञांमध्ये केली जात आहे. यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे- फूट प्रकरणांचा निर्णय- सभापतींनी विशिष्ट कालावधीत द्यावा असे कोणतेही बंधन त्यांच्यावर घालण्यात आलेले नाही. आणि प्रारंभीच्या काळात-सभापतींच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचीही परवानगी संबंधित पक्षांना नव्हती.

**अभूतपूर्व युक्तिवाद :** लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद यामध्ये घडणाऱ्या घटनांबाबत संबंधित सभागृहाच्या अध्यक्षाचा निवाडा अंतिम असतो. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयालाही बोलण्याचा अधिकार नाही- असे मानले जाते. सभापतींचा हा अधिकार आजही मान्य केला जातो. मात्र, पक्षात फूट पडण्याची प्रक्रिया-घटना-सभागृहाबाहेर घडत असल्याने- त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार दुसऱ्या गटास आहे- हे मान्य करण्यात आले. म्हणजे सभापतींचा अधिकार फक्त आणि फक्त सभागृहात घडणाऱ्या घटनांबाबत आहे. पण, संसद परिसरात एखादी घटना घडली असेल तरी ती सभापतींच्या अधिकार क्षेत्रात येत नाही. आणि म्हणूनच पक्षफूट वा पक्षांतराची प्रकरणे- सर्वोच्च न्यायालयाकडे जाऊ लागली.

**कालमर्यादा नाही :** सर्वोच्च न्यायालयातही अशा प्रकरणांच्या निवाड्यासाठी- कोणतीही कालमर्यादा नाही. याने सामान्य जनतेच्या मनात मात्र- पक्षांतर व एकूणच राजकारण याबाबत चिंता-राग या भावना तयार होत आहेत. आणि निकोप लोकशाहीसाठी हे योग्य मानले जात नाही. मग, पक्षांतरविरोधी कायदा रद्द करून सरसकट सर्वांना पक्षांतरासाठी मोकळीक द्यावी असाही एक युक्तिवाद केला जात आहे. यात मग अंतिम निवाडा- जनता जर्नादन करील हा यामागचा युक्तिवाद आहे.

**न्यूझीलंडचा कायदा :** जगातील एक स्वच्छ व सुंदर देश म्हणजे न्यूझीलंड. या देशात पक्षांतराबाबत कायदा फार कठोर आहे. एखादा सदस्य त्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आला असेल, त्याला आपला पक्ष सोडावयाचा असल्यास, त्याला आपले सदस्यत्वही म्हणजे खासदारकी वगैरे सोडावी लागते.

**अमेरिका-ब्रिटन :** अमेरिका व ब्रिटन यांना लोकशाहीची जननी मानली जाते. तेथे मात्र पक्षांतराबाबत कोणताही कायदा नाही. सारे काही- नैतिक मूल्यांवर सोडून देण्यात आले आहे आणि नैतिक मूल्ये ही कायद्यापेक्षाही प्रभावी असतात. कायद्यात एखादेवेळी पळवाट राहू शकते, पण, नैतिक मूल्ये? त्यात कोणतीही पळवाट नसते. बहुधा म्हणूनच पक्षांतरविरोधी कायदा नसला तरी तेथे 'आयाराम-गयाराम'ची संस्कृती रुजली नाही.

**आता विषवृक्ष :** भारताच्या राजकारणात पक्षांतराचे बीज रोवणारे गयालाल यांचे २००९ मध्ये निधन झाले. त्यांच्या पक्षांतराच्या विक्रमाला आता ६० वर्षे पूर्ण होत आहेत. ६० वर्षांपूर्वी त्यांनी पेरलेले पक्षांतराचे बीज वा रोप आता फोफावले आहे. त्या वृक्षाची जणू 'साठी' होत आहे. आणि तो आता विशाल असा 'विषवृक्ष' झाला आहे. आता हा विषवृक्ष मुळापासूनच उखडून टाकण्याची वेळ आली आहे. अन्यथा लोकशाहीचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताची प्रतिमा डागाळली जाईल आणि लोकशाहीच्या नंदनवनाचे रूप पालटून ते झालेले असेल पक्षांतराचे- दलबदलूंचे बाभूळवन! ■

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# देशाच्या विकासातील प्रमुख अडसर

जंतरमंतरवरील आंदोलनाची सांगता झाली. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर आंदोलकांनी जल्लोष केला. परंतु, आंदोलकांच्या एका गटाने पोलिसांवर दगडफेक करून वातावरण नासवले. यात दोन पोलिस अधिकाऱ्यांसह एक विशेष पोलिस आयुक्त गंभीर जखमी झाले. यावरून हे आंदोलन विद्यार्थ्यांसाठी नाही, तर राजकीय हेतूने प्रेरित होते, ही बाब अधोरेखित झाली. पेपर फोडण्यासारखे प्रकार संघटित गुन्हेगारीत मोडतात. काँग्रेसच्या काळातही असे अनेक प्रकार घडले आहेत. भ्रष्टाचार १०० टक्के संपुष्टात कधीच आणला जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत सर्वांत मोठ्या लोकसंख्येच्या देशात भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविण्यासाठी दीर्घकाळ लागणार नाही का? भ्रष्टाचार हाच देशाच्या विकासातील प्रमुख अडसर आहे.

हळूहळू का होईना भारतातील भ्रष्टाचार कमी होत चालला आहे. डिजिटायझेशनमुळे अनेक क्षेत्रांतील भ्रष्टाचाराला अंकुश लागला आहे. ग्लोबल ट्रान्सपरन्सीने जारी केलेल्या अहवालानुसार युरोप आणि अमेरिकेत भ्रष्टाचारात वाढ झाली असतानाच भारतात भ्रष्टाचाराची प्रकरणे घटल्याचे समोर आले आहे. १८० देशांच्या या अहवालात भ्रष्टाचार निर्मूलनात भारताने २ वर्षांत सुधारणा करताना ९३ वरून ९१ वा क्रमांक प्राप्त केला. अमेरिका २९ व्या तर चीनसारखा शेजारी देश भारतापाठोपाठ ७६ व्या क्रमांकावर आहे.

सरकारकडून ईडी, सीबीआय आणि अन्य संस्थांच्या माध्यमातून भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. यात शासनाने बऱ्याच अंशी यश मिळविले असले तरी मूळ हेतू साध्य झाला का, हा खरा प्रश्न आहे. विरोधकांनी वारंवार भ्रष्टाचारविरोधी कारवायांवर आक्षेप घेतला आणि तरीही हेच लोक भ्रष्टाचाराच्या नावे गळे काढताना दिसले, ही बाब देशहिताच्या दृष्टीने खूपच घातक आहे.



पेपरफुटीसारख्या भ्रष्टाचारावर प्रहार करण्यासाठी केंद्र सरकारने फास्ट ट्रॅक न्यायालयांचा निर्णय जाहीर केला. शिवाय मोठा दंड आणि कठोर शिक्षेची तरतूद केली. अशा प्रकारच्या न्यायालयांमुळे आरोपींना पुरावे नष्ट करण्यासाठी कमी वेळ मिळेल आणि पर्यायाने त्यांना शिक्षा देणे शक्य होईल. ही बाब खरी असली तरी अशा प्रकरणांमध्ये आजही ४२०, ४६७ आणि ४६८ यासारखी सामान्य कलमे लावली जातात. अ‍ॅण्टी पेपर लीक कायद्यात सुधारणा करून कठोर विधेयक आणण्याची घोषणा करण्यात आली. हे कायदे पारित होण्यासाठी आणखी काही काळ लागणार आहे. फास्ट ट्रॅक न्यायालये हा भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्यातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. परंतु, हा मार्ग एकमेव उपाय नाही. यासाठी तपास यंत्रणांची कार्यक्षमता आणि प्रशासकीय पारदर्शकता अत्यंत आवश्यक आहे. सरकारने आपली भूमिका कितीही स्वच्छ ठेवली तरी योजना राबविणारे प्रशासन अकार्यक्षम व भ्रष्टाचारी असेल तर मूळ हेतू साध्य होऊ शकत नाही. भारतीय कायदे सौम्य आहेत. १० गुन्हेगार सुटले तरी चालेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा नको, अशी तरतूद आपल्याकडे आहे. कायद्यांच्या या पळवाटांचा फायदा गुन्हेगार घेतात आणि पुन्हा नव्याने गुन्हे करण्यासाठी सज्ज होतात.

सीबीआयकडील तब्बल ७ हजारांहून अधिक भ्रष्टाचाराचे खटले विविध न्यायालयांमध्ये धूळ खात पडून आहे. यातील अनेक खटले २० वर्षांपेक्षाही जुने आहे. भ्रष्टाचारासाठी गरिबी हे प्रमुख कारण मानले जाते. परंतु, ही बाब पूर्ण सत्य नाही. अज्ञान, देशविरोधी मानसिकता आणि स्वार्थीपणा ही तीन कारणे भ्रष्टाचारासाठी पोषक ठरतात. न्याय देणारी व्यवस्थाही भ्रष्टाचारी नसल्याचा दावा ठामपणे करता येत नाही. ही व्यवस्थाच भ्रष्टाचारी असेल तर सर्वसामान्यांना न्याय कसा मिळणार?

देश सर्वच आघाड्यांवर वेगाने मार्गस्थ झाला आहे. देशात संशोधक आणि बुद्धिवंतांच्या खाणी आहेत. परंतु, देशाला पाण्यात पाहणाऱ्यांची संख्यासुद्धा कमी नसल्याने देश आजही भ्रष्टाचाराच्या आगीत होरपळत आहे. कोट्यवधींची संपत्ती बाळगणारे अथवा लाखो रुपये पगार कमावणारे जेव्हा एखाद्या गरिबाला पाच-दहा हजारांची लाच मागतात तेव्हा माणुसकी पूर्णतः गळून पडते. ही व्यवस्था बदलावीच लागेल. त्याशिवाय समृद्ध आणि संपन्न भारताची व्याख्या पूर्ण होऊ शकत नाही. ■

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# माहितीच्या युगात गुरूचे स्थान

**''गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥''**

भारतीय संस्कृतीमध्ये गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ स्थान देण्यात आले आहे. कारण देव आपल्याला जीवन देतो; परंतु त्या जीवनाला दिशा देण्याचे कार्य गुरू करतो. म्हणूनच आषाढ पौर्णिमेला साजरी होणारी गुरुपौर्णिमा ही केवळ धार्मिक परंपरा नसून भारतीय ज्ञानपरंपरेचा, कृतज्ञतेचा आणि संस्कारांचा उत्सव आहे.

पूर्वी व्यक्तीला ज्ञान देण्याचे काम गुरू करत असे. ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला, खेळ, युद्धशास्त्र, अध्यात्म अशा जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये गुरूचे स्थान सर्वोच्च होते. गुरुकुलात शिक्षण म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हते; तर चारित्र्यनिर्माण, संयम, कर्तव्य, आत्मविश्वास, विवेक आणि राष्ट्रनिष्ठा यांचे संस्कार केले जात होते. म्हणूनच भारताने वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र अशा असंख्य ज्ञानशाखा जगाला दिल्या.

परंतु काळ बदलला. शिक्षणाचे बाजारीकरण झाले. शिक्षण ही साधना न राहता सेवा आणि नंतर व्यवसाय बनला. गुरूंची आवश्यकता अनेकांच्या दृष्टीने फक्त परीक्षा पास होईपर्यंत मर्यादित राहिली. ''आम्ही फी भरतो, म्हणजे शिक्षण विकत घेतो,'' अशी पालकांची मानसिकता झाली. शिक्षकांवरही निकालाचा दबाव वाढला. विद्यार्थ्यांमध्ये कष्ट, जिज्ञासा आणि स्वाध्यायाची वृत्ती कमी होत गेली. पूर्वी एखादा छोटासा संदर्भ शोधण्यासाठी अनेक पुस्तके पालथी घालावी लागत होती. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि चॅटजीपीटी काही सेकंदांत हजारो पानांची माहिती आपल्या समोर आणतात.



याच ठिकाणी एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे चॅटजीपीटी किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता गुरूची जागा घेऊ शकते का? तर याचे उत्तर आहे, नाही.

कृत्रिम बुद्धिमत्ता माहिती देऊ शकते; परंतु गुरू ज्ञान देतो. माहिती आणि ज्ञान यांच्यातील फरक समजून घेतला पाहिजे. माहिती सर्वांसाठी सारखी असते; पण ज्ञान प्रत्येकाच्या परिस्थितीनुसार बदलते. महाभारतातील द्रोणाचार्यांचे उदाहरण यासाठी अत्यंत बोलके आहे. द्रोणाचार्यांनी शंभर कौरव आणि पाच पांडव यांना विविध शस्त्रविद्या शिकवल्या. त्यांच्या व्यतिरिक्त अनेक राजकुमारही होते. परंतु ब्रह्मास्त्रासारखी दिव्य विद्या त्यांनी केवळ अर्जुन आणि अश्वत्थामा यांनाच दिली. कारण प्रत्येक ज्ञान प्रत्येकाला देण्यासारखे नसते. ग्रहण करण्यासाठी शिष्यामध्येही शारीरिक, बौद्धिक, मानसिक योग्यता असावी लागते. महाभारताच्या युद्धाच्या शेवटी अर्जुन आणि अश्वत्थामा यांनी एकमेकांवर ब्रह्मास्त्र सोडले. महर्षी व्यासांनी दोघांनाही ते परत घेण्यास सांगितले. अर्जुनाने गुरूंच्या शिकवणीचा आणि आत्मसंयमाचा परिचय देत ब्रह्मास्त्र परत घेतले; परंतु अश्वत्थाम्याला ते शक्य झाले नाही. शेवटी त्याने ते उत्तरेच्या गर्भावर सोडले. या प्रसंगातून स्पष्ट होते की, विद्या देणे पुरेसे नसते; त्या विद्येचा योग्य वेळी आणि योग्य प्रकारे उपयोग करण्याचा विवेक देणे अधिक महत्त्वाचे असते. तो विवेक गुरू देतो.

आजच्या जगाकडे पाहिले, तर हे सत्य अधिक स्पष्ट होते. अनेक देशांकडे अण्वस्त्रे आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता अण्वस्त्रांचे लक्ष्य अचूक ठरवू शकते, युद्धाची रणनीती आखू शकते; परंतु अण्वस्त्रांचा वापर करायचा की नाही, हा नैतिक निर्णय कृत्रिम बुद्धिमत्ता घेऊ शकत नाही. विवेक, संयम आणि मानवतेची जाणीव कोणत्याही संगणकात निर्माण करता येत नाही. ती गुरूच्या संस्कारातूनच निर्माण होते.

आज प्रत्येक क्षेत्रात अनेक अर्जुन उभे आहेत. करीअर, स्पर्धा, पैसा, नैराश्य, व्यसन, कौटुंबिक तणाव आणि सामाजिक माध्यमांच्या आभासी जगात अनेक युवक संभ्रमित झाले आहेत. त्यांना माहितीची कमतरता नाही; परंतु योग्य मार्गदर्शनाची कमतरता आहे. म्हणून आज समाजाला पूर्वीपेक्षा अधिक गुरूंची आवश्यकता आहे. आपल्या देशाचे नाव 'भारत' आहे. 'भा' म्हणजे ज्ञान आणि 'रत' म्हणजे त्यात रमणारा. ज्ञानामध्ये रमणाऱ्या लोकांचा हा देश आहे. म्हणूनच भारताला जगद्‍गुरू म्हणण्याची परंपरा निर्माण झाली. भारत जगद्‍गुरू होईल तो केवळ आर्थिक किंवा लष्करी सामर्थ्यामुळे नव्हे; तर जगाला विवेक, अध्यात्म, करुणा, सहअस्तित्व आणि मानवतेचा मार्ग दाखविण्याच्या क्षमतेमुळे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि समर्थ रामदासांनी गुरूचे माहात्म्य सांगितले आहे. गुरुपौर्णिमा हा केवळ पूजा करण्याचा दिवस नाही; तर आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या गुरूंच्या शिकवणीप्रमाणे आचरण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

आज प्रत्येकाने मनोमन एवढेच म्हणावे -
''भक्ती व्हावे श्रीगुरुची, मी पूजा बांधिली.''

गुरूंबद्दलची श्रद्धा, कृतज्ञता आणि नम्रता जिवंत असेल, तरच ज्ञानाचे सामर्थ्य मानवतेच्या कल्याणासाठी वापरले जाईल. आणि तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने पुन्हा एकदा 'जगद्‍गुरू' म्हणून उभा राहील. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### कॉमेडीची ट्रॅजेडी

बिर्याणी हा मांसाहार करणाऱ्यांसाठी अत्यंत आवडता पदार्थ आहे, पण सध्या गाजत असलेल्या ३७० रुपयांच्या बिर्याणीच्या वादामुळे स्टॅण्ड-अप कॉमेडियन प्रणीत मोरे यांच्या तोंडाला चांगलाच फेस आणला आहे. प्रणीतच्या लाईव्ह शोदरम्यान, प्रेक्षकांमधील एका व्यक्तीने त्याच्या डेटचा अनुभव सांगितला; मैत्रिणीला ३७० रुपयांची बिर्याणी ऑफर करून त्याबदल्यात अनैतिक अपेक्षा करण्याची भावना त्याने तिच्यासमोर व्यक्त केली. असे करून त्याने आपली विकृत मानसिकता समोर आणली. आपल्याच मैत्रिणीवर आक्षेपार्ह टिप्पणी करून तिचा अपमान केला आणि त्याच्या या वक्तव्यावर आयोजकाने त्याला थांबवण्याऐवजी स्वतः सुद्धा या संवादात सहभागी होऊन आपली वैचारिक पातळी दाखवली. एखाद्या मुलीवर पैसे खर्च करून त्याबदल्यात आपण काहीही मागणी करू शकतो, अशी मानसिकता त्या व्यक्तीची होती जी अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रकरणाची दखल महिला आयोगाने घेतली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. प्रणीत मोरेने या प्रकरणात माफी जरी मागितली असली तरीसुद्धा त्याने आपली जबाबदारी पूर्णपणे दुर्लक्षित केली यात शंका नाही. विनोद म्हणजे अश्लील आणि शिवराळ भाषा, अशीच व्याख्या यांनी केलेली दिसते. समय रैना, रणवीर अलहबादिया आणि प्रणीत मोरे हे आपल्यासमोर त्याचे उदाहरण म्हणावे लागेल; असे असूनही शुद्ध भाषेत अगदी निखळ विनोद करून प्रेक्षकांना हसवणारे स्टॅण्ड-अप कॉमेडियन आहेत. विनोद आणि अश्लीलता यांच्यात एक सूक्ष्म सीमारेषा असते. तेव्हा स्वतःची कला सादर करताना याची जाणीव ठेवून आपल्या बोलण्याने आणि वर्तनाने सामाजिक मर्यादा आपण ओलांडत नाही ना, याचे भान प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे.

**पूजा सोमलवार**/८२०८३४९४५१

■■

### उत्सवात देवाचा चेहरा दिसू द्या

देवशयनी एकादशीपासून धार्मिक उत्सवाला घरोघरी तसेच मंदिरात सुरुवात होते. भक्तांमध्ये नवचैतन्य आणि उत्साह संचारतो. तो पुढे वर्षभर कायम राहतो. मंदिरांमध्ये भाविकांची प्रचंड गर्दी असते. तेथे देवाला खूप हार, फूल व इतर साहित्य अर्पण केले जातात. त्यामुळे अनेक मंदिरात देवाचा चेहरा पूर्णपणे दिसत नाही. शेगावच्या मंदिरात गजानन महाराजांची मूर्ती स्पष्टपणे भाविकांना दिसते व तेथे मूर्ती-दर्शनाचा वेगळाच आनंद प्राप्त होतो. तीच प्रथा सर्व मंदिरांनी सुरू करावी. म्हणजे मंदिरात जाऊन देवदर्शनाचा लाभ सगळ्यांना घेता येईल.



**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

### कोकणालाच आरक्षणाचा तुटवडा का?

आषाढी वारीसाठी देशाच्या आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी रेल्वे, एसटी आणि खाजगी वाहनांनी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. रेल्वेने आणि बसने प्रवास करणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड असली, तरी पंढरपूरकडे जाणाऱ्या रेल्वे किंवा बसच्या आरक्षणाबाबत दरवर्षी मोठा गोंधळ किंवा काही मिनिटांत सर्व जागा संपल्याच्या घटना सहसा ऐकायला मिळत नाहीत. तसेच त्या मार्गावरील वाहतूक व्यवस्थेवरही इतका ताण जाणवत नाही. याउलट, गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या रेल्वेचे आरक्षण सुरू होताच अवघ्या काही मिनिटांत सर्व जागा भरल्याचे चित्र दरवर्षी दिसते. त्यानंतर हजारो प्रवाशांना प्रतीक्षा यादी, तिकिटासाठी होणारी धावपळ, खडतर एसटी प्रवास, खराब रस्ते आणि अतिरिक्त खर्च यांचा सामना करावा लागतो. आश्चर्याची बाब म्हणजे, पंढरपूरला देशभरातून लाखो भाविक येतात; तर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणारे प्रवासी प्रामुख्याने कोकणातीलच असतात. असे असतानाही पंढरपूरच्या तुलनेत कोकण रेल्वेचे आरक्षण काही मिनिटांत कसे संपते? दरवर्षी अशीच परिस्थिती निर्माण होत असेल, तर त्यामागे तांत्रिक त्रुटी, मोठ्या प्रमाणावर होणारे एजंट बुकिंग, तिकिटाचा गैरवापर किंवा इतर कोणतेही कारण आहे का, याची सखोल चौकशी रेल्वे प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी करणे गरजेचे आहे. जर प्रवाशांची फसवणूक करणारे किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणारे कोणतेही जाळे कार्यरत असेल, तर त्याचा शोध घेऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या श्रद्धेचा आणि कुटुंबाच्या एकत्र येण्याचा सण आहे. त्यामुळे या काळात रेल्वे आणि परिवहन व्यवस्थेने प्रवाशांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि न्याय्य सेवा देणे ही सरकारची जबाबदारी आहे. ■

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## महत्वाचे...




## कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटतर्फे स्किल कार्निव्हल रॅली उत्साहात

**सोलापर, दि. २६ जुलै-**

कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट सोलापूर शाखेमार्फत जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून स्किल कार्निव्हल रॅली उत्साहात पार पडला.कोहिनूर इन्स्टिट्यूट हे मागील ५९ वर्षापासून सर्वोत्तम कौशल्य प्रशिक्षण देणारी संस्था असून गेली ३७ पेक्षा जास्त वर्षे सोलापूर शहरात कार्यरत आहे. यामध्ये महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कोर्सेस देखील उपलब्ध करून दिले जातात. या रॅलीत पालक, पाल्य तसेच दहावी उत्तीर्ण-अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी भविष्य कसे घडवता येईल याबद्दल विविध संदेश देण्यात आले. याशिवाय केटीआय मध्ये विविध ट्रेडच्या कोर्सेस मधून अभ्यासक्रमातच पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटच्या दृष्टीने ऑब्जेक्ट प्रेझेंटेशन, व्यावसायिक कार्यातील चार्ट मेकिंग, कांपोनेंट स्केचेस, ट्रेडच्या अनुषंगिक इतर माहिती व मार्केट स्टडीच्या इतर ऍक्टिव्हिटीज सातत्याने करवून घेतल्या जातात. याचा विद्यार्थ्यांना पुढील जीवनात नोकरी किंवा स्वतःच्या व्यवसायात उत्तम उपयोग होतो. त्यांचा सर्वांगीण विकास हेच केटीआयचे ध्येय असते. ही रॅली श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मुरारजी पेठ व निराळे वस्ती ते एस टी स्टँड पर्यंत या मार्गाने काढण्यात आली होती. या रॅलीमध्ये शाखा व्यवस्थापक वल्लभ कुलकर्णी, शिक्षक वृंद यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.

## पैशाच्या व्यवहारातून महिलेस चाकू, लाथा बुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

पैशाच्या व्यवहारातून एका व्यक्तीला तिघा जणांनी चाकू व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना जय मल्हार चौकात आज रविवारी सकाळी साडेअकरा वाजता घडली. संध्या पप्पू कांबळे (वय ४० वर्ष, रा.जय मल्हार चौक सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना आज रविवारी सकाळी घराजवळ पैशाच्या व्यवहारातून गणेश कसबे, मीरा कसबे, ज्योतिबा कसबे या तिघांनी मिळून मारहाण केली. यात बोटाला जखम व सर्व अंगाला मुका मार लागल्याने त्या उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात स्वतः दुपारी दाखल झाल्या.

## घरगुती वादातून तरुणीने खाल्ले झुरळ मारण्याचे पावडर

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

घरगुती भांडणाच्या कारणावरून एका तरुणीने झुरळ मारण्याचे पावडर खाल्ल्याची घटना देगाव नाका येथे शनिवारी रात्री नऊ वाजता घडली. रचना गणेश कुमावत (वय २१ वर्ष ,रा. हब्बू वस्ती देगाव नाका, सोलापूर) असे त्या तरुणीचे नाव आहे. शनिवारी रात्री तिने घरामध्ये झुरळ मारण्याचे पावडर खाल्ले. त्रास होऊ लागल्याने तिला आई संगीता यांनी उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री दाखल केले.

## पत्र्यावरून खाली पडल्याने एक जखमी

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

पत्र्यावर कपडे वाळवत असताना तोल जाऊन खाली पडून एक जण जखमी झाल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील गोविंदपुर येथे शनिवारी दुपारी अडीच वाजता घडली. राजेश गणपतराव देवसरकर (वय ४५ वर्ष, रा. गोविंदपूर )असे त्या व्यक्तीचे नाव आहे. ते शनिवारी दुपारी आपल्या घराच्या पत्र्यावर कपडे वाळवत असताना तोल जाऊन खाली पडले. यात मुका मार लागल्याने त्यांना पंढरपूर येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात सासरे विठ्ठलराव यांनी रात्री अकरा वाजता दाखल केले.

## ब्लेडने मारून घेतल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

अज्ञात कारणावरून एका तरुणाने ब्लेडने हातावर मारून घेऊन जखमी झाल्याची घटना खमितकर अपार्टमेंट येथे शुक्रवारी संध्याकाळी घडली. समर्थ शरद पवार ( वय २१ वर्ष, रा. खमीतकर अपार्टमेंट सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. त्याने शुक्रवारी संध्याकाळी राहत्या घराच्या बिल्डिंग खाली ब्लेडने हातावर मारून घेतले. यात जखमी झाल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात आई श्रीदेवी यांनी पहाटे दाखल केले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि.सोलापूर सब डि.व ता.बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु.पल. हद्दीतील गट नं. १३९९/१/१/१/२ पैकी प्लॉट नं. २१ याचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. यासी चतुःसिमा पुर्वेस - प्लॉट नं. -२० , दक्षिणेस - प्लॉट नं ६ मीटर चा रोड, पश्चिमेस - प्लॉट नं.- २२ व उत्तरेस - प्लॉट नं. १४ येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह सौ. लक्ष्मी कृष्णा माळी, रा. बार्शी, ता. बार्शी याचे खरेदी मालकी कब्जे वहीवाटीची आहे. सौ. लक्ष्मी कृष्णा माळी यांनी घर बांधकामासाठी आमचे अशिल सांगली अर्बन को-ऑप. बँक लि. सांगली, शाखा - बार्शी या बँकेकडे कर्जाची मागणी केली व त्यांना ११,८५,०००/- चे कर्ज मंजूर केले आहे. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालक कर्जदार यांनी दिलेला आहे. सदर कर्जास सदर मिळकत ही कर्जदार म्हणुन गहाणखत करून देण्याची सौ. लक्ष्मी कृष्णा माळी यांनी घेतलेल्या कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, निज, बोजा, साठेखत खरेदीखत, कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणचीही तक्रार चालणार नाही कोणचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली आहे. ता. २५/०७/२०२६

**सही/-**
**श्री. प्रसाद जा. कुलकर्णी, अ‍ॅडव्होकेट**
**बी. एस. एल. एल एल. बी**
**पत्ता - लक्ष्मी नृसिंह, ७३०/२/४४/ अ**
**सिद्धेश्वर नगर, कासारवाडी रोड,**
**बार्शी. फो. ९४२३३ ३२०४८**

# भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकीमध्ये बायोमेडिकल पदवीचा अभ्यासक्रम

**▶▶ संस्थेचे अध्यक्ष रवींद्र गायकवाड यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

बायोमेडिकल अभियांत्रिकी मध्ये करिअर करण्यासाठी सोलापूर व परिसरातील विद्यार्थ्यांना पूर्वी मुंबईला जावे लागत होते. सोलापुरातील विद्यार्थ्यांना सोलापुरातच करिअरची संधी देण्यासाठी केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात बायोमेडिकल अभियांत्रिकी पदवीचा अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला आहे. भविष्यात या क्षेत्रात मोठी संधी असल्याने अभियांत्रिकेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी बायोमेडिकल मध्ये करिअर निवडावे, असे आव्हान महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र डी. गायकवाड यांनी केले आहे.

श्री. गायकवाड म्हणाले, अत्याधुनिक आरोग्य सेवेतील उपाय विकसित करण्यासाठी ही पदवी महत्त्वाची आहे. वैद्यकीय उपकरणे, निदान उपकरणे विकसित केली जातात. आधुनिक वैद्यकशास्त्राच्या प्रत्येक पैलूला या माध्यमातून स्पर्श होतो. या क्षेत्रातील अभियंते एम.आर.आय मशीन, सिटी स्कॅनर आणि पोर्टेबल डायग्रासिस्टिक टूल्स यासारख्या उपकरणाची रचना आणि सुधारणा करत आहेत. हृदय आणि हृदय गती आणि रक्तातील ऑक्सिजनच्या पातळीचे निरीक्षण करणाऱ्या स्मार्ट घड्याळ सारखे तंत्रज्ञान बायो मेडिकल अभियांत्रिकीच्या माध्यमातून शिकता येणार आहे. जटिल वैद्यकीय डेटाचे विश्लेषण करण्यासाठी रोग निदानात मदत करण्यासाठी आणि रुग्णाच्या परिणामाच्या अंदाज घेण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजंटच्या माध्यमातून उपकरणे विकसित केली जात आहे. बायोमेडिकल अभियांत्रिकीसह ए.आय. हे औषधाच्या निर्मितीकडे नेत आहे. लोकसंख्या वाढत असल्याने प्रगत आरोग्य सेवा उपचाराची मागणी वाढत आहे. बायोमेडिकल अभियंत्याची ही गरज वाढणार आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्था त्याच्या जैव वैद्यकीय अभियांत्रिकी कार्यक्रमाचा विस्तार करत आहेत. भविष्यातील करिअरची संधी ओळखून महाविद्यालयाने हा अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला आहे. यासाठी ६३ जागा उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी या शाखेत नव्या क्षेत्रात करिअर घडवावे.

प्राचार्य डॉ. अनिल देशमाने म्हणाले, सर्व अभियांत्रिकीसाठी नवीन तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. प्रत्येक लॅबमध्ये इंडस्ट्री ग्रेड उपकरणे,अपडेटेड सॉफ्टवेअर,आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. स्मार्ट क्लासरूम मधील डिजिटल बोर्ड प्रोजेक्टर ई लर्निंग सॉफ्टवेअर व तज्ञांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांच्या इंडस्ट्रीमध्ये सहज प्रवेश होतो. तांत्रिक शिक्षणासोबत सादरीकरण कोलेब्रेशन व इनोव्हेशनसारखी कौशल्य विकसित होतात.

### परदेशात उच्च शिक्षणासाठी उत्तम संधी

परदेशात विशेषता: अमेरिका, इंग्लंड ,ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड ,जर्मनी ,कॅनडा या देशात मोठ मोठ्या कंपनीत बायोमेडिकल इंजिनिअरिंग तसेच मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल संशोधन केंद्रामध्ये प्रचंड प्रमाणात संधी आहे.




# रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचा ११ वा पदग्रहण समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत कार्यरत रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचा ११वा पदग्रहण समारंभ हॉटेल निसर्ग एक्झिक्युटिव्ह येथे उत्हासात संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेश पटेल हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन वंदना कोपकर आणि मावळते अध्यक्ष डॉ. अकबरसाहेब नदाफ, नूतन अध्यक्ष बसवराज बिराजदार, नूतन सचिव संतोष सावळगी उपस्थित होते. प्रारंभी मावळते अध्यक्ष अकबरसाहेब नदाफ यांनी प्रमुख पाहुण्याचे स्वागत केले. यावेळी अध्यक्ष बिराजदार यांनी रोटरी इंटरनॅशनलच्या क्रिरियट लास्ट इम्पॅक्ट या संकल्पनेनुसार व्यूहरचना, नेतृत्व आणि सहकार्य या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजोपयोगी, शाश्वत व प्रभावी सेवा प्रकल्प राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून असिस्टंट गव्हर्नर वंदना कोपकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन जयेश पटेल यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवगंगा मैंदर्गी व रोटेरियन डॉ. उमाकांत जाधव यांनी केले तर सचिव संतोषकुमार सावळगी यांनी आभार मानले.

### रोटरीची २०२६-२७ ची कार्यकारिणी याप्रमाणे

**अध्यक्ष :** बसवराज बिराजदार, **सचिवः** संतोषकुमार सावळगी, डॉ. अकरसाहेब नदाफ, **संचालक :** महेश साळुंके, अनिल चंडक, नागेश शेंडगे, सत्यम दुधनकर, मो. इक्बाल बागबान, भारत कदम, अनिल कुडते, स्वाती मनसावाले, डॉ. शिवगंगा मैंदगी, सलीम जमादार, विशाल कोंतम, समीर नदाफ, गणेश लिंगशेट्टी. **सदस्य :** निहाल तांबोळी, डॉ. उमाकांत जाधव, चिदानंद पाटील, दीपक भोगे, साक्षी सिद्धेश्वर बरबडे, गिरीष चव्हाण.



# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रोळी येथे दिव्य दिंडी सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त जि. प, प्राथमिक शाळा अंत्रोळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे मुख्याध्यापक युवराज राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्य दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत सहभागी होत टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकारामचा जयघोष केला.

विद्यार्थ्यांनी वारकरी नृत्य, समाजप्रबोधनपर संदेश, कीर्तन, अभंग व भक्तिगीते यांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. दिंडी गावातील प्रमुख मार्गांवरून फिरली. अंत्रोळी गावातील प्रत्येक घरासमोर ग्रामस्थांनी सडा-रांगोळी काढून दिंडीचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. अनेक ठिकाणी पालखीचे पूजन करण्यात आले. संपूर्ण गावात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गावातील नागरिकांनी दिंडीत मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने गावात जणू भक्तीचा अथांग सागर लोटला होता. यावेळी श्रीरंग बनसोडे यांनी विठ्ठलभक्तीपर गीते सादर करून वातावरण भक्तिमय केले. नागनाथ म्हमाणे यांनी सादर केलेल्या वारकरी नृत्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. तसेच शाळेतील किर्ती जाधव, बनसोडे मॅडम आणि राठोड मॅडम यांनी वारकरी नृत्य व पारंपरिक फुगडीचे आकर्षक सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली

Truhome FINANCE

**मागणी सूचना**

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )**

**नोंदणीकृत कार्यालयः** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालयः** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइटः** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )** कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक (LAN) : SHLHSOLR0000107**<br>**१. श्री. राघवेंद्र लक्ष्मण चालवाडी (कर्जदार)**<br>**२. सौ. किरण राघवेंद्र चालवाडी (सह-कर्जदार)**<br>**सध्याचा पत्ता :गट क्र. १३१८, साई श्रद्धा पार्क, फ्लॅट क्र. जे-२०४, मोरे वस्ती, चिकली रोडजवळ, चिखली, पुणे, महाराष्ट्र – ४११०६२.**<br>**तसेच : मालमत्तेचा पत्ता :गट क्र. ४४१/१-ब, प्लॉट क्र. ३०, बसवेश्वर पार्क, मौजे कुम्भारी, दर्ग्याजवळ, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर – ४१३००६.**<br>**कर्ज रक्कम : रु. ७,१५,२३५/-**<br>**एन.पी.ए. दिनांक : ०७/०७/२०२६** | मौजे कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील बसवेश्वर पार्क मधील गट क्र. ४४१/१-ब वरील प्लॉट क्र. ३०, क्षेत्रफळ ९१.६८ चौ. मीटर तसेच त्यावरील संपूर्ण बांधकामासह, जो कुंभारी ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्थित आहे.<br>चतु:सीमा :पूर्वेस : रस्ता<br>पश्चिमेस : प्लॉट क्र. २९<br>दक्षिणेस : प्लॉट क्र. ३९<br>उत्तरेस : प्लॉट क्र. ३१ | मागणी सूचना दिनांक : २२/०७/२०२६<br>मागणी सूचना रक्कम : कर्ज खाते क्रमांक SHLHSOLR0000107 अंतर्गत दिनांक १०/०७/२०२६ रोजी देय असलेली रु. ६,८०,१२२.६६/- (अक्षरी रुपये सहा लाख ऐंशी हजार एकशे बावीस आणि सहासष्ट पैसे फक्त), तसेच त्यावर यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज व अनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादीसह. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २७/०७/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

SANGOLA TALUKA UCHCHA SHIKSHAN MANDAL'S
SANGOLA MAHAVIDYALAYA, SANGOLA
Kadlas Road,Tal-Sangola, Dist- Solapur (Maharashtra) - 413307
Email: prinscsgl@gmail.com, Mobile No. 7588360406
(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)
**NON-MINORITY: AIDED**

Applications are invited for the Post of Director of Physical Education from the **Academic year- 2026-2027**

| Sr. No. | Subject /Designation | Total Vacant Post |
|---|---|---|
| 01) | Director of Physical Education | 01 (Full Time) |

**Instructions: -**
1) The above post is open to all categories of candidates.
2) Educational Qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification dtd.18th July 2018, Govt. of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18UNI-1dts. 8th March 2019 and University Circular No. PAHSUS/Estt/7th Pay/2019/2285/ dtd.25th March 2019.
3) A relaxation of 5% shall be allowed at the Bachelors as well as at the Masters Level for the candidates belonging to SC/ST/OBC (Non-Creamy Layer)/Differently-abled for the purpose of eligibility and assessing good academic record for direct recruitment.
4) Reserved candidates, who are domiciled out of Maharashtra State, will be treated as open category candidates.
5) Reserved category candidates should also send a copy of their application to the Deputy Registrar, Special Cell, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.
6) Application received after the last date will not be considered. The College will not be responsible for postal delay, if any.
7) Reservation for women and persons with disabilities (PWD) shall be as per Government norms.
8) Reserved category candidates shall produce the Caste Validity Certificate as per the directives issued by the State Government vide Circular No.BCC-201/Pra. Kra.1064/2011/16B dated 12-12-2011.
9) Reserved category candidates (except SC/ST) shall produce Non-Creamy Layer Certificate at the time of interview.
10) Applicants who are currently employed must submit their applications through the proper channel.
11) Applicants shall provide an explanation for any break(s) in their academic career.
12) Incomplete application will not be entertained.
13) T.A., D.A. will not be paid for attending the interview.
14) Applications with complete details should reach The Secretary, Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal Sangola, Kadlas Road, Tal-Sangola, Dist- Solapur (Maharashtra) - 413307 within 30 days from the date of publication of this advertisement.
15) All the Terms & Conditions are applicable as mentioned in the NOC letter No. JDHE Solapur /NOC/2026/7518941 dated 12.06.2026 from Hon. Deputy Secretary, Higher and Technical Education Dept. Govt. of Maharashtra, Mumbai and letter No. JDHESolapur/ Noc/2026/23 dated 01/06/2026, Hon Deputy Director of Higher Education, Solapur Division, Solapur.
16) All the Terms & Conditions are applicable as mentioned in the GR Dated 12.11.2021 from Higher and Technical Education Department of Government of Maharashtra
17) Please note that the recruitment procedure initiated by this advertisement subject to decision by Hon. Bombay High-court. Aurangabad Bench on write petition No. 12051/2015.
18) This is University approved advertisement.

Place: Sangola
Date:27/07/2026

(Shri.Adv. U.S. Ghongade)
Secretary

(Shri. B.R. Gaikwad)
Chairman

Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal Sangola

SANGOLA TALUKA UCHCHA SHIKSHAN MANDAL'S
SANGOLA MAHAVIDYALAYA, SANGOLA
Kadlas Road,Tal-Sangola, Dist- Solapur (Maharashtra) - 413307
Email: prinscsgl@gmail.com, Mobile No. 7588360406
(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)
**NON-MINORITY: AIDED**

Applications are invited for the Post of Principal from the **Academic year- 2026-2027**

| Sr. No. | Subject /Designation | Total Vacant Post |
|---|---|---|
| 01) | Principal | 01 (Full Time) |

**Instructions: -**
1) The above post is open to all categories of candidates.
2) Educational Qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification dtd.18th July 2018, Govt. of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18UNI-1dts. 8th March 2019 and University Circular No. PAHSUS/Estt/7th Pay/2019/2285/ dtd.25th March 2019.
3) Candidates applying for the post of Principal should submit their Academic Research Score (API/PBAS) along with relevant supporting documents.
4) A relaxation of 5% shall be allowed at the Bachelors as well as at the Masters Level for the candidates belonging to SC/ST/OBC (Non-Creamy Layer)/Differently-abled for the purpose of eligibility and assessing good academic record for direct recruitment.
5) Reserved candidates, who are domiciled out of Maharashtra State, will be treated as open category candidates.
6) Reserved category candidates should also send a copy of their application to the Deputy Registrar, Special Cell, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.
7) Application received after the last date will not be considered. The College will not be responsible for postal delay, if any.
8) Reservation for women and persons with disabilities (PWD) shall be as per Government norms.
9) Reserved category candidates shall produce the Caste Validity Certificate as per the directives issued by the State Government vide Circular No.BCC-201/Pra. Kra.1064/2011/16B dated 12-12-2011.
10) Reserved category candidates (except SC/ST) shall produce Non-Creamy Layer Certificate at the time of interview.
11) Applicants who are currently employed must submit their applications through the proper channel.
12) Applicants shall provide an explanation for any break(s) in their academic career.
13) Incomplete application will not be entertained.
14) T.A., D.A. will not be paid for attending the interview.
15) Applications with complete details should reach The Secretary, Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal Sangola, Kadlas Road, Tal-Sangola, Dist- Solapur (Maharashtra) - 413307 within 30 days from the date of publication of this advertisement.
16) This is University approved advertisement.

Place: Sangola
Date:27/07/2026

(Shri.Adv. U.S. Ghongade)
Secretary

(Shri. B.R. Gaikwad)
Chairman

Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal Sangola

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कारगिल युद्धातील वीरांना अभिवादन

**नवी दिल्ली :** 'फिट इंडिया मूव्हमेंट'च्या प्रमुख 'संडेज ऑन सायकल' उपक्रमाच्या ८३ व्या आवृत्तीद्वारे रविवारी १९९९ च्या कारगिल युद्धातील वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. 'कारगिल विजय दिवस' साजरा करण्यासाठी देशभरात सायकलिंगच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, यात नागरिक, सशस्त्र दलांचे जवान, खेळाडू आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या देशव्यापी मोहिमेदरम्यान 'फिट इंडिया स्वयंसेवक कार्यक्रम' देखील सुरू करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश तरुणांना क्रीडा व्यवस्थापन आणि फिटनेस कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेणे आणि 'फिट इंडिया' प्रमाणपत्रांद्वारे त्यांच्या योगदानाची दखल घेणे हा आहे. लेहपासून कन्याकुमारीपर्यंतच्या प्रमुख शहरांमध्ये तसेच 'स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया'च्या (साई) प्रशिक्षण केंद्रांवर या सायकलिंग मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

### दीक्षाची ७० गुणांची उत्कृष्ट कामगिरी

**डंडोनल्ड लिंक्स :** पाऊस, सोसाट्याचा वारा आणि अधूनमधून पडणारे ऊन अशा आव्हानात्मक परिस्थितीत खेळताना, भारतीय गोल्फपटू दीक्षा डागरने 'महिलांच्या स्कॉटिश ओपन गोल्फ' स्पर्धेत तिसऱ्या फेरीत '२-अंडर ७०' अशी उत्कृष्ट कामगिरी केली. या कामगिरीमुळे तिची एकूण गुणसंख्या गुणांच्या तुलनेत एक फटका जास्त (वन ओव्हर) झाली असून ती संयुक्तपणे ११ व्या स्थानावर पोहोचली आहे. 'एलईटी' स्पर्धेतील दोन वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या आणि 'हिरो' प्रायोजित दीक्षाला १८ व्या होलवर 'बर्डी' मिळवता आली नाही, तरीही तिने 'पार'पेक्षा कमी गुणांची (सब-पार) कामगिरी नोंदविली. अवनी प्रशांत आणि प्रणवी उर्स या इतर दोन भारतीय गोल्फपटूंना स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

### ऐश्वर्य, नीरज पदकापासून वंचित

**हँगझोऊ :** आयएसएसएफ विश्वचषक (रायफल/पिस्तूल/शॉटगन) नेमबाजी स्पर्धेत भारतीय रायफल नेमबाजांची पदकाची प्रतीक्षा कायम राहिली. पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३-पोझिशन्स प्रकाराच्या अंतिम फेरीत दोन भारतीय नेमबाज असूनही त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. यामुळे पदकतालिकेत भारत केवळ एका रौप्य पदकासह संयुक्त सातव्या स्थानावर राहिला. जागतिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेता ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर आणि आशियाई स्पर्धेतील रौप्यपदक विजेता नीरज कुमार या दोघांनीही आठ जणांच्या अंतिम फेरीत धडक मारली, परंतु पात्रता फेरीतील दमदार कामगिरीचे रूपांतर पदकात करण्यात त्यांना अपयश आले.

# भारताकडून झिम्बाब्वेचा टी-२० मालिकेत सफाया

## ▌सामनावीर, मालिकावीर वैभव सूर्यवंशी ▌विदर्भाच्या यश ठाकूरचे २ बळी


सूर्यवंशीची ८१ धावांची खेळी


यश ठाकूरचे २ बळी

**हरारे, २६ जुलै**

रविवारी हरारे स्पोर्ट्स क्लब येथे झिम्बाब्वेविरुद्ध झालेल्या तिसऱ्या आणि अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात किशोरवयीन फलंदाज वैभव सूर्यवंशीने ४९ चेंडूंत केलेली ८१ धावांची शानदार खेळी व मयंक यादव व यश ठाकूरच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारताने झिम्बाब्वेवर ३५ धावांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत सरळ ३-० ने वर्चस्व गाजविले. सूर्यवंशीचे हे या मालिकेतील दुसरे अर्धशतक ठरले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर भारताने २० षटकांत ५ बाद १९२ धावा उभारल्या. विजयासाठी १९३ धावांचा पाठलाग करताना रायन बर्लने केलेल्या नाबाद अर्धशतकी खेळीनंतरही झिम्बाब्वेला २० षटकांत ७ बाद १५७ धावांपर्यंतच मजल मारता आली.

भारताची मदार सूर्यवंशीच्या संयमी व प्रभावी फलंदाजीवर होती. या युवा सलामीवीराने आपली नेहमीची आक्रमक शैली बाजूला सारून अधिक परिपक्व आणि समतोल खेळी केली. सूर्यवंशीने ४९ चेंडूंत १६५.३१ च्या स्ट्राईक रेटने ८ चौकार व ४ षट्कारांसह ८१ धावांची खेळी केली. त्याने ईशान किशन (२९) व श्रेयस अय्यर (२७) यांच्यासोबत अनुक्रमे ७५ आणि ५० धावांची भागीदारी केली, आणि त्यानंतर रिंकू सिंगने १४ चेंडूत २५ धावा करीत डावाला अंतिम आकार दिला. झिम्बाब्वेसाठी ब्रॅड इव्हान्सने (२ बळी) अशी प्रभावी गोलंदाजी केली असली, तरी इतर गोलंदाज खूप महागडे ठरले. ब्लेसिंग मुझराबानीने अभिषेक शर्मावर आपले वर्चस्व पुन्हा सिद्ध केले. ब्लेसिंगसह कर्णधार सिकंदर रझा व वेसली मसाकादझाने प्रत्येकी १ बळी टिपले.

झिम्बाब्वेला पहिल्याच चेंडूवर हादरा बसला. मयंक यादवने सलामीवीर ब्रायन बेनेटला भोपळा फोडण्याआधीच सूर्यवंशीकडून झेलबाद केले. पुढे बेन करन (२०) व डियॉन मेयर्सने (१९) डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना अनुक्रमे रवी बिश्नोई व यश ठाकूरने बाद केले. विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूरने कमालच केली, त्याने आपल्याच गोलंदाजीवर झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाचा (०) झेल पकडत दुसरा बळी मिळविला. झिम्बाब्वेने ७.२ षटकांत ६५ धावांत ४ फलंदाज गमावले.

पुढे रायन बर्लने वेस्ली माधेवेरेसोबत पाचव्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी केली. मयंक यादवने माधेवेरेच्या रुपाने आपला दुसरा बळी घेतला. माधेवेरेने २५ चेंडूंत १ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने २८ धावांची भर घातली.

पुढे रायन बर्लने नाबाद खेळी करीत तादिवानाशे मारुमानी (१), ब्रॅड इव्हान्सच्या (१४) व न्यूमन न्यामहूरी (नाबाद १) साथीने संघाला विजयाच्या दिशेने नेण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु झिम्बाब्वेला २० षटकांत ७ बाद १५७ धावांपर्यंतच मजल मारता आली. रायन बर्लने ४३ चेंडूंत ५ चौकारांसह नाबाद ५४ धावांची जबरदस्त खेळी केली. भारताकडून मयंक यादवने ३ बळी, यश ठाकूरने २ बळी, तर अशोक शर्मा व रवी बिश्नोईने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# खेळाडूंनी लोकांची मने जिंकावीत : मोदी

## 'मन की बात' कार्यक्रमातून राष्ट्रकुल स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा



**नवी दिल्ली, २६ जुलै**

ग्लासगो येथे सुरू असलेल्या २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय पथकाला शुभेच्छा. प्रत्येक देशवासी भारतीय पथकाला सातत्याने शुभेच्छा देत आहे. प्रत्येक खेळाडूने उत्कृष्ट कामगिरी करून देशाचा गौरव वाढवावा आणि लोकांची मने जिंकावीत, अशीच सर्वांची इच्छा आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या १३६ व्या भागात बोलताना सांगितले.

ग्लासगो येथे २३ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेत आपला समृद्ध वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने भारताने आठ सामान्य क्रीडा प्रकार आणि पाच पॅरा-क्रीडा प्रकारांमध्ये १२० हून अधिक खेळाडूंचे पथक पाठवले आहे.

सुरुवातीच्या यशांमध्ये पॅरा पॉवरलिफ्टर झंडू कुमारने जिंकलेले कांस्यपदक आणि मुष्टियुद्ध व लॉन बॉल्समधील प्रगतीचा समावेश आहे.

शनिवारी २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी आणखी एक उत्साहवर्धक दिवस ठरला; यात मुष्टियोद्धा सचिन सिवाच याने उपांत्यपूर्व फेरीपूर्वीच्या फेरीत धडक मारली, तर महिलांच्या लॉन बॉल्स जोडीने- रूपा राणी तिर्की व पिंकी सिंग आपली विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीच्या दिशेने आगेकूच केली.

झंडू कुमारने कांस्यपदक जिंकून भारताच्या पदकांची खाती उघडल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी, भारतीय खेळाडूंनी मुष्टियुद्ध, लॉन बॉल्स व जिम्नॅस्टिक्समध्ये अनेक आशादायक कामगिरी केली.

तथापि, जलतरण व व्हीलचेअर बास्केटबॉलमध्ये मात्र निराशाजनक निकाल पाहायला मिळाले. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानू रविवारी आपली मोहीम सुरू करणार आहे; हीच विजयी लय कायम राखत पदकांची संख्या वाढवण्याचे भारताचे उद्दिष्ट असेल.

**'अक्षरकंदुक' अनोखा उपक्रम**

पंतप्रधान मोदींनी केरळमधील 'अक्षरकंदुक' या उपक्रमाचाही उल्लेख केला, जो फुटबॉलमधील संज्ञांच्या माध्यमातून संस्कृत भाषेला प्रोत्साहन देतो. यामध्ये एक शिक्षक आणि संस्कृत क्लब संस्कृत अक्षरांना फुटबॉलशी संबंधित शब्दांशी जोडून ही भाषा सोपी आणि रंजक पद्धतीने शिकवत आहेत.

मला केरळमधील एर्नाकुलम येथील दक्षिण चित्तूरमधील एका क्रीडा उपक्रमाबद्दल माहिती मिळाली. तेथील एका शाळेत संस्कृत क्लब आहे. अभिलाष नावाचे शिक्षक एका अनोख्या पद्धतीने संस्कृतचा प्रसार करत आहेत. या प्रकल्पाचे नाव 'अक्षरकंदुक' असे आहे. यात फुटबॉलमध्ये वापरल्या जाणाऱ्या शब्दांशी जोडून संस्कृत अक्षरे अतिशय सोप्या पद्धतीने समजावून सांगितली जातात, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले. (वृत्तसंस्था)




# भारतीय महिला हॉकी संघ विश्वचषकासाठी पात्र

**मस्कत, २६ जुलै**

येथे झालेल्या एफआयएच युथ हॉकी ५-एस आशियाई स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाला चीनकडून २-४ अशा फरकाने पराभव स्वीकारावा लागला आणि त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. चीनविरुद्ध अंतिम सामन्यात पराभव पत्करावा लागला असला तरी, रौप्यपदक जिंकत भारतीय महिला हॉकी संघाने 'एफआयएच युथ हॉकी ५-एस विश्वचषका'साठीचे महत्त्वपूर्ण स्थान निश्चित केले.

तत्पूर्वी, उपांत्य फेरीत कझाकस्तानवर ८-१ असा दणदणीत विजय मिळवून भारताने अंतिम फेरीतील आपले स्थान पक्के केले होते. मस्कत येथील या प्रभावी कामगिरीच्या जोरावर भारताने 'एफआयएच युथ हॉकी ५-एस विश्वचषका'साठीही पात्रता मिळवली आहे.

अंतिम सामन्यात चीनने दमदार सुरुवात केली आणि पहिल्याच मिनिटाला टोंगटोंग लू हिने गोल करीत संघाला आघाडी मिळवून दिली. ५ व्या मिनिटाला केक्सिन टँग हिने चीनची आघाडी दुप्पट केली, तर त्यानंतरच्या मिनिटाला जियाक्सिन गुओ हिने गोल करत गोलसंख्या ३-० अशी केली. मध्यंतरानंतर भारताने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला; १३ व्या मिनिटाला नौशीन नाझ हिने गोल करत गोलसंख्येतील अंतर कमी केले.मात्र, १९ व्या मिनिटाला चेन गे हिने गोल करत चीनची तीन गोलची आघाडी पुन्हा प्रस्थापित केली. २० व्या मिनिटाला पुष्पा मांझीने गोल करून भारताच्या आशा पल्लवित केल्या, पण चीनने आपली आघाडी कायम राखत विजेतेपद निश्चित केले. याआधी उपांत्य फेरीत भारताने कझाकस्तानविरुद्ध ८-१ असा दणदणीत विजय मिळवून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले. वर्चस्वपूर्ण खेळ केला. कर्णधार दिया, संदीप कुमारी, पुष्पा मांझी, श्रुती कुमारी व नौशीन नाझने एका पाठोपाठ गोल केले. कझाकस्तानच्या अयानात माझिमने १० व्या मिनिटाला गोल केला. भारतीय संघाच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत, 'हॉकी इंडिया'ने भारतीय संघातील प्रत्येक खेळाडूला १ लाख रुपये आणि सपोर्ट स्टाफमधील प्रत्येक सदस्याला ५०,००० रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले. (वृत्तसंस्था)

# शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर शारीरिक शिक्षण शिक्षकांचे आमरण उपोषण सुरु



## पदभरतीच्या मागणीसाठी राज्यभरातील शिक्षक आक्रमक

**पुणे, २६ जुलै-**

महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यातील शारीरिक शिक्षण शिक्षक भरतीच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे येथे २४ जुलैपासून शांततापूर्ण बेमुदत आमरण उपोषण सुरू झाले आहे. राज्यभरातील बी.पी.एड., एम.पी.एड. व -२०२५ पात्र शारीरिक शिक्षण शिक्षकांनी या आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा दिला आहे.

शालेय शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. सक्षम समाज, बलशाली राष्ट्रनिर्मिती आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवण्यात या विषयाची भूमिका महत्त्वाची असतानाही, गेल्या सुमारे २० वर्षांपासून शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या पदभरतीकडे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी, हजारो पात्र तरुण बेरोजगार आहेत.

यापूर्वी महासंघाच्या वतीने २७ एप्रिल आणि ८ जुलै २०२६ रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलने करण्यात आली होती. त्या वेळी शासनाकडून विशेष शिक्षक (क्रीडा) पदांच्या सेवा शर्ती जाहीर करून भरती प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर शिक्षकांना आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे.

हे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने सुरू आहे. मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरूच राहील, असा इशारा महासंघाने दिला आहे. आंदोलनाला महासंघाचे मार्गदर्शक प्रद्युम्न जोशी, कैलास माने, विश्वनाथ पाटोळे, अमोल जोशी, राज्याध्यक्ष संदीप मनोरे, राज्य सचिव तायाप्पा शेंडगे, तसेच राज्य कोअर कमिटी सदस्य व विविध पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले असून राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे.

**उपोषणात पंढरपूरचे पाटील सहभागी**

सध्या सुरू असलेल्या आमरण उपोषणात सहभागी पदाधिकारी : नागेश पाटील (पंढरपूर), सुमित बंडलकर (सातारा), शुभम ताठे (अहिल्यानगर), प्राजक्ता जोशी (छत्रपती संभाजीनगर).

**प्रमुख मागण्या**

* विशेष शिक्षक (क्रीडा) पदांची सेवा प्रवेश नियमावली व सेवा शर्ती तात्काळ प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया सुरू करावी.
* शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०२६ नुसार मंजूर ४,८६० विशेष शिक्षक (क्रीडा) पदांची १०० टक्के भरती पवित्र पोर्टल (-२०२५) च्या पहिल्या टप्प्यात करावी.
* शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ नुसार रिक्त होणाऱ्या शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या पदांवर इतर विषय शिक्षकांचे समायोजन न करता ती पदे पवित्र पोर्टलमार्फत भरावीत.
* जिल्हा परिषद केंद्रशाळा, माध्यमिक शाळा, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय आश्रमशाळा व समाजकल्याण विभागाच्या शाळांमधील सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत.
* पवित्र पोर्टल (-२०२५) ची भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करा

## सोलापूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे आवाहन

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे २९ ऑगस्ट रोजी भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त 'राष्ट्रीय क्रीडा दिन' साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना 'अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कार' प्रदान केले जाणार आहेत.

क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक, उत्कृष्ट क्रीडा पत्रकारिता आणि शा.शि.अध्यापक-संचालक या श्रेणींमधील पुरस्कारांसाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. पुरस्काराची नियमावली विद्यापीठाच्या www.sus.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज विहित नमुन्यात १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाकडे हस्तदये सादर करावेत. अर्जावर व लिफाफ्यावर कोणत्या पुरस्कारासाठी अर्ज केला आहे याचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक असून, मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी कळिवले आहे.

# अक्कलकोट १० कि.मी. भक्ती रन शर्यतीत रुपनर, बन्ने अव्वल

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ वर्धापन दिन व श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ जुलै-**

अक्कलकोट १० किलोमीटर भक्ती रन शर्यतीत १६ ते ३० वर्षे वयोगटात चैतन्य रुपनर व ज्योती बन्ने यांनी अव्वल स्थान पटकाविले. चैतन्यने ३०.३४ मिनिटात तर ज्योतीने ३८.२१ मिनिटात हे अंतर पूर्ण केले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट यांच्या ३९व्या वर्धापन दिनानिमित्त व चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा रविवारी सकाळच्या प्रहरी पार पडली. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गोवा आदी राज्यातून आलेल्या हजारहून अधिक धावपटूंसह अपंग धावपटूचाही स्पर्धेत सहभाग होता. श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! व हलग्यांच्या निनादात ''भक्ती रन'' स्पर्धेचा शुभारंभ न भुतोनी संपन्न झाला.

मार्गावर धावपटूंना प्रेरणा मिळावी यासाठी पंचमहाभूत (पृथ्वी,जल,अग्नी,वायू आणि आकाश) या संकल्पनेवर आधारित प्रेरणादायी पोस्टर्स लावण्यात आले होते. उत्कृष्ट हायड्रेशन,वैद्यकीय मदत,फिजिओ,स्वयंसेवक आणि शिस्तबद्ध रेस व्यवस्थापनामुळे स्पर्धेचे सर्वस्तरांतून कौतुक झाले.

प्रारंभी या स्पर्धेचे उद्घाटन व ध्वजप्रदान ख्यातनाम अभिनेते भरत जाधव, मयूर पाटील, श्री वटवृक्ष स्वामी महराज देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, उत्तर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर, आणि चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन सोलापूरचे अतिश शहा, चंद्रशेखर गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे सोलापुरचे पोलीस आयुक्त, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, तसेच त्यांच्या मित्रपरिवाराने स्वतः धावून सहभागी होत नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रेरणादायी संदेश दिला.

स्पर्धेतील विजेत्यांचा न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, शिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, खजिनदार लाल राठोड, मनोज निकम, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, प्रथमेश इंगळे, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, समर्थ संदीप फुगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले.

**क्रीडागंणाची साफसफाई**

यावेळी जनार्धन मानमंडे (रायगड) या स्पर्धकाला न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी गडांच्या पाहणीकरिता ११ हजाराची देणगी दिली. स्पर्धेनंतर क्रिडागणांची साफसफाई करण्यात आली. यासाठी अननछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले व मित्र परिवार आणि सेवेकरी यांनी संपूर्ण क्रीडागणांची स्वच्छता केली.

**अंतिम निकाल - पाच किलोमीटर : १६-३० वर्षे : पुरुष :** अनिकेत देशमुख (१५:३५), विशाल वाघमोडे (१५:४०), संकेत पाटील (१५:४१). **महिला :** रिया गोंदळ (२२:२२), श्रावणी लोंढे (२३:00), आधिका देशमुख (२४:५६). **३१-४० वर्षे :** पुरुष : राजू पिरागन्नवर (१७:२६), राजू शेख (१९:0२), पगार रोहिदास (२0:१0). महिलाः आरती कोळेकर (२४:१३), ललिता केदार (३८:0४), नागव्वा देशमुख (३९:५९). **४१-५0 वर्षे पुरुष :** कृष्णा सोनमळे (१७:५३), लगमन्ना माळी (१९:२१), शरद खिलारे (२१:0१). **महिला :** कविता जाधव (३0:२१), सोनाली थावरे (३0:५९), वैशाली गुंटूक (३१:५७). **५१ वर्षे वरील पुरुष :** पांडुरंग पाटील (२0:२0), नितीन वाघमोरे (२२:१४), रविंद्र धांडे (२३:५६). महिला : निलिमा जरगद (३८:२८), सरस्वती राठोड (५0:३५), विजया वाघमारे (५६:२0).

**१0 किलोमीटर : १६-३0 वर्षे : पुरुष :** चैतन्य रूपनर (३0:२४), अभिनंदन सुर्यवंशी (३१:१७), अंकुश हक्के (३१:५८). **महिला :** ज्योती बन्ने (३८:२१), मोनिका वाकळे (४४:३२), भक्ती मगदुम (४५:५५).

**३१-४0 वर्षे : पुरुष :** शिवप्रताप प्रजापती (३२:४८), मोहम्मद बिलाल (४१:0७), दादासो कांबळे (४२:0४). **महिला :** सोनिया प्रमाणिक (४७:२५), शिल्पा दहातोंडे (५१:0४), अक्षया बनसोडे (0१:२४:२0).

**४१-५0 वर्षे पुरुष :** प्रश्रम भोई (३५:0३), संतू वार्डेल (३७:४0), सुनील शिवणे (३८:0४). **महिला :** विनाया गुजर (५८:२६), मिनाझ नदाफ (५८:३७), शुभांगी देवकर (0१:00:१९).

**५१ वर्षेवरील पुरुष :** रविंद्र जगदाळे (३९:३३), रणजित कनबर्कर (४१:0५), शंकर लांडगे (४५:00). **महिला :** क्षीरसागर रामास्मिता (५३:५३), अनिता पाटील (१:0१:१६), रोहिणी टिळक (0१:0६:४८).

# ‘खेळ मांडियेला’ला महिलांची उडाली झुंबड

## ‘अन्नछत्र’मुळे ‘अक्कलकोट’ला सांस्कृतिक वारसा लाभला : अभिनेते आदेश बांदेकर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२६ जुलै-**

श्रीक्षेत्र अक्कलकोटला श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्यामुळे सांस्कृतिक वारसा लाभला आहे. गेल्या २७ वर्षापासून धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याने कलाकारांना प्रोत्साहन व व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य घडत आहे, असे प्रतिपादन ख्यातनाम अभिनेते आदेश बांदेकर यांनी केले. दरम्यान, दैनंदिन जीवनात व्यस्त असलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याच्या हेतुने आयोजित केलेल्या अभिनेते आदेश बांदेकर यांच्या ‘खेळ मांडियेला’ हे कार्यक्रम पाहण्यासाठी महिलांची अक्षरशः झुंबड उडाली होती.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरुपौर्णिमानिमित्त आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत रविवार, दि.२६ जुलै २०२६ रोजी अभिनेते आदेश बांदेकर प्रस्तुत ‘खेळ मांडीयेला’ (खेळ, किस्से, गप्पा, साऱ्या कुटुंबासाठी) ह्या कार्यक्रमाने ८ वे पुष्प संपन्न झाले. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांनाही आनंदाचे क्षण वेचता यावेत या अनुषंगाने महाराष्ट्रभर गाजत असलेले लाडके भाऊजी म्हणजेच आदेश बांदेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत खेळ मांडियेला संपन्न झाला. शेकडो माता-भगिनींनी या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

प्रारंभी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय व सोमकांत कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन करण्यात आले. विविध खेळ, गप्पा, चर्चा करत कार्यक्रम मोठ्या उत्साहात मंगलमय वातावरणात खेळ मांडियेला पार पडला. लकी ड्रॉद्वारे विजेत्या महिलांना ५ पैठणी, २५० घड्याळ पारितोषिक म्हणून देण्यात आले. पुणे येथील ज्ञान प्रबोधनकार या अपंग व अंध संस्थेच्या कलाकारांनी भजनाचा कार्यक्रम उत्तमरित्या सादर केले. वैशाली पांडगळे, शिलवंती गंगाधर राजमाने, जयश्री दत्तात्रय गवंडी, विजयालक्ष्मी रामचंद्र शिऊर, अंबिका बसप्पा लिगाडे या गुणीजणांसह अक्कलकोट तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या १० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. श्वेता हुल्ले यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचलन केले. शामराव मोरे यांनी आभार मानले. शंभुराजे इलेक्ट्रिकलने उत्कृष्ठ लाईट व्यवस्था केली होती.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या विश्वस्ता तथा हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई जनमेजयराजे भोसले, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या विश्वस्ता तथा हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले, जि.प.सदस्या शांभवी कल्याणशेट्टी, गिरीजा राजीमवाले, विशाला दिवाणजी, मल्लमा पसारे, डॉ. आसावरी पेडगावकर, डॉ.सौ.वेळापूरकर, डॉ.मेंथे, सुचित्रा बांदेकर, सोहम बांदेकर, पूजा बांदेकर, नगरसेविका अपर्णा सिध्दे, स्नेहा संतोष खवळे, सुनंदा स्वामी, कस्तुराबाई चौगुले, अमृता शिंदे, भागुबाई कुंभार, सोनाली शिंदे, रेणुका राठोड, अंजली नानल, डॉ.सायली बंदीछोडे, लक्ष्मी अचलेर, वैशाली लिंबीतोटे, अनुया फुगे, सरोजिनी मोरे, अनिता खोबरे, दिव्या मोरे, रत्नमाला मचाले यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी स्वाती निकम, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, क्रांती वाकडे, अनिता गडदे, धनश्री पाटील, कल्पना मोरे, अक्षता मोरे, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, रुपाली भोसले, व न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शामराव मोरे, राजेराय मठाचे अध्यक्ष ॲड. शरदराव फुटाणे-जाधव, संदीपदाजी फुगे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, समर्थ संदीप फुगे, विश्वस्त- लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, मनोज निकम, रमेश केत, मल्लिनाथ स्वामी, रोहित खोबरे, अरविंद शिंदे, अप्पा हंचाटे, सौरभ मोरे, प्रवीण देशमुख, निखील पाटील, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, बाळासाहेब घाटगे, अश्पाक काझी, मैनुद्दीन कोरबू, बाळासाहेब पोळ, कुमार सलबत्ते, सर्फराज शेख, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, संजय गोंडाळ, सत्तारभाई शेख, प्रसाद मोरे, वैभव मोरे, फहीम पिरजादे, केदार तोडकर, योगेश पवार, आकाश सूर्यवंशी, विनायक भोसले, भरत राजेगावकर, मल्लिकार्जुन बिराजदार, प्रा. शरणप्पा आचलेर, प्रशांत साठे, गोविंदराव शिंदे, ज्ञानेश्वर भोसले, समर्थ चव्हाण, सुमित कल्याणी, राहुल इंडे, उमेश येळसंगी, मुन्ना फडतरे, अमर पोतदार, अमर मसरे, पिंटू दोडमनी, शंभूलिंग अकतनाळ, मारुतीराव बावडे, दयानंद दणुरे, चाचा कडगंची, महेश लोकापुरे, सुनिल खवळे, खंडेराया शिंदे, प्रीतीश किलजे, शैलेश राठोड, प्रा.शरणप्पा अचलेर, विराज माणिकशेट्टी, बाबुराव कुलकर्णी, शिवा मंगरुळे, श्रीधर गुरव, रमेश हळसंगी, असद फलारी, संतोष माने, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.



### भक्तांना उत्तम आरोग्य, सुख, समृध्दी लाभो

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट या आपल्या संस्थेमार्फत दि.१९ ते २८ जुलै, २०२६ या कालावधीत धर्मसंकीर्तन व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे समजते. गुणीजनांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात येणार असल्याचे दिसते. हा उपक्रम समाजास निश्चितच स्तुत्य व प्रेरणादायी आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेने संस्थेचे धर्मप्रसार, अन्नदान, समाजसेवा आणि संस्कार जपणारे कार्य उत्तरोत्तर वृद्धिंगत होत राहो. सर्व भक्तांना उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि आध्यात्मिक उन्नती लाभो, हीच सदिच्छा! अशा आशयाचे शुभेच्छापर संदेशपत्र महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांनी पाठविले.

### आज संभावामि युगे युगे

सोमवार, दि. २७ जुलै रोजी सायंकाळी ७.१५ ते रात्रौ ९.३० पर्यंत नृत्य अविष्कार ‘‘संभवामि युगे युगे’’ संकल्पना, नृत्य व दिग्दर्शन संस्कृती बालगुडे, पुणे यांचा कार्यक्रम सादर होणार आहे.



## श्री भगवंताच्या दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांचे जन्मभूमी प्रतिष्ठानकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२६ जुलै -**

आषाढी एकादशीच्या धार्मिक भागवत सांप्रदायिक शुभ मुहूर्ताचे औचित्य साधत बार्शीतील श्री भगवंताचे दर्शन घेण्यासाठी निघालेल्या पिंपळगाव व पंचक्रोशीतील वारकऱ्यांचे जन्मभूमी प्रतिष्ठानकडून स्वागत करण्यात आले. त्यांना उपवासाचा फराळ व फलाहाराचे वाटप केले.

जन्मभूमी प्रतिष्ठानतर्फे सुरु केलेल्या सत्कार्याची मालिका पुढे नेत आषाढी एकादशीनिमित्त जन्मभूमी ग्रामविकास आघाडीचे प्रमुख सचिन धस, प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अण्णासाहेब पाटील, प्रवक्ते सुरत चंदनशिवे, राहुल धस, शिव मंदिर पुजारी धनाजी चव्हाण, महादेव मस्तूद, समाधान पवार, राम गरड, गणेश पवार, सोहेल शेख, राजेंद्र लोमटे, नारायण पवार आदींनी या भाविकांना उपवासाच्या अल्पोपहाराचे वाटप केले.

श्रावण महिन्यात गावात साकारत असणाऱ्या पुरातन शिव मंदिराचे जीर्णोद्धार व नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. लवकरच हे भव्य शिवालय भाविकांच्या सेवेत सादर होणार असल्याची माहिती जन्मभूमी प्रतिष्ठानने यावेळी दिली.

## इंगळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष एसआर कॅम्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ जुलै -**

अक्कलकोटमध्ये युवा नेते प्रथमेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष एसआर कॅम्पचे आयोजन केले होते. नगरसेवक महेश इंगळे यांनी याबाबत मार्गदर्शन केले.

प्रभाग क्र. ११ येथील साखर विहिरीजवळ, बेडर गल्ली आणि भीम नगर अक्कलकोट येथे या कॅम्पचे आयोजन केले होते. हजारो मतदारांनी याचा लाभ घेतला. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, उपमुख्य अधिकारी शैलेंद्र बिराजदार , अल्लोळी, अभिषेक काकडे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिरामध्ये बीएलओ म्हणून कार्यरत असलेले सुरवसे, हपाळे, शिंदे, राऊत, पी.एम.पाटील यांनी नोंदणी अर्ज भरून घेतले. शेखर मीनगले, रवी मलवे, मल्लिनाथ कुर्ले, आकाश चुगीकर, दिनेश रुही, स्वामी गायकवाड, दत्तामामा मडीखांबे, पुष्कराज मडीखांबे, सचिन बनसोडे, बंटी मडीखांबे, संदीप मढीखांबे, धोंडाप्पा कुंभार उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक अविनाश मडीखांबे, माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, वंचित आघाडीचे नेते चंद्रशेखर मडीखांबे व इतर पदाधिकाऱ्यांचही मार्गदर्शन लाभले.

## ‘चांगल्या गोष्टी, नवीन कल्पना, अनुभव लिहून ठेवण्याची सवय बाळगावी’



### भवानी पेठ विद्यार्थी संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

विद्यार्थ्यांनी स्वतःला घडविण्याकामी विशेष लक्ष द्यावे. विशेषतः घराबाहेर पडताना आपल्या सोबत एक वही आणि पेन ठेवावे. ज्या ठिकाणी जाल तेथील चांगल्या गोष्टी, नवीन कल्पना, अनुभव आणि महत्त्वाची माहिती लिहून ठेवण्याची सवय बाळगावी. हीच सवय भविष्यात यशाचा पाया ठरेल, असे प्रतिपादन सोलापूर विकास मंचचे योगिन गुर्जर यांनी केले.

भवानी पेठ विद्यार्थी संघटनेच्या वतीने आयोजित केलेल्या इयत्ता १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात ते बोलत होते. पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा भवानी पेठ विद्यार्थी संघटनेचे संस्थापक प्रा.श्रीनिवास कोंडी हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी गिरिकर्णिका फाऊंडेशनचे विजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

नोकरी आणि करिअर यामध्ये मोठा फरक आहे. नोकरी ही केवळ उत्पन्नाचे साधन असते, तर करिअर हे आयुष्य घडविणारे ध्येय असते. मावा, मादक व्यसने आणि अनावश्यक मिरवणुका यांपासून दूर रहावेत, असेही त्यांनी सांगितले. प्रा.श्रीनिवास कोंडी, विजय जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. रुपा दुस्सा-कमटम यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रवीण जिल्ला यांनी आभार मानले.

या कार्यक्रमासाठी विनायक कुर्री, श्रावण शेरला, गोवर्धन बिल्ला, नित्यानंद पिस्के यांच्यासह श्री शाकंभरी माता देवी मंदिराचे सहकार्य लाभले. याकामी चक्रधर अन्नलदास, विनायक मादम, प्रतिक्षित परदेशी, रेवणसिद्ध नरोणे, अमरनाथ दुस्सा, श्रीकांत नामणी, आकाश दुधगुंडी, नागेंद्र बुगडे, दीपक नरोणे, लक्ष्मीनारायण जिट्टा आदींनी परिश्रम घेतले.

## अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध; आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २६ जुलै -**

पुण्यातून अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात मंगळवेढ्याच्या निर्भया पथकाला यश आले आहे. याप्रकरणी आरोपीला पुणे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. मंगळवेढा बसस्थानकावर एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी व २१ वर्षाचा तरुण संशयितरित्या बसल्याचे मंगळवेढा निर्भया पथकाच्या प्रमुख डॉ.आरती कणिरे यांना आढळून आले. त्यांनी दोघांना ताब्यात घेवून चौकशी केली असता ते दोघे पळून आल्याची माहिती उघड झाली. दोघेही पुणे जिल्ह्यातून पळून आल्याचे समजले. त्यानुसार डॉ.आरती कणिरे यांनी पुणे पोलिसांना संपर्क साधला.

दोन दिवसापुर्वी चिखली जि.पुणे पोलिस स्टेशन हद्दीतील आरोपी अविनाश वाघमारे (वय २१) हा एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन फलटणहून मंगळवेढा येथे आला होता. यादरम्यान निर्भया पथकाच्या प्रमुख डॉ.आरती कणिरे या मंगळवेढा बसस्थानकावर फिरत असताना त्या दोघांचा डॉ. कणिरे यांना संशय आल्याने त्यांनी कसून चौकशी सुरु केली. मात्र ते व्यवस्थित उत्तरे देत नसल्याने दोघांना ताब्यात घेवून मंगळवेढा पोलिस स्टेशनमध्ये आणले. यावेळी आरोपी अविनाश वाघमारेने आम्ही दोघे एक महिन्यापुर्वी पळून आल्याचे सांगितले. मंगळवेढा बसस्थानकावरुन पाठखळ येथे एका नातेवाईकाकडे जाणार होतो असेही सांगितले.

पुणे येथील चिखली पोलीस स्टेशनमध्ये अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा गुन्हा दाखल होता. याचा तपास पोलीस उपनिरीक्षक देवकुळे हे मागील महिन्यापासून करत होते. आरोपीचा मोबाईल बंद असल्यामुळे त्यांचा सुगावा लागत नव्हता. डॉ.कणिरे यांनी तपासिक अंमलदार पोलीस उपनिरीक्षक देवकुळे यांच्याशी संपर्क साधून सदर घटनेची माहिती दिली. देवकुळे यांनी संध्याकाळी मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये हजर होवून आरोपीला ताब्यात घेतले. तर १७ वर्षीय मुलीला आई वडीलांकडे सुपुर्द केल्याचे सांगितले.

## महाराष्ट्र विद्यालयाच्या फुटबॉल संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि २६ जुलै -**

जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर यांच्यावतीने वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर येथे आयोजित जिल्हास्तरीय सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालय, बार्शीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

स्पर्धेतील १५ वर्षांखालील मुलांच्या फुटबॉल संघाने अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या शानदार विजयामुळे संघाची पुणे विभागीय सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व खेळाडूंना विभागीय स्तरावर खेळण्याची संधी मिळाली आहे. याच स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या फुटबॉल संघानेही उपविजेतेपद मिळवले. स्पर्धेसाठी क्रीडाशिक्षक पुष्कराज पाटील, योगेश उपळकर, विकास पाटील व शिवराज बांरगुळे यांचे मार्गदर्शन लाभले यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी. टी. पाटील, सहसचिव ए.पी.देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. मिरा यादव, सदस्य एस. बी. शेळवणे व बी. के. भालके, सर्व कार्यकारिणी सदस्य, संस्था सदस्य, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## मंगळवेढा तालुक्यात ड्राय डे दिवशीच दारु विक्रीत वाढ

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. २६ जुलै -**

मंगळवेढा तालुक्यात विशेषत: ग्रामीण भागातील हॉटेलमध्ये ड्राय डे दिवशीच मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर दारू विक्री फोफावत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष पथकाकडून ठोस कारवाई करण्याची मागणी होत आहे. शनिवार २५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात ड्राय डे पाळला गेला. मात्र प्रत्यक्षात दामाजी नगर व चोखामेळा नगर या ग्रामपंचायत हद्दीमध्ये बेकायदेशीर बनावट दारूची जादा भावाने विक्री होत असल्याचे दिसून आले. संबंधित विभागाचे अधिकारी तालुक्यातील आमदारांचाही आदेश पाळत नाहीत, असे दिसून येत आहे.

## निधन वृत्त...

### तुकाराम इंदलकर-पाटील



**टेंभुर्णी, दि. २६ जुलै -**

चव्हाणवाडी (टे) ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तुकाराम भानुदास इंदलकर पाटील (वय ७०) यांचे शनिवारी दि. २५ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते टेंभुर्णी पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय भोसले यांचे मामा होत.



## उजनी धरण @ ९० टक्के

### पुणे जिल्ह्यातील धरणांतून प्रचंड विसर्ग

### ५५ हजार क्युसेकपेक्षा जास्त आवक

### धरणात उपयुक्त पाणी साठा ८६.४२ टक्क्यांवर पोचला

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२६ जुलै -**

भीमा खोऱ्यात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पुणे जिल्ह्यातील प्रमुख धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरली आहेत. पूरनियंत्रणासाठी विविध धरणांतून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे. परिणामी रविवारी दि. २६ जुलै रोजी संध्याकाळी प्राप्त माहितीनूसार उजनी धरणात पुणे जिल्ह्यातून ५५ हजार क्युसेकपेक्षा जास्त विसर्ग येत आहे. याच गतीने किंवा अधिक विसर्ग येण्याची शक्यता असून सोमवार दि. २७ जुलै रोजी सकाळपर्यंत धरणाचा उपयुक्त पाणी साठा ९० टक्क्यांवर पोचण्याची दाट शक्यता आहे. सध्या धरणातील उपयुक्त पाणी साठा ८६. ४२ टक्क्यांवर पोचला आहे.

रविवार सायंकाळी सहा वाजेपर्यंतच्या अहवालानुसार, खडकवासला प्रकल्पातील धरणांसह पवना, चासकमान, भामा-आसखेड, घोड, आंद्रा, कळमोडी आणि वीर धरणांमध्ये ८५ ते १०० टक्क्यांदरम्यान उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. सध्या मुळशी धरणातून १० हजार क्युसेक, पवना धरणातून ७,४५० क्युसेक, चासकमान धरणातून १५ हजार क्युसेक, घोड धरणातून १२ हजार क्युसेक, वीर धरणातून १३,९११ क्युसेक, भामा-आसखेड धरणातून ४,३९६ क्युसेक, वडिवळे धरणातून ४,७०४ क्युसेक्स आणि खडकवासला धरणातून २,९९६ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. या सर्व धरणांतील पाणी भीमा नदीमार्गे उजनी धरणाकडे येत असल्याने धरणातील आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे.

सध्या धरणाच्या सांडवा, वीजनिर्मिती केंद्र आणि रिव्हर स्लुईसमधून कोणताही विसर्ग केला नसला, तरी सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी २८० क्युसेक, दहीगाव उपसा सिंचन योजनेसाठी ९० क्युसेक, भीमा-सीना बोगद्यासाठी ९०० क्युसेक आणि मुख्य कालव्यातून २ हजार क्युसेक पाणी सोडले जात आहे. भीमा खोऱ्यातील पावसाचा जोर कायम राहिल्यास वरच्या धरणांमधील विसर्गात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उजनी धरणाच्या पाणीस्थितीवर जलसंपदा विभागाचे बारकाईने लक्ष आहे. नदीकाठच्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उजनी धरणाची सद्यस्थिती

उजनी धरणाची पाणीपातळी सध्या ४९६.२०० मीटरवर पोहोचली आहे. धरणातील एकूण पाणीसाठा १०९.९५ टीएमसी, तर उपयुक्त पाणीसाठा ४६.३० टीएमसी इतका झाला आहे. उपयुक्त साठ्याची टक्केवारी ८६.४२ टक्क्यांवर पोहोचली आहे. धरणाचे जलसाठा क्षेत्र ३१७.८२ चौ. कि.मी. इतके नोंदविण्यात आले आहे. दौंड नदी मापन केंद्रावरून ५०१.१०० मीटर पाणीपातळीची नोंद झाली आहे. उजनी धरणात तब्बल ५५ हजार ३१९ क्युसेक वेगाने पाण्याची आवक सुरू आहे.
































# होय, लातूर बदलतंय




सुरुवातीच्या काळात लातूर हे शहर औसा तालुक्यातील एक प्रमुख शहर होते . कालांततने लातूर हे औशापासून वेगळे झाले . त्यावेळी केशवराव सोनवणे हे १९५७ ते१९६७ मध्ये आमदार झाले .१९६२ ते१९६७ मध्ये ते यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात सहकार मंत्री होते तसेच१९७१ ते१९८० या दरम्यान केशवराव सोनवणे औशाचे आमदार होते .१९६७ नंतर जिल्ह्याला सहकार मंत्रीपद कधीच मिळाले नव्हते . पण आता बाबासाहेब पाटील यांना सहकार खाते मिळाल्यामुळे ते दुसरे जिल्ह्याचे सहकार मंत्री झाले आहेत .

तेव्हाचे मुख्यमंत्री बॅ. ए . आर . अंतुले यांनी१६ ऑगस्ट१९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करुन लातूर जिल्हा अस्तित्वात आणला . त्या वेळी जिल्हयात लातूर, औसा, निलंगा, उदगीर आणि अहमदपूर हे तालुके होते .१५ ऑगस्ट९२ मध्ये जिल्हा पुनर्रचना करताना रेणापूर आणि चाकूर तालुक्याची निर्मिती झाली . त्यानंतर२३ जून९९ मध्ये पुन्हा जिल्हयाची पुनर्रचना करताना देवणी, जळकोट आणि शिरूर अनंतपाळ या तालुक्याची निर्मिती झाली .

लातूर हे१६ वे मोठे शहर असून जिल्हयाचे क्षेत्रफळ७३७२ चौरस किलोमीटर आहे . जिल्ह्याच्या सीमा नांदेड, बीड, उस्मानाबाद आणि कर्नाटक या जिल्हयांनी व्यापलेल्या आहेत . जिल्ह्यातील प्रमुख पिकांमध्ये सोयाबीन, ज्वारी, तूर, गहू, ऊस यांचा समावेश असून लातूर हे सोयाबीन चे व्यापारी केंद्र आहे . जिल्ह्यात मांजरा, विकासरत्न,२१ शुगर, जागृती साखर, रेणा कारखाना, नीळकंठेश्र्वर साखर कारखाना असे साखर कारखाने असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उसाची चांगली सोय झाली आहे .

लातूर हे पर्यटन क्षेत्र म्हणून ही प्रसिद्ध असून जिल्ह्यात खरोसा लेणी, औसा किल्ला, उदगीरचा किल्ला, गंज गोलाई, सिद्धेश्र्वर मंदिर, अष्ठ विनायक, बुद्ध गार्डन, नीळकंठेश्र्वर मंदिर, संजीवनी बेट, हत्ती बेट, नाना - नानी पार्क आदी बघण्या सारखी ठिकाणे आहेत

मांजरा, तेरणा, तावरजा, घरणी या प्रमुख नद्या आहेत . जिल्ह्यात अमित देशमुख, रमेश कराड, संभाजी पाटील, अभिमन्यू पवार, संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे, औरंगाबाद विभाग पदवीधर आमदार सतिश चव्हाण, लातूर - बीड - धाराशिव स्थानिक संस्था आमदार बसवराज पाटील असे आमदार लाभलेले आहेत .

जिल्हातून अमित देशमुख, संभाजी पाटील, संजय बनसोडे आणि बाबासाहेब पाटील यांनी मंत्री म्हणून तर अमित देशमुख आणि संभाजी पाटील यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही काम केले असून शिवाजीराव पाटील निलंगेकर आणि विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे . या दोघांनीही लातूर चे नाव राज्यात मोठे केले . विलासराव देशमुख यांनी तर जे_ जे नवे, ते_ ते लातूरलाच हवे . या प्रमाणे काम केले आहे .तसेच शिवराज पाटील चाकूरकर यांनी देशाचे राज्य मंत्री, कॅबीनेट मंत्री, लोकसभेचे सभापती आणि गृहमंत्री म्हणून चांगल्या प्रकारे काम करून देशाची मान उंचविण्याचे काम केले आहे .

लातूर जिल्हा हा लातूर पॅटर्न म्हणून राज्यात नव्हे तर देशात ओळखला जातो . प्रत्येक क्षेत्रात लातूरने उत्तम काम करून आपला वेगळा ठसा निर्माण केला असून त्यातही लातूर पॅटर्न निर्माण केला आहे .














## महत्वाचे...

### विवाहितेला अपमानास्पद वागणूक; पतीसह पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

एका विवाहितेला वारंवार अपमानास्पद वागणूक देत, उपचारासाठी पैसे न देता शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती अमोल कटारे, सासू छाया कटारे, सासरे मुरलीधर कटारे, दीर गौतम कटारे, जाऊ दीक्षा कटारे (सर्वजण रा.सुरतगाव, जि.धाराशिव) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत पल्लवी अमोल कटारे (रा.आनंद चौक, न्यू बुधवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.१९ ऑगस्ट २०२१ पासून ते आजतागायत सासरी नांदत असताना वरील आरोपींनी वारंवार अपमानास्पद वागणूक दिली. उपचारासाठी पैसे न छळ केला.

### मुलीला आणून सोड असे म्हणत केली दगडफेक; एकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

तुझ्या मुलीला माझ्याकडे आणून सोड म्हणून जीवे मारण्याची धमकी देऊन एका महिलेच्या घरावर दगडफेक केल्याप्रकरणी गणेश शिवाजी आगवणे (रा.ढोर गल्ली, भवानी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रुक्मिणी सिध्देश्वर लोखंडे (रा.सोमाणी प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. दि.२४ जुलै रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादी ह्या घरात असताना गणेश आगवणे याने घराचे मागे येवून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तुझी मुलगी माझेकडे आणून सोड नाहीतर तुला व तुझ्या मुलाला खल्लास करुन टाकेन असे म्हणत घरावर दगडफेक केली.

### डंपर चालकास बेदम मारहाण; रिक्षाचालकांसह चौघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

रिक्षाला वाहनाचा धक्का लागल्याच्या कारणावरुन एका डंपर चालकास लाथाबुक्क्यांनी व लाकडाने बेदम मारहाण केल्याप्रकरणी एका रिक्षाचालकासह चौघा जणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आण्णा घाटे, जानप्पा कांबळे आणि अन्य दोन अज्ञात इसम अशी त्यांची नावे आहेत. याबाबत राजू मोहन म्हेत्रे (रा.देसरा हिप्परगी, जि.विजापूर, कर्नाटक) यांनी फिर्याद दिली.दि.२५ जुलै रोजी राणा हॉटेल समोर यातील फिर्यादीच्या ओळखीचा चालक दोडप्पा बसप्पा तलगेरी हा घेऊन निघालेल्या हायवा डंपरचा एम.एच.१३ सी.टी.०१३६ या क्रमांकाच्या रिक्षाला धक्का लागला. यावरुन त्या चौघांनी डंपर चालकास शिवीगाळ व मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

### नवीन घर घेण्यासाठी ५ लाख रुपये आण असे म्हणत छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

नवीन घर घेण्यासाठी माहेरुन ५ लाख रुपये आण असे म्हणत एका विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती चंद्रकांत राजगुरु, सासू सुनीता राजगुरु, दीर श्रीकांत राजगुरु, जाऊ श्रध्दा राजगुरु व तेजस्विनी राजगुरु (सर्वजण रा.लक्ष्मण नगर, सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत अपर्णा चंद्रकांत राजगुरु (वय-२८, रा.संजय गांधी नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी दि.२१ नोव्हेंबर २०२१ रोजी ते आजतागायत सासरी नांदत असताना वरील आरोपींनी नवीन घर घेण्यासाठी माहेरुन ५ लाख रुपये आण असे म्हणत शारिरिक, मानसिक त्रास देत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# सोलापूरची वाटचाल शाश्वत पाणीपुरवठ्याच्या दिशेने

## ■ जागतिक बँक व मनपाच्या उच्चस्तरीय कार्यशाळेत विविध बाबींवर सखोल मंथन ■

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

सोलापूर शहरातील नागरिकांना सातत्यपूर्ण, सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत २४७ पाणीपुरवठा सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महानगरपालिका आणि जागतिक बँकेच्या प्रतिनिधींची उच्चस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा झाली. यामध्ये विविध मुद्द्यांवर सखोल मंथन करण्यात आले.

कार्यशाळेस जागतिक बँकेकडून डॉ.आलोक सुमन, श्रीनिवास राव, जोर्ग, कॅमेन यी, रोझ डोमिंगोस, गुस्तावो, मूर्ती, सुमन तर महानगरपालिकेकडून महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, सभागृह नेते नरेंद्र काळे, भाजप सोलापूर शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, महानगरपालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, अभियंता उमर बागबान यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूर शहराच्या विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्थेतील आव्हाने, शहराची वाढती लोकसंख्या व भविष्यातील पाण्याची मागणी, उपलब्ध जलस्रोतांची दीर्घकालीन सुरक्षितता आणि सध्याच्या ठरावीक वेळेच्या पाणीपुरवठ्यातून निरंतर २४७ पाणीपुरवठ्याकडे संक्रमण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शहराच्या अंतर्गत पाणीपुरवठा सुधारणा प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये शहराची विद्यमान व भविष्यातील पाण्याची मागणी, शहरवाढीचे कल, अस्तित्वातील पाणीपुरवठा पायाभूत सुविधांची स्थिती, आवश्यक बळकटीकरण, बल्क वॉटर आणि वितरण प्रणालीतील प्रस्तावित सुधारणा, भांडवली गुंतवणूक, प्रकल्प अंमलबजावणीचे टप्पे आणि नागरिकांना मिळणाऱ्या अपेक्षित सेवा सुधारणांचा आढावा घेण्यात आला.



### पाणीगळती व एनआरडब्ल्यू कमी करण्याला प्राधान्य

२४७ पाणीपुरवठा यशस्वी करण्यासाठी नॉन रेवेन्यू वॉटर (एनआरडब्ल्यू) कमी करणे, पाणीगळतीवर नियंत्रण, मागणी व्यवस्थापन आणि वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविणे या बाबींना प्राधान्य देण्याचे अधोरेखित करण्यात आले. शहरात डिस्ट्रिक्ट मीटर्ड एरियाज विकसित करून प्रत्येक भागातील पाण्याचा प्रवाह व दाब यांचे नियमित निरीक्षण करणे, पाणीगळती ओळखणे आणि टप्प्याटप्प्याने २४७ पाणीपुरवठा क्षेत्र विकसित करण्याच्या कार्यपद्धतीवर चर्चा करण्यात आली. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी डिझाईन बिल्ड ऑपरेट (डीबीओ) या दीर्घकालीन करार पद्धतीवर सखोल चर्चा झाली.

### प्रत्येक घराला मीटरयुक्त नळजोडणी; स्काडाद्वारे आधुनिक नियंत्रण

प्रकल्पांतर्गत शहरातील पात्र घरांना मीटरयुक्त नळजोडणी देणे, पाणीपुरवठा व्यवस्थेचे स्काडा आधारित रिअल-टाइम मॉनिटरिंग, प्रतिबंधात्मक व दुरुस्ती देखभाल, प्रभावी बिलिंग व महसूल व्यवस्थापन तसेच उत्तरदायित्वाची यंत्रणा सक्षम करण्याबाबत चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या सुविधेसाठी कस्टमर सर्व्हिस सेंटर्स आणि प्रभावी ग्रीव्हांस रिड्रेसल मेकॅनिझम उभारून पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यावरही भर देण्यात आला.

### दर्जेदार पाणीपुरवठा करण्यास प्राधान्य : आयुक्त डॉ.ओम्बासे

महानगरपालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी याबाबत सांगितले की, सोलापूर शहराची भविष्यातील वाढ लक्षात घेऊन पाणीपुरवठा व्यवस्थेचे सर्वंकष आधुनिकीकरण आवश्यक असल्याचे नमूद केले. जलस्रोतापासून ते नागरिकांच्या नळजोडणीपर्यंत संपूर्ण पाणीपुरवठा साखळी अधिक सक्षम, कार्यक्षम आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या दिशेने महानगरपालिका प्रयत्नशील आहे. नागरिकांना पुरेशा दाबाने, सुरक्षित आणि विश्वासार्ह पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे तसेच पाणीगळती कमी करून उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे याला प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## पाच दिवसांपासून बेपत्ता तरुणाचा मृतदेह मुळेगावतांडा शिवारातील विहिरीत आढळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

मागील पाच दिवसांपासून घरातून बेपत्ता झालेल्या एका २६ वर्षीय तरुणाचा मृतदेह मुळेगाव तांडा शिवरात एका शेता-तील विहिरीत पाण्यावर तरंगताना आढळून आला. मंजुनाथ मल्कप्पा शेट्टी ( वय २६ वर्ष, रा. प्लॉट २८, चांद लक्ष्मीनगर, शेळगी, सोलापूर, मूळ रा. भुंयार, ता. चिंचोली, जी.गुलबर्गा) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मंजुनाथ शेट्टी हा मजुरीने काम करायचा. मागील रविवारपासून तो घरा-तून बेपत्ता झाला होता. त्याच्या पालकांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात मिसिंग दाखल केली होती. शुक्रवारी सकाळी मुळेगाव तांडा शिवारातील यांच्या विहिरीमध्ये एका अनोळखी तरुणाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना परिसरातील सोन्यामारुती पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या कामगाराला दिसून आला.

ही माहिती सोलापूर तालुका पोलिसांना मिळताच पोलिस हवालदार एम.आर. कटकधोंड व सिव्हिलचे रुग्णसेवक लादेन हे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी क्रेनच्या सहाय्याने पाण्यावर तरंगत असलेल्या तरुणाचा मृतदेह विहिरी बाहेर काढला. त्याच्या शरीराला अळ्या लागल्या होत्या. तेव्हा लादेन यांनी त्या तरुणाचा व्हिडिओ काढून त्याची ओळख पटावी म्हणून काही ग्रुपवर सेंड केला.

त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून सदरचा मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला. दरम्यान, लादेन यांनी टाकलेला व्हिडिओ पाहून खात्रीसाठी त्या तरुणाचे नातेवाईक हे सिव्हिलमध्ये आल्यावर मृतदेह हा त्यांच्या मुलाचा मंजुनाथ याचाच असल्याचे निष्पन्न झाले. मयत मंजुनाथच्या पश्चात आई, वडील, एक बहीण असा परिवार आहे.

## पालखी मार्गावर नियोजन; जिल्हा परिषदेचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जुलै-**

आषाढी वारीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी व महापूजेसाठी पंढरपूर येथे आगमन झालेल्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य व



उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालखी मार्गावर जिल्हा परिषदेने केलेल्या नियोजनाचे कौतुक केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करताना सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ झाली आणि समाजसेवेच्या कार्यात अधिक जोमाने कार्य करण्याची नवी उर्मी व नवचैतन्य मिळाले अशी प्रतिक्रिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी व्यक्त केली. यावेळी आमदार राजेंद्र राऊत, विनायक सुतार, शहाजी पवार उपस्थित होते.

## मुसळधार पाऊस, धरणातील विसर्ग यामुळे चंद्रभागेची पाणीपातळी वाढणार?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

नीरा नदीच्या पात्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि वीर धरण भरल्याने धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे, अशी माहिती लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने देण्यात आली आहे.



वीर धरण यापूर्वीच पूर्ण क्षमतेने भरले असल्याने अतिरिक्त पाण्याचा साठा करणे शक्य नाही. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. दि.२२ जुलै २०२६ रोजी ४६०० क्युसेकने सुरु झालेला विसर्ग दि.२४ जुलै २०२६ पासून १५ हजार क्युसेक करण्यात आला.

तो आता २५ हजार क्युसेकपर्यंत वाढवण्यात आला आहे. रविवार, दि.२६ जुलै रोजी १७ हजार ६०८ क्युसेस इतका विसर्ग चालू आहे. या पाण्याचा निचरा नीरा नदीमार्गे भीमा नदीत होत असून, त्याचा थेट परिणाम चंद्रभागेच्या पातळीवर होणार आहे. पाणीपातळीत सातत्याने वाढ होणार असल्याने नागरिकाने नदीपात्रात उतरु नये, असे आवाहन अधीक्षक अभियंता, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण (पाटबंधारे विभाग) सोलापूर यांनी केले आहे.

## पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते ॲड. मिलिंद थोबडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्या सदस्यपदी सलग तिसऱ्यांदा ऐतिहासिक आणि दैदिप्यमान विजय संपादन केल्याबद्दल ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मिलिंद थोबडे यांचा सोलापूर बार असोसिएशनच्या वतीने विशेष सरकारी अभियोक्ता तथा राज्यसभा खासदार पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




सोलापूर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड.रियाज शेख यांनी ॲड. मिलींद थोबडे यांच्या अष्टपैलू कायदेशीर कारकिर्दीचा व त्यांच्या सामाजिक योगदानाचा गौरव करणाऱ्या सन्मानपत्रा-चे वाचन केले. ॲड.शरद पाटील, ॲड.मंगला चिंचोळकर, ॲड.श्रीनिवास क्यातम, ॲड.डी.एन. भडंगे, ॲड.संजीव सदाफुले, ॲड.अमोगसिद्ध साखरे यांनी मनोगत व्यक्त केले.

सत्काराला उत्तर देताना ॲड.मिलिंद थोबडे म्हणाले की, सोलापूरच्या वकील वर्गाने आणि माझ्या सहकाऱ्यांनी माझ्यावर दाखवलेला हा विश्वास माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. सलग तिसऱ्यांदा मिळालेला हा विजय माझा एकट्याचा नसून सोलापूरच्या संपूर्ण विधी क्षेत्राचा विजय आहे. वकिलांच्या कल्याणासाठी आणि न्यायालयाच्या बळकटीकरणासाठी मी कटिबद्ध राहीन.''

पद्मश्री ॲड.उज्ज्वल निकम यांनी ॲड.मिलींद थोबडे यांच्या कामाची प्रशंसा करत सोलापूर बार असोसिएशनच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. ॲड.मनोज पामुल व ॲड.मलसिद्ध देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी आभार मानले. मंचावर ॲड.मिलिंद थोबडे यांच्या धर्मपत्नी सुचिता थोबडे, ॲड.मीरा प्रसाद

## अनुसुचित जाती आरक्षणावरील उपवर्गीकरच्या विरोधात आज महामोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात सोमवार, दि.२७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सोलापुरात विराट महामोर्चा काढण्यात येणार आहे. न्यू बुधवार पेठेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून या महामोर्चास सुरुवात तर जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील पुनम गेट येथे समारोप करण्यात येणार आहे. माजी सामाजिक न्याय मंत्रीद्वय बबनराव घोलप, आ.राजकुमार बडोले, चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, रुक्मिणी लोंढे आदी मोर्चाच्या अग्रभागी राहणार आहेत. या मोर्चाद्वारे अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाला विरोध यांसह संविधानातील आरक्षण हक्कांचे संरक्षण आणि सामाजिक न्यायाची मागणी करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.

# सहकारातून सामान्य माणसापर्यंत आधुनिक बँकिंग पोहोचवा : खडके

### मनोरमा बँकेच्या अंत्रोळीकर नगर येथील अकराव्या शाखेचे ऑनलाईन उद्घाटन

### कै.सदाशिवराव रामचंद्र मोरे आदर्श शिक्षक पुरस्काराचे थाटात वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

सहकार ही केवळ आर्थिक व्यवस्था नसून सामान्य माणसापर्यंत आर्थिक सक्षमीकरण पोहोचविणारी प्रभावी चळवळ आहे. नागरी सहकारी बँकांच्या ठेवी सहा लाख कोटी रुपयांवर पोहोचल्या असून आता ग्राहकांना आधुनिक मोबाईल बँकिंगसह तंत्रज्ञानाधारित सुविधा देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कॉसमॉस बँकेचे चेअरमन संजीव खडके यांनी केले.



मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अंत्रोळीकर नगर या अकराव्या शाखेच्या अकराव्या शाखेच्या ऑनलाईन स्वरुपात उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कै. सदाशिवराव मोरे आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे होते.

याप्रसंगी आमदार तथा लोकमंगल बँकेचे चेअरमन सुभाष देशमुख, पुणे पीपल्स मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन श्रीधर गायकवाड, जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार, शहर उपनिबंधक उमेश पवार, जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग एक धाराशिवचे व्ही.व्ही. डोके, मनोरमा मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी, धनश्री परिवाराचे चेअरमन प्रा.शिवाजीराव काळुंखे, अविनाश महागावकर, सांगलीचे नायब तहसीलदार जितेंद्र मोरे उपस्थित होते.

आ.सुभाष देशमुख याप्रसंगी बोलताना म्हणाले, बँकेचा मालक हा सभासद आहे. लोकमंगल आणि मनोरमा परिवार एकत्र आला तर सोलापुरात ती सहकारात फार मोठे क्रांती होईल. 'मनोरमा'चे सर्वेसर्वा श्रीकांत मोरे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, मनोरमा बँकेच्या वाटचालीला तीन दशक होत आहेत. सहकारात काम करताना काही अडचणी आल्या. त्यावर मात करुन पुढे जाणे हा अर्थकारणाचा भाग आहे. डॉ.ऋचा पाटील-मोरे यांनी प्रास्ताविक केले. शोभा मोरे यांनी स्वागत केले. डॉ. सुमित मोरे, व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे, डॉ.आदित्य पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पल्लवी पवार यांनी सूत्रसंचालन केले. व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे यांनी आभार मानले.

### यांचा झाला आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

वैशाली ज्ञानेश्वर कार्वेकर (जिल्हा परिषद शाळा, शेटे वस्ती, ता.उत्तर सोलापूर), निर्मला लक्ष्मण केदारलिंगे (जिल्हा परिषद शाळा, जगताप वस्ती, ता.मोहोळ), राहुल रामू राठोड (जिल्हा परिषद शाळा, बेलाटी, ता.उत्तर सोलापूर), चंद्रकांत पुंडलिक नवले (जिल्हा परिषद शाळा, वाघोली, ता.मोहोळ), रमेश गोविंद जाधव (जिल्हा परिषद शाळा, इंदिरानगर कासेगाव, ता.दक्षिण सोलापूर), विजय अच्युत गुंड (जिल्हा परिषद शाळा, गावडे वस्ती, ता.मोहोळ) आदींना कै.सदाशिवराव रामचंद्र मोरे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१५१४

**दीपा आणि प्रकाशा। एकवंकीचा पाडू जैसा।।**
**तो माझ्या ठायी तैसा। मी तयामाजीं।।**

योगाने माणसाचे मन शुध्द आणि स्थिर होते. मनाच्या शुध्दीमुळे व स्थैर्यामुळे तो सर्वांकडे समदृष्टीने पाहतो. सर्व प्राणीमात्राच्या ठिकाणी आपणच आहोत व सर्व प्राणीमात्र आपल्या ठिकाणी आहेत. अशा दृष्टीने असा योगी पाहत असतो. अर्थात, आपल्यासह सर्व प्राणीमात्र एकाच ईश्वराचे अंश असल्याचे योगी पाहातो. प्राणिमात्राच्या दिखाऊ भेदाने त्याला वेगळेपणाचे अस्तित्व जाणवत नाही. योगी सर्व चराचरात समता, एकात्मता कशी पाहतो किंवा तो आपल्या पासून ईतरांना व ईतरापासून आपणाला वेगळे कसे समजत नाही, हे सांगतांना श्रीकृष्ण भगवान म्हणाले,

**दीपा आणि प्रकाशा। एकवंकीचा पाडू जैसा।।**
**तो माझ्या ठायी तैसा। मी तयामाजीं।।**

अर्थात, दिवा आणि प्रकाश यांच्यामध्ये ज्या प्रकारची एकतेची भावना असते, त्याप्रमाणे तो माझ्याठिकाणी आणि मी त्याच्याठिकाणी असतो. दिवा आणि प्रकाश वेगळे असत नाहीत. त्या दोघांना वेगवेगळे करता येत नाही. पाण्यापासून ओलावा किंवा ओलाव्यापासून पाणी वेगळे नसते, तसे एकमेकांचे अस्तित्व योगामुळे एकरुपपणाचे निर्माण होते. अर्थात, भिन्नता किंवा भेद नांवाचा प्रकार उरत नाही.



वस्त्रामध्ये सर्वत्र एकच धागा असतो. धागा केवळ उभा, आडवा लावल्याचे दिसते. धागा, उभा-आडवा जरी लावला तरी तो एकच असतो. तसेच एकात्मतेच्या दृष्टीने पाहिल्यास या जगरुपी वस्त्रातील सर्व प्राणीमात्ररुपी धागे एकच असल्याचे दिसते. या सर्व धाग्यांनी मिळून एकच वस्त्र बनते. या वस्त्रात, धाग्यात एकच परमात्म शक्ती आहे. भिन्नता नांवाचा प्रकारच इथे असत नाही. प्रत्येक प्राणीमात्रात एकच आत्मा आहे. शारिरीक दृष्ट्या भिन्न दिसत असले तरी प्रत्यक्षात ते एकच असल्याचे योगी समजतो. त्यामुळे त्याला लहान-मोठा, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, गरीब- श्रीमंत असा कसलाच भेद दिसत नाही. तो समतेचे, एकात्मतेचे चालते-बोलते व्यासपिठच झालेला असतो. सर्व लोक जर असे समतेचे व्यासपीठ झाले तर आपसात भांडण-तंटे, वैर होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. जेव्हा भांडण तंटे, वैर, वादविवाद संपुष्टात येतील तेव्हा चोहीकडे सुख समाधान, शांती अनुभवायला मिळेल. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणा-या महात्म्यांची शांतीची, समतेची अपेक्षा आपल्या वर्तनातुन आपण पुर्ण करायला हवी आहे. योगी हा देहधारी असला तरीही त्याने देहाभिमान, मीपणा टाकुन दिला असल्याने त्याच्याकडे विषयवासना, आसक्ती अजिबात उरत नाहीत. ज्याकडे विषयवासना, आसक्ती नसते त्याला आत्म सुखाची, समतेची प्रचिती येत असते. अर्जुनाने स्वत:च्या ठिकाणी विश्व पहावे व सा-या विश्वाच्या ठिकाणी स्वत:चे रुप पहावे असे भगवंतांना वाटते. अर्जुन जेव्हा स्वत:ला विश्वाच्या ठिकाणी व विश्वाला स्वत:च्या ठिकाणी पाहिल तेव्हा त्याला फक्त साम्य दिसेल. या जगात साम्यापलीकडे मिळिवण्या सारखे काहीच शिल्लक नाही. साम्य हेच अत्यंत श्रेष्ठ असे साध्य असल्याचे भगवंत म्हणतात. ही साम्यवस्था आपणाला प्राप्त होऊन आपण आत्म सुखी होण्याचा व ईतरांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. आपल्या देशाला साम्यावस्थेची, एकरुपतेची म्हणजे समतेची गरज आहे. ही गरज पुर्ण करण्यात आपला पुढाकार अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. २७ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ शु.त्रयोदशी**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- मूळ (१०.२७)**
**योग - वैधृति (२२.५४)**
**करण - गरज (२९.१८)**
**राहू काल : सोमवार**
**स. ०७.३० ते ०९.००**

**दिनविशेष : १७६१ : थोरले माधवराव पेशवे हे मराठा साम्राज्याचे चौथे पेशवे बनले.**
**१९३९ : भारताचे सर्वात मोठे सशस्त्र पोलीस दल असलेल्या केंद्रीय राखीव पोलीस दलाची (CRPF) स्थापना.**
**१९९२ : 'शोले' चित्रपटातील गब्बर सिंगच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध असलेले अभिनेते अमजद खान यांचे निधन.**
**२०१५: भारताचे ११ वे राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन.**

# अभंगाचे स्वर आणि संत एकनाथ चरित्रात रंगले भाविक

### दीपक कलढोणे यांचे सेवेचे २०वे वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने गोविंदश्री सभागृहात आयोजित करण्यात आलेला गायक दीपक कलढोणे यांचा 'शांतिब्रह्म' हा भक्तिसंगीत कार्यक्रम भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

शनिवारी गोविंदश्री मंगल कार्यालयात दुर्वांकुर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने संतसाहित्यातून सामाजिक एकोपा वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने दरवर्षी भक्तिसंगीत उत्सवाचे आयोजन केले जाते. यंदा संत एकनाथ महाराज यांच्या जीवनचरित्रावर आणि अभंगगायनावर आधारित 'शांतिब्रह्म' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गायनसेवाव्रताच्या वीसाव्या वर्षानिमित्त सादर करण्यात आलेले हे २० वे भक्तिपुष्प विठ्ठल-रुक्मिणी चरणी समर्पित करण्यात आले.

कार्यक्रमात 'या पंढरीचे सुख पाहता लोचनी', 'कानडा विठ्ठल', 'काया ही पंढरी', 'माझे माहेर पंढरी', 'रामनाम ज्याचे मुखी', 'देवाचा देव बाई ठकडा' यांसह संत भानुदास महाराज यांची 'वृंदावनी वेणु वाजे' ही गौळण सादर करण्यात आली. तसेच दीपक कलढोणे यांनी संगीतबद्ध केलेल्या 'धन्य आजि दिन संतदर्शनाचा' या अभंगाने कार्यक्रमातील भक्तिरस अधिकच उंचावला. विठ्ठल नामाच्या गजरात रंगलेल्या या कार्यक्रमाला श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद दिली.



यावेळी संत साहित्याचे अभ्यासक व ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी संत एकनाथ महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. भक्ती, सामाजिक समता, क्रोधविरहित कर्मयोग, मराठी साहित्यनिर्मिती तसेच ज्ञानेश्वरीच्या भाषाशुद्धीकरणातील संत एकनाथांचे योगदान यांचे त्यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले.

कलढोणे यांना संवादिनी व स्वरसाथ नीरज कलढोणे यांनी दिली. कोल्हापूरचे प्रसिद्ध तबलावादक तालमार्तंड डॉ. पं. सचिन कचोटे आणि प्रसाद कुलकर्णी यांनी तबल्याची रंगतदार साथसंगत केली. वर्धराज मिर्जी, नागराज शेट्टी व महेश जाधव यांनी अनुगायन केले. निरंजनी कलढोणे व परिणिता कुलकर्णी यांनी तानपुरा साथ दिली, तर दिलीप पोतदार व अनंत जोशी यांनी तालवाद्यांची साथसंगत केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्र बँकेचे झोनल मॅनेजर मिथिलेशकुमार पांड्ये, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद कुलकर्णी, शिवाजी सुरवसे, रविंद्र देशमुख आणि शिवाजीराव कांबळे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती व संत एकनाथ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ. सुरेश व्यवहारे, रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. नयना व्यवहारे, उद्योजक महावीर गुंडाळे, ऑटोमोबाईल संशोधक राहुल बुऱ्हाणपुरे, ज्येष्ठ तबलावादक महेश पाटील, गायिका पूनम फालके, संजय नागरस यांच्यासह भाविक उपस्थित होते.



# 'सिंहगड'च्या आदित्य बोड्डू यास सोलापूर विद्यापीठाचे सुवर्ण पदक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव-सोलापूर येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाचा विद्यार्थी बोड्डू आदित्य अशोक याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अभियांत्रिकी पदवी (बी.ई.) परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

अभियांत्रिकी विद्याशाखेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्याला विद्यापीठाचा प्रतिष्ठेचा माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर सुवर्णपदक जाहीर झाले आहे. आदित्यने ९.९९ सीजीपीए तसेच ८९.४८ टक्के गुण मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव-सोलापूर कॅम्पसचे संचालक संजय नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले तसेच उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, विभाग प्रमुख प्रा. एच टी गुरमे यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून त्याच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळेस प्रा. आय जी शेख, प्रा. सुरज धनवे, प्रा. सुनील शाखापुरे, प्रा. शैलेजा शेळके, प्रा. अमृता रुईकर, प्रा. विनायक पालमूर, प्रा. आम्रपाली गुंड, एल सी मैंदर्गी, विनायक नाळे, जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे यांची उपस्थिती होती.

# सकल दिगंबर जैन 'सप्तपदी' वधू-वर पालक परिचय मेळावा उत्साहात



### कर्नाटकसह महाराष्ट्रातील ३५० वधू-वरांची नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

येथील दिगंबर जैन पंचम समाज विकास मंडळ संचलित सप्तपदीतर्फे सकल दिगंबर जैन वधू-वर पालक परिचय मेळावा रविवारी ( दि.२६ जुलै) उत्साहात पार पडला.

विजापूर रोडवरील सुंदर मल्टिपर्पज हॉल येथे याचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर येथील रवी मसाले परिवाराचे फुलचंद जैन, अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, नमोकार तीर्थचे ट्रस्टी प्रितम शहा, दिगंबर जैन पंचम समाज विकास मंडळाचे अध्यक्ष अनिल जमगे, डॉ. अजित माणिकशेटे, सुधीर पंडित, महिला मंडळाचे अध्यक्ष मनीषा जमगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यानंतर वधू-वर सूची पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. गौरव अध्यक्ष डॉ. महावीर शास्त्री यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुवर्णा कटारे व चेतन तुपकर यांनी केले. मंडळाचे सचिव देशभूषण व्हसाळे यांनी आभार मानले.

**दिसण्यापेक्षा असायला कसा हे खूप महत्वाचे**

आपला लाईफ पार्टनर हा दिसण्यापेक्षा असायला कसा हे खूप महत्वाचे आहे. त्यासाठी वधू-वर मेळाव्याची गरज आहे. यातूनच योग्य लाईफ पार्टनर मिळणार आहे.

**- प्रीतम शहा, नमोकार तीर्थचे ट्रस्टी**

**समाजाला जोडण्याचे काम**

जैन समाज विखूरला आला. दिगंबर जैन पंचम समाज विकास मंडळ हे पसंतीचे वधू-वर मिळावेत यासाठी प्रयत्न करुन समाज जोडण्याचे काम करीत आहेत.

**-फुलचंद जैन, रवी मसाले परिवार, छत्रपती संभाजीनगर**

**वधूना नोंदणी शुल्क परत केले**

या मेळाव्यात कर्नाटकसह महाराष्ट्रातील ३५० वधू-वराची नोंदणी झाली होती. ज्या वधूनी स्टेजवर येऊन परिचय दिला. त्यांचे नोंदणी शुल्क संयोजकांनी परत दिले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे महापौर कोंड्याल यांनी केले स्वागत

### अमृता फडणवीस यांचाही केला सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केल्यानंतर पुढील दौऱ्यासाठी सोलापूर विमानतळावर आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांनी सदिच्छा भेट घेत पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी महापौर कोंड्याल यांनी मुख्यमंत्री यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडणवीस यांचीदेखील सदिच्छा भेट घेत त्यांना पुष्पगुच्छ प्रदान करून आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी आ. देवेंद्र कोठे, रोहिणी तडवळकर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



# 'श्री विठूराया'ची सेवा यशस्वी!

'श्री विठूराया'ची सेवा यशस्वी!

आषाढी वारीसाठी पालकमंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांच्या समन्वयातून चांगलाच ताळमेळ जमल्याने आषाढी वारीत वारकरी बांधवांना अनेक सोईसुविधा मिळाल्या आणि दर्शनव्यवस्थाही सुलभ झाली. एकंदरीत, या विठुरायाच्या वारीसाठी 'एकत्र आले नेते अन् अधिकारी; वारीची व्यवस्था ठरली लयभारी'! असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या सुयोग्य नियोजनातून नेते आणि अधिकाऱ्यांनी वारकरी सेवा करीत-करीत एकप्रकारे विठुरायाची सेवाही यशस्वी केली आणि आपापल्या पदरात मोठी 'पुण्याई' पाडून घेतली.



गेल्या १५ दिवसांपासून जिल्ह्यात येणाऱ्या दिंड्यांमुळे जय जय रामकृष्ण हरी, माऊली ऽऽ माऊली, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम, ज्ञानोबाऽऽ तुकाराम असा जयघोष, गजर दाही दिशांतून घुमत होता. टाळ, मृदंग, विणा, चिपळ्या आदी वाद्यांचे सुमधूर स्वर सर्वत्र घुमत होते. यामुळे सोलापूर आणि आसपासचे जिल्हेही विठुरायाच्या नामघोषात तल्लीन झाल्याचे आपण सर्वांनीच पाहिले. मानाच्या १० दिंड्या आणि इतर शेकडो दिंड्यातून लाखो वारकरी पायी पंढरीला येतात. या वारकऱ्यांची सेवा घडावी म्हणून गावोगाव अनेक सेवेकरी, गावकरी आपापल्या परीने त्यांची सेवा करताना दिसून आले. याच वारकऱ्यांना पायी येताना कसलाही त्रास होवू नये म्हणून खुद्द पालकमंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्यासह इतरही स्थानिकचे लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचारी या वारीत अहोरात्र परिश्रम करताना दिसून आले.





**कलेक्टर कचेरीतून**
**अविनाश गायकवाड**
**मो. 9421876340**

आषाढी वारीसाठी पंढरपुरात येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ग्राम विकास मंत्री तथा पालकमंत्री गोरे यांच्या आदेशाने ग्रामविकास विभागाकडून यंदा तब्बल १५० कोटी पर्यंतचा निधी खर्च केला आहे. या निधीतून निवारा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, जर्मन हँगर, प्रचार व प्रसिद्धी, वारकऱ्यांना सेवा व सुविधा, पाणी टँकर पुरवठा, औषधे खरेदी व वैद्यकीय सुविधा, महिला स्नानगृहे, फिरते शौचालय, सफाई सेवा, मोबाईल चार्जिंग व्हॅन, मेडिसिन ऑन व्हील, ग्रामपंचायतींना अनुदान आदी सेवा वारकऱ्यांना देण्यात आल्या. त्यामुळे यंदाची वारी केवळ धार्मिक सोहळा न राहता सुयोग्य नियोजनाचा आदर्श ठरला असल्याची कौतुकाची थाप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर काही मंत्र्यांनी दिली.





आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमिवर जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांच्या सेवेसाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवल्याने एकादशीच्या २४ तासांत दर्शन रांगेतून १८ लाखांहून अधिक भाविकांनी श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतल्याची माहिती प्रशासनाने दिली. तर या पंढरीच्या वारीत ३० लाखांहून अधिक वारकरी सहभागी झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. या वारीमध्ये चरणसेवा, आरोग्यसेवा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आल्याने पायी चालत येणाऱ्या वारकरी बांधवांना कसलाही थकवा, ताण-तणाव आला नसल्याच्या प्रतिक्रिया अनेक वारकऱ्यांनी दिल्या. इतकेच नाहीतर काही दिंडीप्रमुखांनी जिल्हा प्रशासनाच्या योग्य नियोजनावर समाधान व्यक्त केले.

यंदाच्या वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ५ लाखाहून अधिक वारकऱ्यांना थेट चरणसेवेचा लाभ मिळाला. वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. या वारीत ७ लाख २३ हजार ८२ हून वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली. यासाठी एअर ॲम्बुलन्स, ३५३ रुग्णवाहिका, १५६ 'आपला दवाखाना' आणि ६९ आयसीयूंच्या माध्यमातून ही आरोग्य विभागाची प्रभावी सेवा दिली. यासाठी २१५ आरोग्यदूत, ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच ३०२ तज्ज्ञ डॉक्टर यांची नियुक्ती केली होती. या वारीकाळात आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या पथकानेही विशेष कामगिरी बजावली. त्यांनी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली नदीपात्रात बुडणाऱ्या जवळपास ३५ जणांचे प्राण वाचविले. वारीत होणाऱ्या विविध रिंगणसोहळ्यांतही कसलाच भाविकांना त्रास झाला नाही. उलट लक्ष लक्ष नयनांनी हा सोहळा आनंदाने अनुभवला. नवीन 'बीबीपीपीडीआर' टेक्नॉलॉजिचा यंदा पंढरीत पहिल्यांदाच वापर झाला. अवघ्या राज्यात या नवीन यंत्रणेचा आजतागायत कुठेही वापर झाला नाही. या नवीन तंत्रज्ञानाद्वारे गर्दीवर योग्य पध्दतीने नियंत्रण ठेवता आले, गर्दी कुठे जास्त होत आहे, दर्शन रांगेतील घुसखोरी, चोरटे-टवाळखोरांवर नियंत्रण ठेवणे आदींसह वारीतील इतर काही गोष्टींवर या नवीन टेक्नॉलॉजिचा वापर झाला. वारकरी हाच आमचा व्हीआयपी या ब्रिदवाक्याचा वापर नेते आणि अधिकाऱ्यांनी या वारीत योग्य पध्दतीने केला. वारीत मोठी गर्दी आल्याने उजनी धरणातून आवश्यक तितके पाणीही भाविकांना स्नानासाठी सोडले होते. वारीपूर्वी आणि वारीनंतर पंढरी नगरीची स्वच्छता करून जिल्हा प्रशासन आणि पालकमंत्र्यांनी यंदा स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिले. वारीत चंद्रभागा नदीपात्रात बचावकार्यासाठी १८० आपदा मित्रांचे पथक सज्ज होते, प्रत्येक नोडल अधिकारी आपापल्या ठरवून दिलेल्या फिल्डवर योग्य पध्दतीने काम करताना दिसून आले. या यात्रा कालावधीत मंदिर समितीमार्फतही विविध धार्मिक कार्यक्रमांचेही योग्य प्रकारे नियोजन झाले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांच्या धर्मपत्नी अमृता फडणवीस व धाराशिव जिल्ह्यातील वारकरी बाबासाहेब माने आणि त्यांच्या धर्मपत्नी प्रभावती माने या मानाच्या दांपत्यांच्या हस्ते आषाढी शुध्द एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रूक्मिणीची शासकीय महापूजा अगदी उत्साही वातावरणात पार पडली आणि 'विठूराया'ची सेवा यशस्वी झाल्याचा आनंद पालकमंत्री गोरे आणि जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी द्विगुणीत केला.

# धूर ओकणारी हिरकणी! ४० प्रवाशांच्या जीवाशी खेळ

### एसटीची धक्कादायक दुरवस्था उघड; सोलापूर बसस्थानक ते रंगभवन चौकापर्यंत धुराचे साम्राज्य

### इंजिनमधून गळाले ऑइल, प्रवाशांनी मध्येच सोडला प्रवास

**तभा वृत्तसेवा । मकरंद ढोबळे**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या देखभालीबाबत सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत असतानाच शुक्रवारी सकाळी सुमारे सव्वाकराच्या दरम्यान सोलापूर शहरात धावणाऱ्या हिरकणी बसने प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे विदारक चित्र समोर आणले. सोलापूर बसस्थानकातून अक्कलकोटकडे निघालेली ही बस रंगभवन चौकापर्यंत अक्षरशः काळा धूर ओकत धावत होती. या धुरामुळे मागील वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. अनेक दुचाकीस्वारांनी धुरापासून बचाव करण्यासाठी आपली वाहने रस्त्याच्या कडेला थांबविली.



घटनेचे गांभीर्य लक्षात आल्यानंतर काहींनी संबंधित बसचा पाठलाग करून चालकाला वारंवार सावध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, धूर मोठ्या प्रमाणात निघत असूनही चालकाने बस थांबविण्याची कोणतीही तत्परता दाखवली नाही. अखेर रंगभवन चौकात बस थांबल्यानंतर इंजिनमधून मोठ्या प्रमाणात ऑइल गळत असल्याचे समोर आले. काही क्षणांतच दोन ते चार लिटरपर्यंत ऑइल रस्त्यावर सांडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

या बसमध्ये ४० हून अधिक प्रवासी प्रवास करत होते. धूर, ऑइल गळती आणि वाहनाच्या अवस्थेमुळे संभाव्य अपघाताचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे घाबरलेल्या प्रवाशांनी बस थांबताच आपला जीव धोक्यात घालण्यापेक्षा दुसऱ्या वाहनाने अक्कलकोटकडे जाण्याचा निर्णय घेतला.

विशेष म्हणजे, शहराच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या मार्गावरून धावणाऱ्या या बसमुळे वाहतुकीवरही परिणाम झाला. सतत धूर ओकणारे वाहन सार्वजनिक रस्त्यावर धावत असताना त्याकडे दुर्लक्ष कसे झाले, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला.

प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना नादुरुस्त बसेस रस्त्यावर सोडल्या जात असतील, तर ती अत्यंत गंभीर बाब आहे. राज्य परिवहन महामंडळाने या घटनेची तातडीने चौकशी करून संबंधित जबाबदारांवर कारवाई करावी, तसेच अशा धोकादायक बसेसची त्वरित तपासणी करूनच त्या सेवेत उतरवाव्यात, अशी जोरदार मागणी प्रवासी आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## आषाढी एकादशी वारी




## सिध्देश्वर मॉन्टेसरी स्कूल

**सोलापूर, दि.२६ जुलै -**

श्री सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांची दिंडी पार पडली. टिाळ-मृदुंगाच्या गजरात विठुल नामाचा जयघोष करत विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचा आनंद अनुभवला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका संगीता गोटे तसेच सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूल व मॉन्टेसरी स्कूलच्या मुख्याध्यापिका प्रीती दुलंगे उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विठुल रुक्मिणीची पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य मधून विठुल भक्ती दाखवून दिली. अशाप्रकारे माऊली माऊलीच्या जयघोष मध्ये आषाढी दिंडीचा कार्यक्रम पार पडला. त्याकरिता शैक्षणिक प्रमुख सपना सास्तुरे यांनी परिश्रम घेतले.



## आषाढी एकादशीनिमित्त सांगोल्यात भक्तीचा जागर

**सांगोला,दि.२६ जुलै -**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून सांगोला शहरातील दत्त मंदिर व कोष्टी गल्ली दिंडी सोहळा यांच्या वतीने ग्रामप्रदक्षिणेचे आयोजन करण्यात आले. ज्ञानोबा-तुकाराम आणि जय हरी विठ्ठलच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. या दिंडी सोहळ्यात बाल वारकऱ्यांची वेषभूषा, हातात भगव्या पताका घेऊन तल्लीन झालेले भाविक आणि पारंपरिक अभंगांच्या चालींवर फुगड्या खेळणाऱ्या महिलांमुळे भक्तिरस अधिकच गडद झाला होता. ग्रामप्रदक्षिणेच्या मार्गावर जागोजागी नागरिकांनी दिंडीचे स्वागत करून विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमांचे पूजन केले. पंढरीच्या वारीचा प्रत्यक्ष आनंद अन् सोहळा सांगोला शहरातच अनुभवायला मिळाल्याने सर्व वयोवृद्ध, लहान मुले आणि नागरिक भावविभोर झाले.



## सारोळे गावात विद्यार्थ्यांची आषाढी दिंडी

**सोलापूर, दि.२६ जुलै -**

दीडशे वर्षांपासून अखंड वारकरी संप्रदायाचा वारसा लाभलेल्या सारोळे गावामध्ये आषाढी एकादशीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांची एक भव्य आणि डोळे दिपवणारी दिंडी काढण्यात आली. शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार प्रशाला येथून या दिंडीला सुरुवात झाली. टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठलनामाचा अखंड जयघोष आणि पारंपरिक वेशभूषेत नटलेले बालवारकरी अशा अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात ही दिंडी मार्गक्रमण करत होती. विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीत सहभाग घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे जंगी स्वागत केले. दिंडीची सांगता गावातील श्री नरसिंह मंदिर येथे झाली. दिंडी सोहळासाठी मुख्याध्यापक दीपक खंदारे, आर. पी. गायकवाड, डीसले, निता घोळवे, कोळी व गवळी आदींनी परिश्रम घेतले.



## नॅब संकुल

**सोलापूर, दि.२६ जुलै -**

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) संचलित सोलापूर येथील चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला, राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाइंड आणि ममता मूकबधिर विद्यालय या संस्थांच्या वतीने भव्य आषाढी वारी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विठ्ठलनामाचा गजर आणि टाळ-मृदंगाच्या निनादाने संपूर्ण नॅब संकुल भक्तीमय झाले. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, माजी प्राचार्य नरसिंह आसादे, पद्माकर कुलकर्णी, आसावरी सराफ आणि नॅबचे जनरल सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार यांच्या हस्ते पालखी पूजन व वृक्षारोपण करण्यात आले.

## अनंत चैतन्य प्रशाला, अक्कलकोट

**अक्कलकोट, दि.२६ जुलै -**

अनंत चैतन्य माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे वारी पर्यावरण रक्षणाची व विठुमाऊलीचा दिंडी सोहळा कार्यक्रम झाला. प्राचार्य ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते विठ्ठल- रुक्मिणी माता पालखी, ज्ञानेश्वर महाराज पालखी व तुकाराम महाराज पालखी या तिन्ही पालखीची आरती झाली. आमदार सचिन कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, माजी प्राचार्य सिध्देश्वर कल्याणशेट्टी, जि.प. सदस्या शांभवी कल्याणशेट्टी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, संस्थेच्या सी. ई. ओ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांनी अभिनंदन केले.

# ग्रंथदिंडीसह नगरप्रदक्षिणा; माढ्यात उत्साह

### विठ्ठल मंदिरात गर्दी; रस्त्यांवर टाळ मृदुंगाचा गजर

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ जूलै -**



माढा शहरातील कसबा पेठ विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे ३.३० वाजता नगराध्यक्षा ॲड मिनल साठे, कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, माजी ग्रामपंचायत सदस्य गुरुराज कानडे, भाग्यश्री कानडे, पांडुरंग पाटील, रसिका पाटील या दांपत्याच्या हस्ते श्री विठ्ठलाची महापूजा करण्यात आली.

या प्रसंगी उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, नगरसेविका अर्चना कानडे, पुजारी बापू कुंभेजकर आदींसह भक्त उपस्थित होते. महापूजेनंतर भाविकांनी दिवसभर दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. या ऐतिहासिक विठ्ठल मंदिरावर काम पूर्ण झाल्याने व मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने भाविकांमध्ये मोठे आनंदाचे वातावरण होते. पहाटेपासूनच माढा शहरासह परिसरातील गावातील नागरिक मोठ्या संख्येने श्री ग्रंथदिंडीचे नगरप्रदक्षिणा काढण्यात आली. यामध्ये विठ्ठलाचा जयघोष करत भजन टाळ मृदंगाच्या वाद्यात ज्ञानबा तुकारामांच्या जयघोष करत भजनी मंडळ, शाळकरी मुले, महिला, अबाल वृद्धांनी सहभाग घेऊन नगर प्रदक्षिणा पूर्ण केली. दिंडीचे सारथ्य माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद कानडे यांनी केले. दिंडी शहराच्या मुख्य मार्गावरून जात असताना टाळ मृदंग ज्ञानबा तुकाराम या जयघोषाने माढानगरी दुमदुमून निघाली होती. दादासाहेब साठे यांच्या वतीने विठ्ठल मंदिराला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

भक्तांसाठी माढा नगरपंचायत, जगदंबा गणेश मंडळ कसबा पेठ, क्रीडा तपस्वी श्रीरंग पालकर, सन्मती पतसंस्था, बीबीएस ग्रुप, शिवशाही प्रतिष्ठान व इतर सामाजिक संस्थांकडून फराळाचे वाटप केले. उत्सव पार पाडण्यासाठी विठ्ठल मंदिर भजनी मंडळ, मंदिर उत्सव समिती, जगदंबा गणेश मंडळ कसबा पेठ, पुजारी बापू कुंभेजकर व विठ्ठल भक्तांनी परिश्रम घेतले.

# डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांच्या उपकरणाला पेटंट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २६ जुलै -**



फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथील उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांच्या संशोधनाची भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने चल जैवकोळसा निर्मिती उपकरण या अभिनव डिझाइनची अधिकृत नोंदणी मंजूर करून प्रमाणपत्र दिले.

या संशोधनामध्ये त्यांना प्रा.स्वानंद कदम, प्रा.वैष्णवी देशपांडे, डॉ.वेदपाठक मोहन, प्रा.अतिश धेंडे यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, व्यवस्थापन प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# दामाजी कारखान्यावर रतनचंद शहा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २६ जुलै-**



श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक व्हाईस चेअरमन रतनचंद शहा यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त कारखाना कार्यस्थळावरील पूर्णाकृती पुतळ्यास कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील व संचालक मंडळ सदस्य यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील यांनी यावेळी आदरांजली वाहिली. शहा यांनी कारखाना उभारणीसाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या कतृत्वाने मंगळवेढा तालुक्याचा शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक विकास केला. ज्या संस्था त्यांनी उभारल्या त्या आदर्शवत चालविल्या, असे पाटील यांनी सांगितले. तालुक्याला साखर कारखान्याची गरज असल्याचे ओळखून मर्दा व शहा यांनी हा कारखाना उभा केला. विद्यमान संचालक मंडळ त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे काम करुन कारखान्याचे कामकाज आदर्शवत करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी व्हाईस चेअरमन तानाजी खरात, संचालक सर्वश्री मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, दयानंद सोनगे, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, प्रथमेश पाटील, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्र.कार्यकारी संचालक रमेश जायभाय, चिफ इंजिनिअर श्रीकांत ठोंबरे, शेती अधिकारी कृष्णात ठवरे, चिफ अकौंटंट रमेश गणेशकर, कार्यालयीन अधिक्षक दगडू फटे, लेबर ऑफिसर आप्पासो शिनगार आदी उपस्थित होते.

# नारायणपेठ साडीवर विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिमा

### अकलुजमधील तरुणीची कला; आकर्षक फॅब्रिक पेंटिंगचा नमूना



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि.२६ जूलै -**

आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल रुक्मिणीची प्रतिमा फॅब्रिक पेंटिंगद्वारे पारंपरिक नारायण पेठ या साडीवर काढण्यात आली. हे पेंटिंग अकलूज येथील रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयात वस्त्रशास्त्र व फॅशन डिझाईन या विभागांत द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी प्राजक्ता बोडरे हिने साकारले आहे.

वस्त्रशास्त्र व फॅशन डिझाईन विभागातर्फे आधुनिक तंत्रज्ञान, वस्त्रनिर्माण आणि फॅशन ड्रेसचे सखोल ज्ञान मिळण्यासाठी शैक्षणिक व अभ्यासेतर उपक्रम होतात. विद्यार्थिनींना नैसर्गिक रंग तयार करण्याचे तसेच बांधणीचे प्रशिक्षण दिले जाते.विद्यार्थिनींसाठी विविध गारमेंट कन्स्ट्रक्शन आणि पॅटर्न मेकिंग कार्यशाळा होतात. विविध एक्सेसरीज, ज्वेलरी मेकिंग आदी कौशल्य निर्माण करणाऱ्या कलांशी संबंधित कार्यशाळा होतात. विद्यार्थिनींनी उद्योजकीय कौशल्य आत्मसात करण्याच्या दृष्टीने राखी मेकिंग, कॅलेंडर मेकिंग, विविध एक्सेसरीज मेकिंग इत्यादींसाठी प्रदर्शन होतात. विद्यार्थिनींना वस्त्रशास्त्र विषयातील औद्योगिक प्रशिक्षणासाठी स्थळ भेटींचे आयोजन केले जाते. विविध प्रांतातील पेंटिंग जसे की, वारली, मधुबनी, कलमकारी इत्यादीचे देखील प्रशिक्षण दिले जाते.

विद्यार्थीनींच्या अंगातील कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयाच्या विकास समितीच्या सभापती स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील व इतर संचालकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभते. विद्यार्थीनीला पालक दिनकर बोडरे यांनीही मार्गदर्शन केले. टेक्सटाइल सायन्स व फॅशन डिझायनिंग विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. राजश्री निंभोरकर यांनी विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. प्राचार्य डॉ. अमित घाडगे यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले.

## लाठी हल्ल्याविरोधात मोहोळमध्ये मोर्चा

**मोहोळ, दि. २६ जुलै**

दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी माराच्या निषेधार्थ मोहोळ येथे महाविकास आघाडीच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) चे नेते संजय क्षीरसागर, काँग्रेसचे शहराध्यक्ष किशोर पवार, शिवसेना (उबाठा)शहरप्रमुख सत्यवान देशमुख आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष किशोर पवार यांनी भाषणे केली.

सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हार घालून शिवाजी चौक ते तहसील कार्यालय मोर्चा काढण्यात आला. यावेळी सत्यवान देशमुख, किशोर पवार, महेश देशमुख, पं.स.बाळासाहेब गायकवाड, सतीश पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी सूर्या पवार, अशोक भोसले, दादासाहेब पवार, बाळासाहेब वाघमोडे, दिलीप टेकाळे, मनोज नागणे, नाना हावळे, विजय गायकवाड, डॉ.प्रमोद पाटील, आकाश फाटे, मनोज मोरे, संजय साठे, राजू मजावर, सलीम हरणमारे, दाजी खांडेकर, रुपाली अडसूळ, नंदा गोरे आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# आंबेगाव येथे चिमुकल्यांचा भक्तीसागर

### जि. प. शाळा व अंगणवाडीच्या वतीने भव्य दिंडी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २६ जुलै-**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून आंबेगाव (ता. बार्शी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि अंगणवाडीच्या वतीने भव्य दिंडी सोहळा झाला. विद्यार्थ्यांनी परिधान केलेली विविध प्रकारची वेशभूषा होती.

चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि संत जनाबाई अशा विविध संतांच्या हुबेहूब वेशभूषा साकारल्या होत्या. कपाळी बुक्का, गळ्यात तुळशीच्या माळा आणि हातात मानाच्या पताका घेतलेले चिमुकले वारकरी गावकऱ्यांचे विशेष लक्ष वेधून घेत होते. विद्यार्थ्यांनी हातात टाळ घेऊन आणि मृदंग-ढोलताशांच्या गजरावर ठेका धरत गावातून दिंडी रॅली काढली. गावातील प्रमुख मार्गावरून फिरताना ठिकठिकाणी सुवासिनींनी दिंडीचे आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या रूपातील बालकांचे औक्षण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या फुगड्या आणि छोट्याशा रिंगण सोहळ्याने गावकऱ्यांना मंत्रमुग्ध केले.

सोहळ्याला एकता महिला मंचच्या पदाधिकारी नलिनी धेंडे, वर्षा साळुंके, शामल मस्के आणि माधुरी मिसाळ आदी हजर होते.

# मेथवडे फाटा येथे वारकऱ्यांची चरणसेवा आणि आरोग्यसेवा



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २६ जुलै-**

मुख्यमंत्री सहायता कक्ष आणि आ.काकासाहेब साळुंखे पाटील चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे नक्षत्र मंगल कार्यालय, मेथवडे फाटा येथे चरणसेवा आणि आरोग्यसेवा शिबिर झाले.

यावेळी हजारो वारकऱ्यांची सेवा करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन डॉ.प्रदीप साळुंखे पाटील, विजयराव देशमुख यांनी केले. यावेळी बाळासाहेब एरंडे, तानाजी पाटील, नगरसेविका तनुजा एरंडे, डॉ.सचिन गवळी, डॉ.राज मिसाळ, अभिजित नलवडे, अमोल नलवडे उपस्थित होते. याप्रसंगी माजी आ.दिपक साळुंखे पाटील यांनी वारकऱ्यांचे पायाला आयुर्वेदिक तेल लावून मालिश करून चरणसेवा केली. यावेळी डॉ.पियुष साळुंखे पाटील यांच्यासह सह्याद्री फार्मसी कॉलेज, मेथवडे आणि फॅबटेक फार्मसी कॉलेज, सांगोला येथील विद्यार्थी तसेच शिक्षकांनी वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा दिली.

# परमार्थाची प्रचिती संतांच्या सहवासातच येते

### ह.भ.प.शाहुराज माने; अक्कलकोटमध्ये आषाढी एकादशी निमित्त निरुपण



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ जुलै -**

मनुष्य जीवन हे संत सहवासातच पुर्णत्वास जाते. भौतिक सुखाने मनुष्य कितीही समृध्द असला तरी जीवनाची पुर्णता ही समाधानातच आह, असे निरुपण ह.भ.प.शाहुराज माने यांनी केले. ते आषाढी एकादशीनिमीत्त विठ्ठल मंदिर ए.वन चौक येथे आयोजित कीर्तन सोहळयात निरुपण करत होते.

कीर्तन सेवेच्या मध्य रंगात मंदिर समितीच्या वतीने विश्वस्त महेश गोगी यांनी कीर्तनकार ह.भ.प.शाहुराज माने यांचा सत्कार केला. ह.भ.प.शाहुराज माने यांनी परमार्थ म्हणजे आपल्या जीवनातून नको ते घालवणे होय. कशाचीही वासना मनात ठेवून परमार्थ करु नये. अगदी मोक्षाचीही वासना नको. मोक्षाऐवजी साधनेची काळजी घ्यावी, असेही सांगितले. त्यांना हार्मोनियमवर श्रीमंत पांचाळ, चैतन्य पांचाळ व मृदंगावर कैवल्य पांचाळ तसेच चिकुर्डा, तावशी, व मुस्ती येथून आलेल्या भजनी मंडळांनी साथ संगत केली.

तत्पूर्वी पहाटे ५ वाजता विठ्ठलाची महापूजा मुख्य पुरोहित दीपक व राघवेंद्र बागेवाडीकर यांच्या मंत्रोपचारात व देवस्थान समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी यांच्या हस्ते आरती उपलप व परिवार यांच्या उपस्थितीत झाली.

सकाळी ७ ते ९ या वेळेत तावशी, चिकुर्डा व मुस्ती येथून आलेल्या भजनी मंडळांची भजन सेवा झाली. याप्रसंगी उपस्थित सर्व भाविकांना देवस्थानच्या वतीने उपवासाचे फराळ प्रसाद दिला. श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित उपलप विठ्ठल मंदिरात अशा प्रकारे आज आषाढी एकादशी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, संतोष पराणे, स्वामीनाथ लोणारी, गिरीश पवार, शिवाजी यादव, चंद्रकांत डांगे, प्रा. शिवशरण अचलेर, रवीराव महिंद्रकर, महेश देसाई, काशिनाथ इंडे, श्रीशैल गवंडी, सागर मोरे, संजय मोरे, स्वाती गाडे, सोनाली चव्हाण, वंदना शिर्के, शशिकला मडीखांबे जयश्री माने, व असंख्य भाविक उपस्थित होते.




# जातो माघारी पंढरीनाथा । तुझे दर्शन झाले आता ।।

# विठुरायाला साकडे घालत जड अंत:करणाने वारकऱ्यांनी घेतला निरोप



## पुढच्या वर्षी परत येण्याचे बळ देण्याची याचना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२६ जुलै -**

आषाढी यात्रे निमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी येथे आलेल्या लाखो वैष्णवांनी एकादशीचा अनुपम्य सोहळा डोळे भरुन अनुभवला. परंपरंने घराण्यातून चालत आलेली वारी पोहच केली. दरम्यान आज रविवारी 'जातो माघारी पंढरीनाथा' असे म्हणत जड अंत:करणाने लाडक्या विठुरायाचा निरोप घेतला. तसेच पुढच्या वर्षी परत येण्याचे बळ देण्याची याचनाही केली.

बोला पुंडलिक वरदे हरि विठ्ठल । ज्ञानदेव तुकाराम।। असा जयघोष करीत विठुरायाच्या भेटीला पुढच्या वर्षी येण्याची मनोमन इच्छा व्यक्त करत जड अंत: करणाने वारकरी पंढरीचा आज निरोप घेत होते. येथील बस तसेच रेल्वे स्थानकावर पहाटे पासूनच भाविकांची परतीच्या प्रवासासाठी मोठी गर्दी झालेली दिसत होती. जातो माघारी पंढरीनाथा । तुझे दर्शन झाले आता ।। या भावनेने येथील विठ्ठल मंदिराच्या पश्चिम द्वारात तसेच महाद्वारात उभे राहून दोन्ही हातांनी स्वत:चे कान पकडून वारकरी विठ्ठल विठ्ठल म्हणून उड्या मारीत होते. सावळ्या परब्रह्माकडे क्षमा याचना करुन काही चुकले असेल तर माफी कर, पुढच्या वर्षी तुझ्या भेटीला येण्यासाठी बळ दे.. असे म्हणत निरोप घेत होते. या वेळी एकीकडे वारी पोहचल्याचा आनंद तर दुसरीकडे निरोप घेताना झालेली त्यांची अवस्था त्यांच्या डोळ्या खालील पापण्याच्या ओलाव्या वरुन स्पष्ट जाणवत होती.


पंढरपूर : आषाढी यात्रा पोहोच करुन रविवारी द्वादशीच्या दिवशी भाविकांची परतीच्या प्रवासासाठी प्रचंड गर्दी झाली होती. (छायाचित्र : उमेश टोमके, पंढरपूर )

दरम्यान शनिवारी एकादशीच्या दिवशी रात्रभर शहरातील विविध मठ, धर्मशाळांमधून तसेच मंदिर परिसरातील गल्ली-बोळातून असलेल्या मोठ्या वाड्यांमधून हरिजागर सुरु होता. मजल दरमजल करीत गेल्या वीस, बावीस दिवसांपासून पायी चालत आलेल्या भाविकांची विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनाची लांबच लांब रांग गेली होती. तरीही साऱ्या वेदना, सारी दु:खे नुसत्या विठुरायाच्या पदस्पर्श दर्शनाने वारकरी विसरले. आनंदी भावनेने एकादशीची सर्व व्रतवैकल्ये पार पाडण्यात वारकरी व्यस्त होते.

रविवारी द्वादशीदिवशी पहाटेपासूनच भाविकांची परतीच्या प्रवासासाठी लगबग दिसत होती. येथील चंद्रभागा वाळवंटात भाविकांची एकादशी दिवशी मध्यरात्री पासूनच स्नानासाठी गर्दी झालेली होती. चंद्रभागेचे पवित्र स्नान आणि नगरप्रदक्षिणा करुन द्वादशीच्या न्याहरीची वारकऱ्यांची लगबग सुरु होती. अनेक मठ, धर्मशाळांमधून वारकऱ्यांच्या जेवणाच्या पंक्ती बसत असल्याचे दिसत होते. वारकरी द्वादशी सोडून आपल्या बरोबर असलेल्या सामानाची बांधाबांध करुन मुक्कामाच्या ठिकाणाहून बाहेर पडत होते. विठ्ठल मंदिराचे कळस दर्शन घेवुन परतीच्या प्रवासासाठी रवाना होत होते.

# ७.२३ लाखांहून अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

**आषाढी वारीत आरोग्य विभागाची प्रभावी कामगिरी;**

**एअर ॲम्बुलन्स, ३५३ रुग्णवाहिका, १५६ आपला दवाखाना आणि ६९ आयसीयूची सुविधा**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाने आषाढी वारी २०२६ दरम्यान लाखो वारकरी भाविकांना सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत ७ लाख २३ हजार ८२ पेथा जास्त वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा दिली आहे.

आषाढी वारी सोहळ्यात सहभागी वारकरी भाविकांच्या आरोग्याची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाने स्वीकारली. पालखी मार्गापासून पंढरपूरपर्यंत व्यापक आरोग्य यंत्रणा उभी केली.

यंदाच्या वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्स आणि आरोग्यसंपन्न वारी या डिजिटल ॲपच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक गतिमान आणि तंत्रज्ञानाधारित करण्यात आल्या. आरोग्य विभागाने पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका, ४३ सुसज्ज आयसीयू, १५६ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, २१५ आरोग्यदूत, ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच ३०२ तज्ज्ञ डॉक्टर यांची नियुक्ती केली. पंढरपूरमध्ये २४ तास कार्यरत आयसीयू, दोन दिवसांचे महाआरोग्य शिबिर, मोफत चष्मा वाटप, डिजिटल मॅपिंग, पाणी स्रोतांचे निर्जंतुकीकरण, डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधात्मक उपाययोजना, हॉटेल व धाब्यांतील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, स्वच्छता अभियान आणि व्यापक आरोग्य जनजागृती यांसारख्या विविध सेवा प्रभावीपणे राबविण्यात आल्या.

७ लाख १८ हजार ६३५ बाह्यरुग्णांवर उपचार करण्यात आले. ४ हजार ४४७ रुग्णांना आंतररुग्ण सेवा दिली. तसेच १ हजार ५३३ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित केले. विविध आजारांवरील तपासणी व उपचारांमुळे वारकऱ्यांना वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध झाली.

# चंद्रभागा नदीतून ३५ जणांचा यशस्वी बचाव

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्य; जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जुलै-**

वारी कालावधीत पंढरपूरमधील चंद्रभागा नदीपात्रात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बचाव पथकाने फार मोठे कार्य केले. भाविकांच्या सुरक्षेची दक्षता बाळगत तात्काळ कार्यवाहीमुळे मोठा अनर्थ टाळला. २१ जुलै ते २६ जुलै या पाच दिवसात एकूण ३५ नागरिकांचे नदीपात्रातून सुरक्षित बचाव करण्यात आले.

संपूर्ण बचाव कार्य जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी. एस.कार्तिकेयन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तथा नोडल अधिकारी



शक्तिशागर ढोले यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील बचाव पथकाने पार पाडले. वारीच्या गर्दीमुळे आणि उजनी-नीरा धरणातून झालेल्या विसर्गामुळे चंद्रभागेच्या पाणीपातळीत वाढ झाली होती. त्यामुळे नदीपात्रात उतरणाऱ्या भाविकांसाठी धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नदीकाठावर २४ तास गस्त ठेवून बचाव यंत्रणा सज्ज ठेवली होती.

### पाणी वाढत असल्याने प्रशासनाकडून आवाहन

दरम्यान प्रशासनाने भाविकांना पुन्हा एकदा आवाहन केले आहे की, पाणीपातळी वाढत असल्याने नदीपात्रात जाऊ नये. लहान मुले आणि वृद्धांनी विशेष काळजी घ्यावी.

### दररोजचा बचाव कार्याचा अहवाल

२१ जुलै तीन जणांचे बचाव. २२ जुलै - सात जणांचे बचाव. २३ जुलै शुन्य. २४ जुलै ९ जणांचे बचाव. २५ जुलै १५ जणांचे बचाव. - दि.२६ जुलै एकाचा बचाव.

### प्रशासनाची खबरदारी आणि समन्वय

जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी बचाव कार्याचा दररोज आढावा घेतला. नदीकाठावर पोल निहाय होमगार्ड, गोताखोर आणि एनडीआरएफचे जवान तैनात करण्यात आले. धोकादायक ठिकाणी बॅरिकेटिंग, लाईफ जॅकेट आणि ध्वनीक्षेपकांद्वारे भाविकांना सतर्क करण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांच्या नियंत्रणाखालील पथकाने वेळेत हस्तक्षेप केल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. या जलद आणि समन्वयपूर्ण कार्यवाहीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### प्रशासनाची खबरदारी आणि समन्वय

जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी बचाव कार्याचा दररोज आढावा घेतला. नदीकाठावर पोल निहाय होमगार्ड, गोताखोर आणि एनडीआरएफचे जवान तैनात करण्यात आले. धोकादायक ठिकाणी बॅरिकेटिंग, लाईफ जॅकेट आणि ध्वनीक्षेपकांद्वारे भाविकांना सतर्क करण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांच्या नियंत्रणाखालील पथकाने वेळेत हस्तक्षेप केल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. या जलद आणि समन्वयपूर्ण कार्यवाहीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आषाढी वारीत वारकऱ्यांच्या सेवेसाठी १५० कोटी

**भाविकांसाठी सुविधा, स्वच्छता आणि आरोग्यावर भर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै -**

आषाढी वारीसाठी पंढरपुरात येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ग्राम विकास विभागाने यंदा तब्बल १५० कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे. या निधीतून निवारा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, फिरते शौचालय, महिला स्नानगृहे, जर्मन हँगर, मोबाईल चार्जिंग केंद्रांसह विविध मूलभूत सुविधा उभारल्या आहेत. त्यामुळे यंदाची वारी केवळ धार्मिक सोहळा न राहता सुयोग्य नियोजनाचा आदर्श ठरत असल्याचे चित्र आहे.



आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने वारकऱ्यांच्या सेवेसाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे. गेल्या २४ तासांत दर्शन रांगेतून १८ लाखांहून अधिक भाविकांनी श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतल्याची माहिती प्रशासनाने दिली. तर वारीत ३० लाखांहून अधिक वारकरी सहभागी झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

वारीत येणाऱ्या भाविकांना केवळ दर्शनच नव्हे, तर सुरक्षित मुक्काम, स्वच्छ परिसर, शुद्ध पिण्याचे पाणी, तातडीची आरोग्य सेवा आणि महिलांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासनाने विशेष नियोजन केले आहे. त्यामुळे भाविकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होण्यास मदत झाली असून, भविष्यात मोठ्या धार्मिक यात्रांच्या व्यवस्थापनासाठी हा अनुभव मार्गदर्शक ठरणार आहे.

### वारी सांस्कृतिक परंपरेचा आत्मा

''वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा आत्मा आहे. लाखो भाविकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम केले असून भाविक-केंद्रित व्यवस्थापनाला प्राधान्य देण्यात आले आहे,'' असे सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सांगितले.

### सोलापूर जिल्ह्यासाठी ६१.५० कोटींची तरतूद

वारी व्यवस्थापनासाठी सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत ६१.५० कोटी रुपयांचा निधी विविध कामांसाठी खर्च करण्यात आला आहे. त्यामध्ये मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्रासाठी जर्मन हँगर, वॉटरप्रूफ मंडप, स्वच्छता मोहीम, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याचे टँकर, औषध खरेदी, महिला स्नानगृहे, फिरते शौचालय, मोबाईल चार्जिंग केंद्र तसेच ग्रामपंचायतींना विशेष अनुदानाचा समावेश आहे. याशिवाय प्रचार व जनजागृतीसाठी एलईडी स्क्रीन, माहितीपत्रके, सांस्कृतिक कार्यक्रम आणि डिजिटल माध्यमांचा वापर करण्यात आला. वारकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहितीही या माध्यमातून देण्यात आली.

| वारीसाठी निधीचा वापर बाब | रक्कम |
|---|---|
| जर्मन हँगर (मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्र) | ८.00 कोटी |
| वॉटरप्रूफ मंडप | ३.५० कोटी |
| प्रचार व प्रसिद्धी | ५.00 कोटी |
| वारकऱ्यांना सेवा व सुविधा | ४.00 कोटी |
| पाणी टँकर पुरवठा | ३.00 कोटी |
| औषधे खरेदी व वैद्यकिय सुविधा | १०.00 कोटी |
| महिला स्नानगृहे | १.५० कोटी |
| फिरते शौचालय | २०.00 कोटी |
| सफाई सेवा | १.00 कोटी |
| मोबाईल चार्जिंग व्हॅन | ५० लाख |
| मेडिसिन ऑन व्हील | ५० लाख |
| ग्रामपंचायतींना अनुदान | ४.५० कोटी |
| जिल्हा परिषदेकडून खर्च | ६१.५० कोटी |
| एकूण राज्यस्तरीय खर्च | १५० कोटी |



# आषाढी एकादशी निमित्त वारकऱ्यांना फराळाचे वाटप

## राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग-व्यापार विभाग व एन पी ग्रुप ऑफ कंपनीजचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२६ जुलै -**

वारकऱ्यांच्या सेवेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) उद्योग-व्यापार विभाग तसेच एन पी ग्रुप ऑफ कंपनीज यांच्या संयुक्त विद्यमाने कोर्टी येथील फाटे ट्रॅक्टर शोरूम येथे भाविकांना नागेश फाटे यांच्या हस्ते फराळ वाटप केला.

वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठल सेवा मानत हा उपक्रम राबवल्याचे नागेश फाटे यांनी सांगितले. यावेळी संजय पवार, शरदचंद्र चट्टे, रमेश फाटे, अभिमन्यू पवार, उमेश फाटे, औदुंबर माने, ओंकार फाटे, शुभम फाटे, शर्विन फाटे, शशांक फाटे, समाधान बागल, समाधान कांबळे, लखन मोरे, ऋषिकेश बागल, वासिम मुलानी, निवृत्ती पाटील, सावंत (पुणे), ठाण्याचे उद्योजक रवींद्र पाटील, पवन पवार तसेच एन पी ग्रुप ऑफ कंपनीजचा सर्व स्टाफ, ग्रामस्थ, वारकरी, भाविक उपस्थित होते.

आषाढी एकादशी निमित्त वारकरी भाविकांचे आयोजकांनी स्वागत करून त्यांना फराळाचे वाटप केले. या सेवाभावी उपक्रमाबद्दल वारकरी भाविकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. आषाढी वारीत समाजसेवेची परंपरा जपत वारकऱ्यांच्या सेवेसाठी अशा उपक्रमांचे आयोजन होत असल्याने सामाजिक बांधिलकीचा संदेशही या माध्यमातून दिला.